




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ अमरावती, मंगळवार ९ जून २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०


## उकळते स्टील अंगावर पडले, 8 कामगारांचा तडफडून मृत्यू

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था-** आंध्र प्रदेशमधील विशाखापट्टणम येथे एका मोठी दुर्घटना घडली आहे. येथील विझाग स्टील प्लँटमध्ये वितळलेलं स्टील अंगावर पडून आठ कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर अनेकजण जखमी झाले आहेत. राष्ट्रीय पोलाद निगम लिमिटेडच्या विझाग स्टील प्लँटमध्ये एका क्रेनच्या मदतीने वितळलेलं स्टील असलेलं पात्र नेण्यात येत असताना त्यातील सुमारे १६०० डिग्री तापमान असलेलं अतितप्त स्टिल खाली सांडलं. हे वितळलेलं अतितप्त स्टिल अंगावर पडल्याने खाली असलेले ८ कामगार होरपळून जागीच मृत्युमुखी पडले. तर अनेक (पान २ वर)

## ममतांचे 28 पैकी 20 खासदार फुटले


- NDA ला पाठींबा देणार, सभापतींना लिहिले पत्र
- राज्यसभेच्या एका खासदाराचाही राजीनामा



**कोलकाता/वृत्तसंस्था-**आमदारांनंतर आता तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनीही ममता बॅनर्जी यांची साथ सोडली आहे. 'पीटीआय'च्या वृत्तानुसार, पक्षाच्या २८ लोकसभा खासदारांपैकी २० खासदारांनी एनडीए (NDA) सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.खासदार आणि टीएमसीच्या (TMC) माजी नेत्या काकोली यांनी सोमवारी हा दावा केला. त्या म्हणाल्या, २० खासदारांनी एनडीएला पाठिंबा देण्याचे ठरवले आहे. यासंदर्भात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना एक पत्रही पाठवण्यात आले आहे.यापैकी ११ खासदारांनी सोमवारी दुपारी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे बंगालचे प्रभारी भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी बैठक घेतली. या बैठकीदरम्यान सुवेंदू अधिकारीही त्यांना भेटण्यासाठी तिथे पोहोचले होते.या बैठकीला लोकसभा खासदार काकोली घोष, शताब्दी राय, अबू ताहिर, अरूप चक्रवर्ती, खलीलुर रहमान, शर्मिला सरकार, असित मल, कालीपदा सोरेन, जगदीश बसुनिया आणि प्रसून बॅनर्जी उपस्थित होते.टीएमसीचे सध्या लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खासदार आहेत. यापूर्वी, ३ जून रोजी बंगालमधील ८० पैकी ५८ आमदारांनी एक स्वतंत्र गट स्थापन केला. या गटाने रिताब्रता यांची आपला (पान २ वर)

## ऊज्ज्वला गॅस सिलिंडर आता चारच मिळणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**मोदी सरकारने प्रधानमंत्री ऊज्ज्वला योजनेच्या नियमांमध्ये एक मोठा बदल केला आहे. सरकारने आता अनुदानित एलपीजी सिलिंडर रिफिलची वार्षिक संख्या नउवरून चारवर आणली आहे. याचा अर्थ, ऊज्ज्वला योजनेअंतर्गत येणा-या कुटुंबांना वर्षाला केवळ चार सिलिंडरवरच अतिरिक्त अनुदानाचा लाभ घेता येणार आहे.एका सरकारी अधिका-याने सोमवारी सांगितले की, सरासरी घरगुती वापर लक्षात घेउन हा बदल करण्यात आला आहे. २०१६ मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत, लाभार्थ्यांना पूर्वी वर्षाला १२ अनुदानित १४.२ किलोग्रामचे सिलिंडर मिळत होते. तथापि, गेल्या वर्षी अनुदानित सिलिंडरची संख्या नउवर आणण्यात आली होती आणि आता ती आणखी कमी करून चार करण्यात आली आहे.पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव, प्रवीण माल खानुजा यांनी सांगितले की, ही सुधारित मर्यादा ऊज्ज्वला लाभार्थ्यांच्या सरासरी वार्षिक गॅस वापराच्या जवळपास आहे. ते पुढे म्हणाले की, लाभार्थ्यांच्या गरजेनुसार मदत देणे हा सरकारचा उद्देश आहे. सरकारने मे २०२२ मध्ये ऊज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी प्रति सिलेंडर २००रु पयांचे लक्ष्यित अनुदान सुरू केले, जे नंतर ऑक्टोबर २०२३ मध्ये ३०० रु पयांपर्यंत वाढवण्यात आले.



## राज्यसभेसाठी राजेंद्र जैन यांनी भरला उमेदवारी अर्ज

### महायुतीच्या शक्तिप्रदर्शनात अर्ज दाखल

**मुंबई : प्रतिनिधी-**महाराष्ट्रातील राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे उमेदवार राजेंद्र जैन यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत हा अर्ज भरला गेल्याने राज्यसभा निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता अधिक बळावली आहे.

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतर रिक्त झालेल्या राज्यसभा जागेसाठी १८ जून रोजी पोटनिवडणूक होणार आहे. या जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने राजेंद्र जैन यांना उमेदवारी दिली आहे. दरम्यान, आधी छगन भुजबळ यांचे नाव राज्यसभेसाठी आघाडीवर असल्याची चर्चा होती. मात्र पक्षांतर्गत चर्चेनंतर अखेर राजेंद्र जैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अधिकृत घोषणा केली होती. संटनेतही त्यांनी दीर्घकाळ काम केले आहे. यामुळेच त्यांच्या नावाचा विचार झाल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. राज्यसभेत जाणारे पुढील सदस्य म्हणून त्यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे. महाराष्ट्रातील राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे नेते



राजेंद्र जैन अचानक राज्याच्या राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. विदर्भाबाहेर त्यांचे नाव तुलनेने कमी चर्चेत असले, तरी भंडारा-गोंदिया आणि पूर्व विदर्भाच्या राजकारणात राजेंद्र जैन यांचा शब्द आजही वजनदार मानला जातो. एकेकाळी माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांचे स्वीय (पान २ वर)

## कर्जमाफीचे निकष अडचणीचे; शरद पवारांची सरकारला सूचना

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीबाबत घालण्यात आलेल्या अटी आणि पात्रतेच्या निकषांमुळे मोठ्या संख्येने शेतकरी योजनेबाहेर राहतील, अशी टीका होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले की, शेतक-यांच्या तक्रारी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. त्यांनी स्पष्ट केले की, सरकारचा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे असे म्हणणे योग्य नाही. मात्र त्यामध्ये काही व्यावहारिक अडचणी आहेत. त्यामुळे हा निर्णय थेट फेटाळण्याऐवजी त्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

राज्यातील शेतकरी कर्जमाफी, वादळी पावसामुळे झालेले पिकांचे नुकसान आणि इंडिया आघाडीची आगामी रणनीती या महत्त्वाच्या मुद्द्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट केली.दिल्लीमध्ये आज होत असलेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, देशातील एकूण राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यांच्या मते, ही कोणत्याही मोठ्या राजकीय निर्णयासाठी बोलावलेली बैठक नसून जनरल रिव्हू मीटिंग आहे. आघाडीतील कोणत्याही पक्षाने टोकाची भूमिका घेउ नये, असा संदेश या बैठकीत दिला जाण्याची शक्यता आहे.पवार म्हणाले की, आगामी लोकसभा किंवा विधानसभा निवडणुका लगेच नसल्याने



विरोधी पक्षांकडे संघटन मजबूत करण्यासाठी आणि परस्पर समन्वय वाढवण्यासाठी पुरेसा वेळ आहे. त्यामुळे विरोधकांनी मतभेद बाजूला ठेवून एकत्र काम करण्याची गरज आहे. विशेष म्हणजे अलीकडे इंडीया आघाडीतील काही पक्षांमध्ये मतभेदांच्या चर्चा सुरू असताना पवारांचे हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे. लोकशाहीत सरकारने लोकांशी संवाद साधला पाहिजे. लोकांच्या अडचणी समजून घेत निर्णयात आवश्यक बदल करण्याची तयारी दाखवली पाहिजे, असे पवार म्हणाले.

**मुख्यमंत्री आणि केंद्रातील नेत्यांशी चर्चा करणार-** कर्जमाफीबाबत स्वतः पुढाकार घेणार असल्याचे संकेतही पवारांनी दिले. ते म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि देशातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून कर्जमाफीतील निकषांमध्ये सुधारणा करता येते का, याचा प्रयत्न केला जाईल. राज्यातील अनेक शेतकरी संघटना कर्जमाफीच्या निकषांवर नाराज असल्याने पवारांची ही भूमिका सरकारवरील दबाव वाढवणारी ठरू शकते.

**वादळी पावसाने मोठे नुकसान-** गेल्या काही दिवसांत राज्यातील अनेक भागांत वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्रातील केळी आणि उस उत्पादक शेतक-यांना मोठा फटका बसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. याबाबत बोलताना शरद पवार यांनी सांगितले की, त्यांच्याकडे नुकसानाचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. विशेषतः केळी आणि उस पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी तज्ज्ञांची टीम पाठवण्यात आली होती. त्या पथकाचा अहवाल आता प्राप्त झाला असून त्याचा अभ्यास करून पुढील भूमिका निश्चित केली जाणार आहे.

नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये वादळी वा-यांमुळे केळीच्या बागा कोसळल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. अनेक ठिकाणी काढणीस आलेले पीक जमीनदोस्त झाले असून शेतक-यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.अशा परिस्थितीत नुकसानग्रस्त शेतक-यांना तातडीची मदत आणि पंचनामे करण्याची मागणी सातत्याने होत आहे.दरम्यान, आजच्या इंडिया ब्लाकच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, दिल्लीतील अनेक चौकांमध्ये काँग्रेस आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना लक्ष्य करणारे पोस्टर्स लावण्यात आले. या पोस्टर्समध्ये राष्ट्रवादी काँग्रेस-अनुसूचित जाती काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी, द्रमुक नेते उदयनिधी स्टॅलिन आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यासह विरोधी पक्षनेत्यांनी राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाबद्दल केलेल्या वक्तव्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

## पत्रिकेत नाव असो वा नसो, शिंदे लोकांच्या मनात; बच्चू कडू यांचे खळबळजनक विधान

**भंडारा/प्रतिनिधी**


नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरण सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेतून एकनाथ शिंदे यांचे नाव वगळण्यात आले होते. यावर बोलताना बच्चू कडू म्हणाले, पत्रिकेत नाव असो वा नसो, शिंदे लोकांच्या मनात आहेत.

विदर्भात गेल्या काही दिवसांत २० हून अधिक सभा घेतल्यानंतर बच्चू कडू यांनी आगामी मुख्यमंत्रिपदाबाबत मोठे विधान केले. ते म्हणाले, प्रत्येक शिवसैनिकाच्या मनात आपल्याच पक्षाचा मुख्यमंत्री व्हावा ही भावना असणे स्वाभाविक आहे. आमचीही इच्छा आहे की देवाभाउंचे वरच्या पदावर प्रमोशन व्हावे आणि एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री व्हावेत. गेल्या १५-२० दिवसांत आम्ही विदर्भाचा दौरा केला आहे, येथील जनता एकनाथ शिंदेंच्या पाठीशी उभी राहून त्यांना पुन्हा मुख्यमंत्री करेल, अशी मला खात्री आहे. यासाठी शिवसैनिकांनी आता शांत बसून चालणार नाही.भंडा-यातील एका कार्यक्रमात बोलताना बच्चू कडू यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरण सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेतून एकनाथ शिंदे यांचे नाव वगळण्यात



आल्याच्या वादावरही कडक शब्दांत प्रतिक्रिया दिली. एकनाथ शिंदे यांना जेवढे डावलण्याचा प्रयत्न केला जाईल, तेवढे ते अधिक वेगाने लोकांच्या मनात घर करतील. तुम्ही त्यांचे नाव पत्रिकेवर लिहा अथवा लिहू नका, एकनाथ शिंदे हे जनतेच्या मनातील नेते आहेत, अशा शब्दांत त्यांनी शिंदेंची पाठराखण केली. विदर्भातील शेतकरी आत्महत्येच्या मुद्द्यावरून देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट निशाणा साधला. विदर्भातील नेतृत्व मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री पदावर असतानाही या भागात दररोज १० ते १५ शेतकरी आत्महत्या करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.विदर्भातील मुख्यमंर्त्यांकडून या भागाला ज्या अपेक्षा आहेत, त्या पूर्ण झाल्या पाहिजेत. सरकार कामच करत नाही असे आमचे म्हणणे नाही; नदीजोड प्रकल्पातून पाणी जेव्हा यायचे तेव्हा येईल, पण आजच्या घडीला शेतक-यांच्या तातडीच्या गरजा पूर्ण होणे गरजेचे आहे, असे कडू म्हणाले.

**कर्जमाफीत दुरुस्ती करा, नाहीतर लढाई अटळ!-**कर्जमाफीत शेतक-यांची पूर्ण फसगत होत (पान २ वर)



## मान्सूनचे धडाकेबाज आगमन!

- 25 जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट
- कोकणात जोरदार हजेरी

**मुंबई/प्रतिनिधी :** दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर मान्सूनचे महाराष्ट्रात अधिकृतरीत्या आगमन झाले असून, तळकोकणात पावसाने विजांच्या कडकडाटासह जोरदार हजेरी लावली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून पुढील ४ ते ५ दिवस राज्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून हवामान खात्याने पुणे, सातारा आणि सिंधुदुर्गसह राज्यातील तब्बल २५ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर येणारा मान्सून यंदा दोन दिवस आधीच दाखल झाल्याने बळीराजा सुखावला आहे. रविवारी रात्रीपासूनच सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील किनारपट्टी भागात पावसाने दमदार हजेरी लावली. सावंतवाडी, कुडाळ आणि दोडामार्ग परिसरात मध्यम ते जोरदार सरी बरसल्या. सध्या या भागात काळे ढग दाटले असून सर्वत्र ढगाळ वातावरण आहे.

हवामान विभागाने ६ जून ते ९ जून दरम्यान राज्याच्या विविध भागांत वादळी वा-यासह आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. या काळात ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. या हवामानाचा फटका बसू शकणा-या २५ जिल्ह्यांमध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नाशिक, अहिल्यानगर, बीड, धाराशीव, लातूर, परभणी, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

मान्सूनच्या सुरुवातीच्या काळात विजा पडण्याच्या घटना अधिक घडतात, त्यामुळे नागरिकांनी विजांचा कडकडाट सुरू असताना झाडांखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबणे टाळावे आणि योग्य ती खबरदारी घ्यावी असा महत्त्वाचा सल्ला हवामान विभागाने दिला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, १५ जूनपर्यंत मान्सून संपूर्ण महाराष्ट्र व्यापण्याची दाट शक्यता आहे, मात्र ९ जूननंतर मान्सूनचा वेग काहीसा मंदावण्याचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## TMC नेते जहांगीर खानला नेपाळ सीमेवर अटक

### दावा- समर्थकांनी दिली होती सामूहिक बलात्काराची धमकी

**कोलकाता/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगाल पोलिसांच्या 'स्पेशल टास्क फोर्स'ने (STF) टीएमसी (TMC) नेते जहांगीर खान यांना अटक केली आहे. ही अटक नेपाळ सीमेजवळ करण्यात आली. पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील फाल्टा पोलीस ठाण्यात खान यांच्याविरुद्ध सात एफआयआर (FIR) दाखल करण्यात आले होते.माध्यमांमधील वृत्तानुसार, जहांगीर यांच्या समर्थकांनी महिलांना सामूहिक बलात्काराची धमकी दिली होती. मात्र, बंगाल पोलिसांनी यासंदर्भात अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. ते नेपाळला पळून जाण्याच्या प्रयत्नात होते. पोलीस जहांगीर यांना कोलकाता येथे घेउन येत आहेत.जहांगीर यांनी फाल्टा मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवली होती. सुरुवातीच्या मतदानादरम्यान झालेल्या अनियमिततांनंतर तिथे फेरनिवडणूक घेण्यात आली होती. फेरनिवडणुकीच्या अवघ्या ४८ तास आधी, जहांगीर यांनी आपण निवडणुकीच्या शर्यतीतून माघार घेत असल्याचे जाहीर केले.फेरनिवडणुकीच्या निकालांमध्ये जहांगीर चौथ्या स्थानावर राहिले आणि त्यांना ७,७८३ मते मिळाली. निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यापासून जहांगीर जवळपास गायबच झाले होते; ते ना त्यांच्या घरी दिसले ना पक्षाच्या कार्यालयात.जहांगीर यांना अखेरचे १९ मे रोजी पाहिले गेले होते; त्या दिवशी एका पत्रकार परिषदेत त्यांनी निवडणुकीतून आपली उमेदवारी मागे घेण्याची घोषणा केली होती.मे २०२६ मध्ये, जहांगीर यांनी कलकत्ता उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्याविरुद्ध दाखल असलेल्या प्रकरणांचा तपशील आणि अटकेपासून संरक्षण मिळण्याची मागणी केली. आपल्याविरुद्ध सातत्याने अनेक फौजदारी गुन्हे दाखल केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.उच्च न्यायालयाने यापूर्वी २०१९ मध्ये दाखल झालेल्या एका प्रकरणात आणि फाल्टा येथील फेरमतदानापूर्वी त्यांना सुरक्षा पुरवली होती; मात्र, २६ मे रोजी ती सर्व सुरक्षा व्यवस्था काढून घेण्यात आली. जहांगीर खान यांनी निवडणूक प्रचारादरम्यान स्वतःला 'पुष्पा' चित्रपटातील पात्राप्रमाणे सादर केले होते. त्यांनी अनेकदा चित्रपटातील प्रसिद्ध संवाद 'पुष्पा झुकेगा नहीं साला' देखील उच्चारला होता. त्यांनी स्वत?ला परिसरातील असा मजबूत नेता म्हणून सादर केले, जो कोणत्याही दबावापुढे झुकणार नाही.



## ट्रंप यांच्या आवाहनानंतरही इस्त्रायल-इराण आमनेसामने

**तेहरान / वॉशिंग्टन / बेरूत/वृत्तसंस्था-** मध्यपूर्वेमध्ये पुन्हा एकदा दोन मोठ्या शक्तींमध्ये भीषण युद्ध पेटण्याची चिन्हे दिसत आहेत. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला लागू झालेल्या अत्यंत नाजूक युद्धविरामानंतर, इराणने थेट इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे डागल्याचा दावा इस्त्रायलने केला आहे. इराणकडून झालेला हा अशा प्रकारचा पहिलाच मोठा हल्ला आहे. या नव्या हल्ल्यामुळे दोन्ही देशांमधील युद्ध संपवण्यासाठी सुरू असलेले आंतरराष्ट्रीय मध्यस्थीचे प्रयत्न आता कमालीचे गुंतागुंतीचे आणि कठीण झाले आहेत.या ताज्या वादाची सुरुवात रविवारी झाली, जेव्हा इस्त्रायलने लेबनानची राजधानी बेरूतच्या दक्षिणी उपनगरांवर भीषण हल्ला केला होता. या हल्ल्यानंतर इराणने इस्त्रायलला चोख प्रत्युत्तर देण्याची थेट चेतावणी दिली होती. इस्त्रायलच्या म्हणण्यानुसार, इराण समर्थित दहशतवादी संघटना हिजबुल्लाने रविवारी दिवसा उत्तर इस्त्रायलवर जोरदार गोळीबार केला होता, त्याला प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलने बेरूतवर हा हल्ला चढवला.विशेष म्हणजे, अमेरिका आणि लेबनान-इस्त्रायलच्या सरकारांमध्ये झालेल्या दीर्घ चर्चेनंतर काही दिवसांपूर्वीच एका शांतता (पान २ वर)

## दादरमध्ये बेस्ट बसचा थरारक अपघात; पाच वाहनांना चिरडले; एकाचा मृत्यू

**मुंबई/ प्रतिनिधी-** मुंबईतील दादर परिसरात आज सकाळी ८ जून रोजी एक भीषण अपघात घडला. प्लाझा सिनेमा परिसरात भरधाव वेगाने जात असलेली बेस्ट बस अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि तिने रस्त्यावरील अनेक वाहनांना धडक दिली. या घटनेमुळे परिसरात एकच गोंधळ उडाला असून वाहतूक काही काळ विस्कळीत झाली.प्राथमिक माहितीनुसार, दादरमधील प्लाझा सिनेमाजवळ ही घटना घडली. बस चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बसने प्रथम एका टॅक्सीला धडक दिली. त्यानंतर काही कार आणि दुचाकींनाही जोरदार धडक बसली. अपघाताचा जोर इतका होता की एक टॅक्सी उलटल्याचे आणि एक दुचाकी रस्त्यावर फेकली गेल्याचे दृश्य समोर आले



आहे.अपघातानंतर बस रस्त्याच्या कडेला सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी ठेवलेल्या बॅरिकेड्सवर आदळली. पुढे जाउन ती एका उत्खननासाठी वापरल्या जाणा-या ट्रकवर धडकली. या धडकेत ट्रकचा काही भाग बसच्या पुढील काचेत घुसल्याचे दिसून आले. त्यामुळे बसचे मोठे नुकसान झाले आहे.या अपघातात एक ॲक्टिव्हा दुचाकी, एक इलेक्ट्रिक बाईक, एक टॅक्सी, एक बलेनो कार आणि एक इलेक्ट्रिक कारचे नुकसान झाले. घटनेत ॲक्टिव्हा चालक, इलेक्ट्रिक बाईकस्वार आणि बसमधील वाहक (कंडक्टर) जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी सायन रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातानंतर बस चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच मुंबई वाहतूक पोलिस आणि स्थानिक पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तातडीने वाहतूक नियंत्रणात आणण्याचे काम सुरू केले. कोतवाल गार्डन परिसरात वाहनांची मोठी गर्दी झाल्याने काही काळ वाहतूक संथ गतीने सुरू होती. मुंबई वाहतूक पोलिसांनीही नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले.




# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ९ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## वही पुस्तके गणवेश खरेदी सक्ती विरोधात मनसे आक्रमक

## खाजगी शाळांची मनमानी पालकांच्या खिशावर डल्ला

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

जिल्ह्यातील अनेक खाजगी शाळांकडून विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेना व विद्यार्थी सेनेच्या वतीने शिक्षण विभागाचे लक्ष वेधण्यात आले.

नर्सरी ते दहावीपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेमधूनच वही पुस्तके रजिस्टर व इतर शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी सक्ती केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला तसेच शाळेचे गणवेश विशिष्ट रेडीमेड दुकानातूनच खरेदी करण्यासाठी पालकांवर दबाव टाकला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले

सध्या सर्वसामान्य जनता पेट्रोल डिझेल टंचाई तसेच वाढत्या इंधन दरांमुळे आर्थिक संकटाचा सामना करत आहे त्यातच आर्थिक मंदीचा मोठा फटका सामान्य नागरिकांना बसत असून घरखर्च भागविणे कठीण झाले आहे अशा परिस्थितीत शाळांकडून बाजारभावापेक्षा जास्त दराने वही पुस्तके रजिस्टर व गणवेश विक्री करून पालकांची आर्थिक पिळवणूक सुरू असल्याचा आरोप मनसेच्या वतीने करण्यात आला



शासनाच्या नियमानुसार कोणतीही शाळा पालकांना विशिष्ट दुकानातून साहित्य खरेदी करण्यास भाग पाडू शकत नाही मात्र अनेक शाळांकडून खुलेआम नियमांचे उल्लंघन सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले मनसेच्या वतीने शाळेमधून होणारी वही पुस्तके रजिस्टर विक्री तात्काळ बंद करावी.

### विशिष्ट रेडीमेड दुकानातून गणवेश खरेदीची सक्ती थांबवावी

दोषी शाळांवर शासकीय नियमानुसार कठोर कारवाई करावी.पालकांना कोणत्याही दुकानातून साहित्य खरेदी करण्याचे स्वातंत्र्य द्यावे तसेच जिल्हाभर विशेष तपास मोहीम राबवावी अशी मागणी करण्यात आली.यावेळी गजानन कडणे मनविसे जिल्हाध्यक्ष वाशिम अनिकेत शेटे मनविसे जिल्हाउपाध्यक्ष वाशिम ज्ञानेश्वर गवळी, मालेगाव तालुका अध्यक्ष रामेश्वर वाघ, मालेगाव तालुका उपाध्यक्ष,उमेश टोलमारे जिल्हा उपाध्यक्ष , आकाश लोलप शहर उपाध्यक्ष ,महाराष्ट्र सैनिक प्रवीण घोडे यांच्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेना व विद्यार्थी सेना जिल्हा वाशिम टीम उपस्थित होती.

## आनंद नगरात मृत्यूचा सापळा

### ११ हजार व्होल्टच्या धोकादायक पोलमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

■ प्रतिनिधी | कारंजा ■

आनंद नगर भाग क्र. ४, प्रभाग क्र. १ येथे दोन धोकादायक विद्युत खांबांमुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून तात्काळ कारवाईची मागणी स्थानिक नागरिकांनी महावितरणकडे केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आनंद नगरच्या दक्षिण भागात ॲड. सुभान खेतिवाले यांच्या घरामागे ११,००० व्होल्ट क्षमतेच्या उच्चदाब वीजवाहिन्या असलेला विद्युत खांब धोकादायकरीत्या वाकलेला आहे. सदर खांबाला केवळ एका खासगी बीमचा आधार असून सध्या सुरू असलेल्या जोरदार वारे आणि पावसामुळे तो कधीही कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. हा खांब कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

याशिवाय, असमत रायलीवाले गुरुजी यांच्या घरासमोरील मुख्य रस्त्याच्या अगदी मधोमध उभा असलेला दुसरा विद्युत खांबही अपघातांना आमंत्रण देत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा वीजपुरवठा खंडित असताना वाहनचालकांना हा खांब सहज दिसत नसल्याने गंभीर अपघात घडू शकतो, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

या दोन्ही धोकादायक खांबांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी, अन्यथा एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

या मागणीसाठी ॲड. सुभान खेतिवाले, नगरसेवक ॲड .फिरोज शेकुवाले, घसीटा परसुवाले, जमीर मांजरीवाले, युसुफ खेतिवाले, सुमन चौधरी, रहेमान नंदावाले यांच्यासह अनेक नागरिकांनी स्वाक्षरी करून महावितरणकडे निवेदन सादर केले आहे. 'अपघात होण्याची वाट न पाहता प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी,' अशी एकमुखी मागणी आनंद नगरवासीयांनी केली आहे.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने किरण चौधरी यांचा गौरव



■ प्रतिनिधी | कारंजा ■

येथील नामांकित गोविंद पब्लिक स्कूलचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक किरण अर्जुनराव चौधरी यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'बी द चेंज फाउंडेशन', शिर्डी (जि. अहिल्यानगर) यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले.

शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अविरत कार्याची, विद्यार्थीकेंद्री उपक्रमांची तसेच प्रभावी शैक्षणिक नेतृत्वाची दखल घेत ७ जून रोजी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून किरण चौधरी यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता नैतिक मूल्ये, आधुनिक तंत्रज्ञानाची जाण आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गोविंद पब्लिक स्कूलने शैक्षणिक तसेच सहशालेय उपक्रमांमध्ये उल्लेखनीय प्रगती साधत राज्यस्तरावर आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रभावी व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेत त्यांना हा सन्मान बहाल करण्यात आला. 'बी द चेंज फाउंडेशन'तर्फे दरवर्षी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या, सामाजिक जाणीव जोपासणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी समर्पित शिक्षकांचा गौरव केला जातो.

सन २०२६ साठी किरण चौधरी यांची झालेली निवड ही त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील अष्टपैलू नेतृत्वाची आणि कार्यकर्तृत्वाची पोचपावती मानली जात आहे.

या पुरस्कारामुळे गोविंद पब्लिक स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त न्यायालय परिसरात वृक्षारोपण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा सदन परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा , जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरणाचे संरक्षण आणि वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-२ व्ही. डी. इंगळे, जिल्हा न्यायाधीश-३ एम. एस. सहस्त्रबुद्धे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे, मुख्य न्यायदंडाधिकारी पी. व्ही. राणे, सहदिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) आर. पी. राणे, तृतीय सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) ए. आर. फक्राबादकर, अध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ मंडळ ॲड. अनुप बाकलीवाल, मुख्य न्यायरक्षक ॲड. परमेश्वर आ. शेळके, उपाध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ मंडळ ॲड. वैभव तिफणे, कोषाध्यक्ष, वकील संघ डी. डी. गुडदे तसेच न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी आणि विधिज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'माझी वसुंधरा' शपथ

**वाशिम :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत पर्यावरण संवर्धन व हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विशेष शपथ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना पर्यावरण संरक्षणाची शपथ दिली.

या प्रसंगी पृथ्वी, वायू, जल, ऊर्जा आणि आकाश या पंचमहाभूतांच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचा संकल्प करण्यात आला. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करून पृथ्वीच्या संरक्षणासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. शपथेमध्ये विशेष प्रसंगी किमान पाच वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करणे, पर्यावरणपूरक वाहतूक साधनांचा वापर करणे, पाणी व विजेचा काटकसरीने वापर करणे.

## अडोळी येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी पोखरा समितची बैठक संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत पोखरा समितची बैठक दि.८ जून रोजी सकाळी ९ वाजता ग्रामपंचायत प्रशासक सविता इढोळे यांचे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

बैठकीमध्ये पोखरा प्रकल्पांतर्गत ऑनलाईन केलेल्या अर्जाचे वाचन करून त्या सर्व अर्जांना समितीने मान्यता दिली व ठीबक संच , तुषार संच, फळबाग लागवड, ग्राम बीजोत्पादन, रेशीम उद्योग,विहीर पुनर्भरण, पीव्हीसी पाइप,शेळी पालन, गांडूळ खत इत्यादी बाबीचे अर्ज करण्यासाठी आव्हान करण्यात आले,व महा विस्तार एआय ॲप डाऊनलोड करणे तसेच पोखरा प्रकल्पांतर्गत विविध योजनांची माहिती कृषी सहायक अधिकारी जी.डी.ठोकळ यांनी दिली.तर पोखरा प्रकल्पांतर्गत येणारे कामांची माहिती पोखरा च्या समुह सहा.संजना अवस्थी यांनी दिली.

यामध्ये ग्रामपंचायत प्रशासक समिती सदस्य भगवान इढोळे, समाजसेवक राजकुमार पडघान,ज्योती इढोळे,राजू इढोळे, नारायण इढोळे, कमलबाई पडघान आदींची उपस्थिती होती.

बैठकीमध्ये वरील सर्व ठराव मंजूर करून.पुढील योजना सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या पाहिजे.असे सर्वानुमते ठरले.

## महावितरणच्या वर्धापन दिनी शेलूबाजारला स्वतंत्र गावठाण फिडरची भेट

### नियमित व अखंडित वीजपुरवठ्याचा मार्ग मोकळा



■ प्रतिनिधी | शेलूबाजार ■

महावितरण कंपनीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत शेलूबाजार गावासाठी नव्याने उभारण्यात आलेला स्वतंत्र गावठाण फिडर शुक्रवार, ६ जून रोजी कार्यान्वित करण्यात आला. प्रभारी कनिष्ठ अभियंता सुरज कोंगे यांच्या हस्ते नारळ फोडून या फिडरचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमामुळे शेलूबाजारसह परिसरातील नागरिकांना अधिक दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावेळी बाबाराव पवार, विनोद जाधव, नंदू पावसे, विलास लांभाडे, रवि लाभांडे, मोहन राऊत, साहेबराव राठोड, गायकवाड यांच्यासह महावितरणचे कर्मचारी योगेश भगत, ओम पोहेकर, संजय आंधळे, विजय परंडे, ओम गिरी, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी अमोल दुबे, रामा वाढेकर, रोशन गावंडे आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेलूबाजार ही जिल्ह्यातील महत्त्वाची आठवडी बाजारपेठ असून बार्शीटाकळी, कारंजा, मालेगाव आणि वाशीम तालुक्यातील नागरिक विविध कामांसाठी येथे ये-जा करतात. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून येथील वीजपुरवठा अनियमित होता. एकाच फिडरवर अनेक गावे जोडलेली असल्याने वारंवार वीज खंडित होत होती. याचा परिणाम नागरिकांसह व्यापारी, लघुउद्योजक आणि औद्योगिक क्षेत्रावर होत होता.

नियमित वीजपुरवठ्यासाठी नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. या मागणीची दखल घेत महावितरणचे पदोन्नतीवर गेलेले तत्कालीन कार्यकारी अभियंता जीवन चव्हाण यांनी काही महिन्यांपूर्वी आवश्यक नियोजन करून स्वतंत्र फिडर उभारणीच्या कामाला गती दिली. त्यानंतर अवघ्या काही महिन्यांत हे काम पूर्णत्वास जाऊन फिडर कार्यान्वित करण्यात आला.

नवीन फिडरमुळे वीज वितरण व्यवस्थेवरील ताण कमी होणार असून शेलूबाजार उपकेंद्रातही विविध तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे भविष्यात अधिक विश्वासार्ह, दर्जेदार आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. नवीन फिडर सुरू झाल्याने शेलूबाजार व परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून महावितरणच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

## भव्य महाप्रसाद व शोभायात्राने श्रीमद् भागवत कथेची सांगता

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक जुनी आयडीपी जवाहर कॉलनी येथील श्री जंगलेश्वर संस्थान येथे कथावाचक पंडित नीरज उर्फ लाला कमलकिशोर यांच्या अमृतवाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथेला भव्य महाप्रसाद व शोभायात्राने विश्रांती करण्यात आली. रोजी भागवत कथेचे दुसरे पुष्प गुंतताना कथावाचक पंडित निरज उर्फ लाला शर्मा यांनी जीवनामध्ये भगवंताची भक्ती जरुरी आहे, पुरुषोत्तम मास मध्ये श्रीमद् भागवत कथा श्रवण केल्याने जीवनाचे कल्याण होते भागवत कथा ही मोक्षप प्राप्त करण्याचे माध्यम आहे. आयुष्य आनंदाने जगा कुणाबद्दलही मनामध्ये द्वेष मत्सर राग लोभ ठेवू नका. असे आव्हान कथावाचक पंडित नीरज उर्फ लाला शर्मा यांनी केले.स्थानिक जवाहर कॉलनी येथील श्री जंगलेश्वर संस्था मंदिरामध्ये आयोजित श्रीमद् भागवत कथेमध्ये विश्रांती दिनी त्यांनी वरील प्रतिपादन केले.. सर्वप्रथम कथेचे मुख्य यजमान श्रीमती सुरजकिरण रामगोपाल मालू, खामगाव निवासी डॉक्टर प्रकाश मालू, नंदकिशोर झंवर ,रितेश बाहेती, सो भारती बाहेती, डॉक्टर राहुल भुतडा, सौ.गीता भुतडा, भूषण मालानी, सौ. नीता मालानी, आयुष भुतडा, रुद्रम भुतडा यांनी पूजन करून कथावाचक निरज शर्मा यांचे पुष्पहार देऊन स्वागत सत्कार केला. ८४ कोटी योनीतून मार्गक्रमण करत मनुष्य जीवन मिळत असतो. मानव जीवन ही भगवंताने दिलेली सर्वात सुंदर संधी आहे.

## पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा -परमेश्वर व्यवहारे

■ प्रतिनिधी | कारंजा ■

वाढते तापमान, आटत चाललेले जलस्रोत, वाढते प्रदूषण आणि प्लास्टिक कचऱ्यामुळे पर्यावरणासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. या संकटातून सृष्टीला वाचवायचे असेल तर प्रत्येकाने वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनासाठी योगदान दिले पाहिजे. झाडे हीच मानवी आयुष्याची खरी संपत्ती असून त्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन 'गो ग्रीन'चे परमेश्वर व्यवहारे यांनी केले.

आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष देवा तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहा येथे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी संस्थेच्या पदाधिकारी आशा व्यवहारे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून गुरुदेव सेवा मंडळाच्या जिल्हा प्रचारक हर्षाताई अंधारे, जिल्हा सचिव कैलासजी अंधारे तसेच सामाजिक कार्यकर्ते कैलास गुगळे उपस्थित होते.

यावेळी पोहा येथील दुर्गादेवी मंदिर परिसरात मान्यवरांच्या हस्ते पिंपळ, जांभूळ, निंब, सीताफळ, कडू बदाम आणि चिंच आदी पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच परिसरात मोठ्या प्रमाणात पक्ष्यांचा वावर असल्याने त्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी विविध झाडांवर जलपात्रे बांधण्यात आली. वृक्षारोपणासोबतच मंदिर परिसराची स्वच्छताही करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना हर्षा अंधारे यांनी झाडांचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, 'वृक्षतोडीचे प्रमाण असेच वाढत राहिले तर मानवासह पशुपक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.'

या पर्यावरणपूरक उपक्रमात नंदाताई जाधव, सुमन साखरकर, कमलाताई मालखेडे, उषा डगवार, मीना कोरपे, स्मिता खडसे, आशा भिवरकर, कल्पना गोडसे, अवताडे ताई यांच्यासह अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वृक्षारोपण, जलपात्र उभारणी आणि स्वच्छता अभियान अशा विविध उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम परिसरात विशेष चर्चेचा विषय ठरला. उपस्थितांनी भविष्यातही अशाच उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

## ओबीसींची जातीनिहाय जनगणना केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही - आखाडे

### ओबीसींच्या प्रश्नांसाठी सावता परिषदेचा एल्गार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ओबीसी समाजाला आश्वासनांचे गाजर दाखवत त्यांच्या हक्कांच्या प्रश्नांवर सातत्याने अन्याय केला जात आहे. आगामी जनगणनेत ओबीसींची स्वतंत्र जातीनिहाय जनगणना करण्यात आली नाही, तर राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारून सरकारला स्वस्थ बसू देणार नाही, असा इशारा सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी वाशिम येथे दिला.



सावता परिषदेच्या वतीने वाशिम येथे आयोजित 'ओबीसी जनगणना परिषद'ङङ मोठ्या उत्साहात पार पडली. या परिषदेला विदर्भातील विविध जिल्ह्यांतील सावता परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ओबीसी समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून मान्यवरांची उपस्थिती होती.अध्यक्षीय समारोप करताना कल्याणराव आखाडे म्हणाले, ङ'ओबीसी समाजाला २०२७ च्या जनगणनेत स्वतंत्र जातीनिहाय जनगणना करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रस्तावित जनगणना प्रक्रियेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमच नसल्याचे दिसून येत आहे. ही ओबीसी समाजाची सरळसरळ फसवणूक आहे. देशातील सर्वात मोठ्या सामाजिक घटकाची खरी लोकसंख्या आणि सामाजिक-आर्थिक स्थिती समोर आणण्यासाठी जातीनिहाय जनगणना अत्यावश्यक आहे.'ते पुढे म्हणाले, 'ओबीसींची संख्या, शैक्षणिक स्थिती, रोजगारातील प्रतिनिधित्व आणि विकासाच्या संधी यांचे अचूक चित्र समोर यावे यासाठी जातीनिहाय जनगणना होणे गरजेचे आहे. जर सरकारने ओबीसी समाजाच्या या न्याय्य मागणीकडे दुर्लक्ष केले, तर आगामी काळात राज्यव्यापी जनआंदोलन उभारले जाईल. २०२९ च्या निवडणुकीत ओबीसी समाज आपल्या ताकदीची जाणीव करून देईल.'

यावेळी उपस्थित मान्यवरांनीही ओबीसी समाजाच्या न्याय, हक्क आणि प्रतिनिधित्वाच्या प्रश्नांवर एकजुटीने लढा उभारण्याचे आवाहन केले. परिषद यशस्वी करण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील सावता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विदर्भातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. परिषदेच्या माध्यमातून ओबीसी समाजाच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीला अधिक बळ मिळाले असून आगामी काळात हा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

या जनगणना परिषदेसाठी मंचकावर माजी आमदार धनगर समाजाचे नेते हरिदासजी भदे, माजी आमदार बळीरामजी सिरसकर वाशिम शहराचे नगराध्यक्ष अनिल केंदळे उपनगराध्यक्ष राजु भांदुर्गे,सावता परिषदेचे प्रदेशअध्यक्ष गणेशजी दळवी,कार्याध्यक्ष संतोष राजगुरे,संघटक गोपाळ भुरभुरे,राजू काळे नगरसेवक नितीन मडके, गजानन लांडगे, नगरसेविका जयश्री वानखडे, नितीन उलेमाले, अशोकराव अंभोरे अनिल बळी, नगरसेविका श्रद्धा ताई इंगोले,अकोला महानगर अध्यक्ष भाजपा तथा नगरसेवक जयंत मसने संतोषजी हुसे आशिष ढोमणे,आकाश वाघमारे, राम राऊत,राजूभाऊ गुल्हाने,संतोष नागरे सुरेश मूकखमाले, सितारामजी वाशिमकर,अनिल बळी, उपस्थित होते उपस्थित आमचे स्वागत प्रदेश उपाध्यक्ष रवी देवबाजी भांदुर्गे यांनी केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १९२ ■ मंगळवार ९ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्राचा निर्धार

## ६५ पायाभूत कामांना हिरवा कंदील ; फडणवीसांचा रेल्वे प्रशासनाला दणका

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील रेल्वे फाटकांमुळे होणारे अपघात, वाहतूक कोंडी आणि नागरिकांची गैरसोय यावर कायमस्वरूपी उपाय करण्यासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या (महारेल) माध्यमातून राज्यभरातील ६५ महत्त्वाच्या रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्रात एकही रेल्वे फाटक शिल्लक राहता कामा नये, असा स्पष्ट आदेश देत मुख्यमंत्र्यांनी रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्राचा निर्धार व्यक्त केला.

सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या बैठकीत रेल्वे उड्डाणपूल, अंडरपास, पादचारी पूल आणि दळणवळण सुलभ करणाऱ्या विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. राज्यातील वाढते शहरीकरण आणि वाहनांची संख्या लक्षात घेऊन भविष्यातील गरजा डोळ्यासमोर ठेवून ही कामे करण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, नागरिकांची मागणी येण्याची वाट पाहण्यापेक्षा आवश्यक पायाभूत सुविधा आधीच उभ्या राहिल्या पाहिजेत. विशेषतः २५ हजार ते १ लाख टीव्हीयू (ट्रेन व्हेईकल युनिट) असलेल्या मार्गावरील प्रकल्पांना



प्राधान्य देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

राज्यातील शहरांसाठी एकूण ८० रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांची आखणी करण्यात आली आहे. त्यामध्ये मुंबई महानगर क्षेत्रात १७, पुण्यात १५, नागपुरात १३, नाशिकमध्ये ५, अमरावतीत ५, सांगलीत ४, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, धुळे, लातूर आणि परभणी येथे प्रत्येकी ३ प्रकल्पांचा समावेश आहे.

नागपूरमधील काही उड्डाणपुलांवर भविष्यात वाहतूक कोंडीची शक्यता असल्याचे नमूद करत मुख्यमंत्र्यांनी त्वार तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. तसेच अमरावती-बडनेरा मार्गावरील जुन्या रेल्वे उड्डाणपुलाच्या जागी नवीन पूल उभारण्याचेही आदेश देण्यात आले.

राज्याच्या विकासाला वेग देणाऱ्या या निर्णयामुळे रेल्वे फाटकांवरील धोके कमी होणार असून प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सुलभ होणार असल्याचा विश्वास शासनाने व्यक्त केला आहे. महाराष्ट्राच्या पायाभूत विकासात हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# मृत्यूशी झुंज देणाऱ्या ८ नीलगाईंना जीवदान



## जांगोणा येथे वनविभागाची तीन तासांची यशस्वी बचाव मोहीम

**वर्धा जनमाध्यम-** पाण्याच्या शोधात भटकत शेतशिवारात आलेल्या आठ नीलगाईंवर मृत्यूचे सावट आले होते. जांगोणा येथील एका खचलेल्या विहिरीत संपूर्ण कळप पडल्याने वन्यजीवांसमोर जीव वाचविण्याचे मोठे संकट उभे ठाकले. मात्र वनविभाग, ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांतून तब्बल तीन तासांची थरारक बचावमोहीम राबवून आठही नीलगाईंना सुरक्षित जीवदान देण्यात आले.

वर्धा वनपरिक्षेत्रातील वडनेर राऊंड अंतर्गत मौजा जांगोणा येथील शेतकरी श्यामराव सयाम यांच्या शेतातील विहिरीत नीलगाई पडल्याची माहिती सरपंच नितीन वाघ यांनी वनविभागाला दिली. माहिती मिळताच उपवनसंरक्षक हरविर सिंग, सहाय्यक वनसंरक्षक हरिलाल सरोदे, माधव आडे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी यांच्या मार्गदर्शनाखाली पथक घटनास्थळी दाखल झाले.

पाहणीदरम्यान पाण्याच्या शोधात आलेला आठ नीलगाईंचा कळप खचलेल्या विहिरीत पडल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर वनविभागाने जेसीबीच्या सहाय्याने विहिरीलगत रॅम्प तयार करण्याचा निर्णय घेतला. सायंकाळी सुरू झालेल्या या कामासाठी शेतकरी श्यामराव सयाम व सरपंच नितीन वाघ यांनीही सहकार्य केले.

सुमारे अडीच ते तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर रॅम्प तयार झाला. सुरुवातीला घाबरलेल्या नीलगाई बाहेर येण्यास तयार नव्हत्या. मात्र एका नीलगाईने धाडस करत रॅम्पवरून बाहेर पडताच उर्वरित सातही नीलगाईंनी तिचा पाठलाग केला आणि काही क्षणांत सर्व नीलगाई सुरक्षितपणे विहिरीबाहेर आल्या. त्यानंतर त्यांनी जंगलाच्या दिशेने धाव घेतली.

या यशस्वी मोहिमेत क्षेत्र सहाय्यक जी.एस. सयाम, वनरक्षक पी.डी. कनेरी, के.व्ही. बोचरे, ऋषी गोडसे, मनोज गांडोले, प्रशांत चिंचघरे, भूषण मुजबैले, श्रेयस पाटणकर यांच्यासह संपूर्ण पथकाने मोलाची भूमिका बजावली. वन्यजीव संवर्धनासाठी प्रशासन आणि ग्रामस्थांच्या एकजुटीचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

# तुकाराम मुंढे यांना बीडमधून पळवले, वर्ध्यात सोडले ५ कोटींच्या अपहरणकांडाने खळबळ

## डोळ्यांवर पट्टी बांधून धोत्रा परिसरात सोडले ; हिंगणघाटजवळ थरारक सुटका, बीड ते वर्धापर्यंत खळबळ

**वर्धा । हिंगणघाट जनमाध्यम-** बीड जिल्ह्यातील परळी येथील एका ठेकेदाराचे तब्बल ५ कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करण्यात आल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली असून पोलिसांचा दबाव वाढताच अपहरणकर्त्यांनी पीडिताला वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील धोत्रा परिसरात डोळ्यांवर पट्टी बांधून टाकून पलायन केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे बीड, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांत एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परळी येथील तुकाराम मुंडे हे औष्णिक विद्युत केंद्रात ठेकेदारीचे काम करतात. ४ जून रोजी दुपारी काम आटोपून घरी परतत असताना तीन अज्ञात व्यक्तींनी त्यांना जबरदस्तीने एका चारचाकी वाहनात कोंबून अपहरण केले. त्यानंतर अपहरणकर्त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधत तब्बल ५ कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याने कुटुंबीयांच्या पायाखालची जमीन सरकली. घटनेची माहिती मिळताच परळी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गुन्हे शोध पथकाने विविध ठिकाणी छापेमारी सुरू केली. तपासाचा वेग वाढत असल्याचे आणि पोलिस आरोपींपर्यंत पोहोचत असल्याचे लक्षात येताच अपहरणकर्त्यांनी आपली योजना अर्धवट सोडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, ७ जून रोजी तुकाराम मुंडे यांना हिंगणघाट तालुक्यातील धोत्रा परिसरालगत निर्जनस्थळी डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या अवस्थेत सोडण्यात आले. काही वेळाने त्यांनी आरडाओरड करून मदतीचा प्रयत्न केला. त्याचवेळी दुचाकीवरून जात असलेले आंजदा येथील प्रसन्ना घेमराज मांडवकर यांनी त्यांना पाहिले आणि तातडीने मदतीला धाव घेतली. □मुंडे यांनी घडलेला संपूर्ण प्रकार सांगितल्यानंतर मांडवकर यांनी त्यांना थेट हिंगणघाट पोलिस ठाण्यात नेले. त्यानंतर हिंगणघाट पोलिसांनी परळी पोलिसांशी संपर्क साधून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आणि मुंडे यांना त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात सुपूर्द केले.

**पोलिसांच्या दबावामुळेच सुटका-** या प्रकरणात पोलिसांचा तपास वेगाने सुरू असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विविध पथके कामाला लागली आहेत. वाढता पोलिसी दबाव, छापेमारी आणि तपासाची व्याप्ती वाढल्यानेच अपहरणकर्त्यांनी तुकाराम मुंडे यांना सोडून दिल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र या अपहरणामागे नेमके कोण, खंडणीची रक्कम का मागितली गेली आणि आरोपींचे जाळे किती मोठे आहे, याचा उलगडा तपासानंतरच होणार आहे. सध्या या थरारक अपहरण प्रकरणाने संपूर्ण परिसरात भीती आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मोबाईलचा मोह ठरला जीवघेणा रोटाव्हेटरच्या विळख्यात २३ वर्षीय युवकाचा अंत

## ट्रॅक्टरवरून पडताच शेताच्या बांधापर्यंत फरफट; मांडवा येथील दुर्घटनेने हळहळ

**वर्धा जनमाध्यम** - मोबाईल पाहण्याच्या नादात क्षणभर झालेले दुर्लक्ष एका २३ वर्षीय युवकाच्या जीवावर बेतल्याची हृदयद्रावक घटना वर्धा तालुक्यातील मांडवा येथे घडली. ट्रॅक्टरच्या मागील बाजूस उभा असताना तोल जाऊन रोटाव्हेटरमध्ये अडकलेल्या राकेश नेमाराम शियाग (वय २३) या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मांडवा येथील सुरेश भवरलाल शियाग हे ट्रॅक्टर चालक म्हणून काम करतात. रविवारी (७ जून) सकाळी ते आणि राकेश शियाग हे राजू लोणकर यांच्या शेतात रोटाव्हेटरचे काम करण्यासाठी गेले होते. शेतात मशागतीचे काम सुरू असताना राकेश हा ट्रॅक्टरच्या मागील बाजूस बसून रोटाव्हेटरमध्ये दगड अडकतात का यावर लक्ष ठेवत होता. त्याचवेळी तो मोबाईलही पाहत असल्याचे सांगितले जाते.

मोबाईलकडे लक्ष असतानाच अचानक त्याचा तोल गेला आणि तो थेट सुरू असलेल्या रोटाव्हेटरमध्ये अडकला. अचानक झालेल्या प्रकाराने चालक सुरेश शियाग यांनी ट्रॅक्टर थांबविण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत राकेश गंभीररीत्या जखमी झाला होता. ट्रॅक्टर सुरूच असल्याने तो शेताच्या बांधापर्यंत फरफटत गेला.

या भीषण अपघातात राकेशच्या पायांना, छातीला व चेहऱ्यावर गंभीर दुखापती झाल्या. त्याला तातडीने सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणाची नोंद सावंगी (मेघे) पोलिसांनी घेतली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे शेतातील काम करताना सुरक्षिततेचे नियम पाळण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# जाम बसस्थानक परिसरात 'नो पार्किंग'चा धडाका

## अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात एसटी प्रशासन आणि पोलिसांची संयुक्त कारवाई

**हिंगणघाट जनमाध्यम-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या घटत्या प्रवासी उत्पन्नाला कारणीभूत ठरणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात प्रशासनाने धडक मोहीम उघडली आहे. जाम बसस्थानक परिसरात 'नो पार्किंग झोन'ची कठोर अंमलबजावणी करत



अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार तसेच मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तथा विशेष पोलीस उपमहानिरीक्षक डॉ. प्रियंका नारनवरे यांच्या आदेशान्वये ही विशेष मोहीम राबविण्यात आली. वर्धा विभागाच्या सुरक्षा व दक्षता अधिकारी अस्मिता लोणे, बसस्थानक प्रमुख जयंत सडमाके, सुरक्षा निरीक्षक प्रवीण कुचनकर यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.या मोहिमेत समुद्रपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वानखेडे व त्यांच्या पथकाने सक्रिय सहभाग घेतला. जाम बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात खासगी वाहनांमधून अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला.एसटी महामंडळाच्या महसुलात होणारी गळती रोखणे, बसस्थानक परिसरातील वाहतूक शिस्तबद्ध करणे आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. अवैध प्रवासी वाहतुकीविरोधातील अशा कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी सुरक्षित आणि अधिकृत प्रवासासाठी एसटी सेवेचाच वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एसटीच्या महसुलावर डल्ला टाकणाऱ्यांवर धडक कारवाई

## वर्धा बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात प्रशासनाचा बडगा

**वर्धा जनमाध्यम :** राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नाला फटका देणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात आता प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली असून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आदेशानुसार वर्धा बसस्थानक परिसरात विशेष धडक मोहीम राबविण्यात आली. बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात 'नो पार्किंग झोन'ची प्रभावी अंमलबजावणी करत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

एसटी महामंडळाच्या महसुलात अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सातत्याने घट होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर वर्धा विभागाने ५ ते १५ जूनदरम्यान विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. खासगी वाहनांमधून बेकायदेशीरपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर या मोहिमेत लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडी रोखणे, प्रवाशांची सुरक्षितता वाढविणे आणि एसटीकडे प्रवाशांचा ओढा वाढविणे हा या कारवाईमागील प्रमुख उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

या कारवाईत सुरक्षा व दक्षता अधिकारी अस्मिता लोणे, सुरक्षा निरीक्षक प्रवीण कुचनकर, आगार व्यवस्थापक युधिष्ठिर रामचवरे तसेच स्थानिक वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. स्थानिक पोलिसांच्या मदतीने




नियमभंग करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली आणि आवश्यक त्या ठिकाणी दंडात्मक कारवाईही करण्यात आली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांच्या निर्देशानुसार वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील व त्यांच्या पथकाने मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे बसस्थानक परिसरात शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्थेला चालना मिळाली.

राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विविध बैठकींमध्ये अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीच्या उत्पन्नावर होत असलेल्या परिणामाबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यानुसार मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तथा पोलीस उपमहानिरीक्षक डॉ. प्रियंका नारनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर विशेष मोहिमा सुरू करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, सुरक्षित, आरामदायी आणि विश्वासार्ह प्रवासासाठी नागरिकांनी एसटी बससेवेचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन आगार प्रमुख युधिष्ठिर रामचवरे यांनी केले असून अवैध प्रवासी वाहतुकीवर भविष्यातही सातत्याने कारवाईचा बडगा उगारला जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# हाजी डॉ. हारून खान यांचे मक्कात निधन



**आष्टी शाहिद जनमाध्यम-** जवाहर उर्दू ज्युनियर कॉलेज आणि हायस्कूलचे माजी प्राचार्य हाजी डॉ. हारून खान (वय ६९) यांचे हजदरम्यान मक्कात निधन झाले. ते नागपूरहून हजासाठी रवाना झाले होते. डॉ. खानांनी याआधीही हज व उमरेचे अनुभव घेतले होते आणि हा त्यांचा चौथा हज/उमरा प्रवास होता.डॉ. खान यांनी जवाहर उर्दू ज्युनियर कॉलेज/हायस्कूलमध्ये एकूण ३६ वर्षे सेवा दिली आणि ते राष्ट्रीय एज्युकेशनल अँड कल्चरल सोसायटी, आष्टीचे सक्रिय सदस्य होते. त्यांच्या शिक्षणसेवेतील योगदानामुळे शाळेच्या प्रगतीस मोठा हातभार लागला. ते गरजू विद्यार्थ्यांच्या आणि गरिब कुटुंबांच्या मदतीसाठी सदैव पुढे उभे असत. त्यांचे मूळ गाव आष्टी शाहिद असून ते नागपूरमध्ये त्यांच्या कुटुंबासह स्थायी राहात होते. त्यांच्या अचानक निधनाने कुटुंबीय व गावामध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले जावई असा परिवार आहे,

# वादळाचा तडाखा; महाबळा शिवारात केळीबागा जमीनदोस्त

## टिनाचे शेड उडाले, झाडे उन्मळली; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान



**सेलू जनमाध्यम** तालुक्यातील महाबळा शिवारात सोमवारी दुपारी अचानक आलेल्या जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. अवघ्या काही मिनिटांच्या वादळाने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर टिनाचे शेड आणि छतही उडून गेल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली.दुपारी दीड वाजताच्या सुमारास आकाशात अचानक काळे ढग दाटून आले आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की महाबळा येथील शेतकरी विनोद महाकाळकर यांच्या शेतातील सुमारे ३०० केळीची झाडे घडासह जमीनदोस्त झाली. त्यामुळे त्यांच्या समोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. परिसरातील इतर अनेक केळी उत्पादक शेतकऱ्यांनाही मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले.वादळामुळे अनेक ठिकाणी टिनाचे शेड, ठेले आणि छप्परे उडून गेली. तसेच मोठमोठी झाडे उन्मळून पडल्याने काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. सुकळी स्टेशन ते टाकळी किटे या मुख्य मार्गावर मोठे लिंबाचे झाड रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. काही ठिकाणी वीजवाहिन्या तुटून पडल्या असून वीजखांबही वाकल्याचे चित्र दिसून आले. पावसामुळे शेतांमध्ये पाण्याचे तळे साचले असून नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीची मदत द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटाने महाबळा परिसरातील शेतकऱ्यांच्या हंगामी उत्पन्नावर मोठा घाला घातला आहे.



# पतंजलीच्या औषधांवर एफडीएचा दणका; ४५ हजारांचा साठा जप्त

## आक्षेपार्ह दावे भोवले; औषधे व जादूटोणा कायद्याचे उल्लंघन उघड

**वर्धा जनमाध्यम** वर्धा शहरातील सेवाग्राम मार्गावरील महिलाश्रमसमोरील पतंजली चिकित्सालय तथा आयुर्वेदिक सुपर मार्टवर अन्न व औषध प्रशासन विभागाने धडक कारवाई करत तब्बल ४४ हजार ७८१ रुपयांचा औषधसाठा जप्त केला. औषधांच्या लेबलवर औषधे व जादूटोणादी उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) कायद्याचे उल्लंघन करणारा मजकूर आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली.

अन्न व औषध विभागाच्या नियमित तपासणी मोहिमेदरम्यान सोमवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान दिव्य फार्मसी व पतंजली आयुर्वेद प्रा. लि. निर्मित काही आयुर्वेदिक औषधांच्या वेष्टनावर कायद्याने प्रतिबंधित स्वरूपाचे दावे आणि मजकूर आढळून आला. यामुळे संबंधित औषधसाठा तात्काळ जप्त करण्यात आला.



सदर चिकित्सालय हे संदीप पनपालिया यांच्या मालकीचे असून कारवाईवेळी व्यवस्थापक सुमित साहू उपस्थित होते. अन्न व औषध विभागाचे सहाय्यक आयुक्त निरज लोहकरे आणि औषध निरीक्षक नालंदा उरकुडे यांनी ही कारवाई केली.

या धडक मोहिमेमुळे आयुर्वेदिक औषधांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर विभागाची करडी नजर असल्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. औषधांच्या जाहिराती व लेबलवरील दावे कायद्याच्या चौकटीत असणे आवश्यक असून ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या कोणत्याही प्रकाराला मुभा दिली जाणार नाही, असा इशारा या कारवाईतून देण्यात आला आहे.

अन्न व औषध विभागाच्या या कारवाईने शहरातील औषध विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून पुढील काळात अशाच तपासण्या अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# देशात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजीचा पुरेसा साठा - सरकारचा दावा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पश्चिम आशियातील सध्याच्या संकटानंतरही कच्चे तेल, एलपीजी आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा स्थिर असल्याचे केंद्र सरकारने सोमवारी सांगितले. देशात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती सरकारने दिली.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव प्रवीण एम. खानूजा यांनी नवी दिल्लीत आयोजित आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत सांगितले की, पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीनंतरही कच्चे तेल, एलपीजी आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. देशांतर्गत रिफायन?या आणि फ्रॅक्शनेटर्समधून एलपीजीचे उत्पादन कमाल पातळीवर पोहोचले असून दररोज सुमारे ५२ ते ५३ हजार मेट्रिक टन उत्पादन होत आहे. हे संकटापूर्वीच्या पातळीपेक्षा सुमारे ६० टक्के अधिक आहे.

ते म्हणाले की, एलपीजी वितरकांकडे साठा संपल्याची कोणतीही माहिती नाही. तसेच एलपीजी वितरणाचा प्रलंबित कालावधी चार दिवसांपेक्षाही कमी झाला आहे. सध्या ९९ टक्के एलपीजी सिलिंडर बुकिंग ऑनलाइन होत असून डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड (डीएसी) पालनाचा दर सुमारे ९६ टक्के आहे.



रसायन आणि खते मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव अपर्णा एस. शर्मा यांनी पत्रकारांना सांगितले की, सध्याच्या खरीप हंगामासाठी खतांची खरेदी ८६.६५ लाख मेट्रिक टनांपर्यंत पोहोचली असून ती एकूण गरजेच्या २२.५७ टक्के आहे. त्यांनी सांगितले की, शेतक?यांनी ११.१७ लाख मेट्रिक टन सेंद्रिय खतांचीही खरेदी केली आहे, तर गेल्या वर्षी याच कालावधीत ही खरेदी ३.२० लाख मेट्रिक टन होती. यावरून सेंद्रिय पोषकतत्त्वांच्या स्रोतांकडे शेतक?यांचा कल वाढत असल्याचे दिसून येते.अपर्णा एस. शर्मा यांनी सांगितले की, सध्या खतांच्या उपलब्धतेबाबत कोणतेही मोठे आव्हान नाही. देशांतर्गत उत्पादन आणि आयात दोन्ही सुरू असून आतापर्यंत १४७.४० लाख मेट्रिक टन खतांचे उत्पादन किंवा आयात करण्यात आली आहे. जून महिन्यात २५ हजार मेट्रिक टनांहून अधिक आयातीत युरिया, डीएपी आणि एनपीके खते विविध बंदरांवर दाखल झाली आहेत. दरम्यान, बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाचे संचालक ओपेश कुमार शर्मा यांनी सांगितले की, आज दुपारी सुमारे १.३० वाजता एमटी मेरीव्हेक्स या जहाजाला आग लागल्याची माहिती मिळाली. घटनेच्या वेळी जहाजावर २४ भारतीय खलाशी उपस्थित होते. सर्व भारतीय खलाशी सध्या सुरक्षित असून त्यांच्या सुरक्षेसाठी परराष्ट्र मंत्रालय, परदेशातील भारतीय दूतावास, भारतीय नौदल आणि संरक्षण मंत्रालय यांच्या समन्वयाने प्रयत्न सुरू आहेत.

## महामानवांच्या विचारकार्याचे नियोजनबद्ध संशोधन व्हावे : मंत्री आबिटकर

**कोल्हापूर-** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अध्यासनांची उभारणी आणि विस्तार यासाठी शासन सर्वोतोपरी सहकार्य करण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे महामानवांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने तेथे त्यांच्या विचारकार्याचा नियोजनबद्ध अभ्यास आणि संशोधन व्हावे, अशी अपेक्षा महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठामध्ये कोल्हापूर जिल्हा नियोजन व विकास समितीच्या आर्थिक सहकार्यातून बांधण्यात आलेल्या शरण साहित्य अध्यासनाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण आणि उद्घाटन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि विधान परिषद सदस्य सतेज पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# सराफ बाजार उघडताच सोने-चांदीत मोठी घसरण

**जळगाव/प्रतिनिधी-**जागतिक स्तरावर अमेरिका आणि इराणमधील तणावामुळे महागाई वाढत असली, तरी भारतीय सराफ बाजारातून ग्राहकांसाठी अत्यंत दिलासादायक बातमी आली आहे. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी, म्हणजेच सोमवारी सकाळी बाजार उघडताच सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळाली आहे. २४ कॅरेट सोन्याचे दर १०४० रुपयांनी (प्रति १० ग्रॅम/तोळा) घसरले आहेत, तर चांदीच्या दरात तब्बल ५००० रुपये प्रति किलोची घसरण झाली आहे. यामुळे खरेदी करणा-या ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला.गुड रिटर्न्सने दिलेल्या माहितीनुसार, जळगाव सराफ बाजारात आज सकाळी २४ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये १०४० रुपयांची घसरण झाली. हे सोनं खरेदीसाठी तुम्हाला १,५१,६९० रुपये खर्च करावे लागतील. तर २४ कॅरेटचे १० तोळा सोनं १०४०० रुपयांनी स्वस्त झालं. हे सोनं खरेदीसाठी तुम्हाला १५,१६,९०० रुपये मोजावे लागतील.तसेच २२ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये आज ९५० रुपयांची घसरण होउन १,३९,०५० रुपये प्रति तोळ्यावर पोहोचले आहे. २४,२२ कॅरेटच्या सोन्यापाठोपाठ १८ कॅरेटच्या सोन्याच्या दरामध्ये देखील मोठी घसरण झाली आहे. १८ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये ७८० रुपयांची घसरण झाली आहे. हे सोनं खरेदीसाठी तुम्हाला १,१३,७७० रुपये खर्च करावे लागतील. आज सोन्यापाठोपाठ चांदी दरातही मोठी घसरण झाली आहे. चांदी दरात प्रति किलो ५००० रुपयापर्यंतची घसरण झाली असून यामुळे आता एक किलो चांदीसाठी २,६०,००० रुपये खर्च करावे लागतील.दरम्यान, लग्न सराई किंवा सणासुदीच्या काळात सोन्याचे दर अनेकदा कडाडलेले असतात. मात्र, आज सोन्याच्या दरात झालेली ही मोठी घसरण ग्राहकांसाठी एक सुवर्णसंधी मानली जात आहे.



# कच्च्या तेलाच्या दरवाढीचा शेअर बाजाराला फटका; सेन्सेक्स-निफ्टी घसरणीसह बंद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेल्या वाढीचा थेट परिणाम देशांतर्गत शेअर बाजारावर दिसून आला. आठवड्याच्या पहिल्याच व्यवहार दिवशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणावर विक्री केल्याने सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांमध्ये लक्षणीय घसरण झाली. दिवसाच्या सुरुवातीलाच बाजार कमकुवत पातळीवर उघडला होता. पहिल्या सत्रात काही प्रमाणात खरेदी वाढल्याने बाजाराने सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र दुपारी एकच्या सुमारास पुन्हा विक्रीचा दबाव वाढल्याने घसरण तीव्र झाली. अखेरीस सेन्सेक्स ०.९७ टक्के आणि निफ्टी १.०४ टक्क्यांच्या तोट्यासह बंद झाले.



दिवसभर जवळपास सर्वच क्षेत्रांतील समभागांवर दबाव राहिला. धातू आणि स्थावर मालमत्ता क्षेत्रातील समभागांमध्ये सर्वाधिक विक्री झाली. त्यामुळे धातू निर्देशांक २.४३ टक्क्यांनी, तर स्थावर मालमत्ता निर्देशांक २.०१ टक्क्यांनी घसरला. याशिवाय बँकिंग, माहिती तंत्रज्ञान, वाहननिर्मिती, भांडवली वस्तू, ग्राहकोपयोगी टिकाउ वस्तू, दैनंदिन उपभोग्य वस्तू, आरोग्यसेवा, तेल व वायू, सार्वजनिक क्षेत्र आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील निर्देशांकही घसरणीसह बंद झाले. व्यापक बाजारातही विक्रीचे वातावरण राहिल्याने मध्यम भांडवल निर्देशांक १.४० टक्क्यांनी, तर लघु भांडवल निर्देशांक १.९२ टक्क्यांनी खाली आला.या घसरणीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत तब्बल ६.०१ लाख कोटी रुपयांची घट झाली. मुंबई शेअर बाजारात सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजारमूल्य ४६१.१० लाख कोटी रुपयांवरून ४५५.०९ लाख कोटी रुपयांवर आले.

सेन्सेक्स ८२१.७३ अंकांच्या घसरणीसह ७३,४२१.६१ अंकांवर उघडला. व्यवहारादरम्यान तो ७३,३१८.९४ अंकांपर्यंत घसरला होता. नंतर खरेदी वाढल्याने तो ७३,९३४.३५ अंकांपर्यंत सावरला; मात्र शेवटच्या टप्प्यातील विक्रीमुळे ७१९.०८ अंकांनी घसरून ७३,५२४.२६ अंकांवर बंद झाला. निफ्टीनेही २८६ अंकांच्या घसरणीसह २३,०८०.७० अंकांवर सुरुवात केली. दिवसात तो २३,२६७.३० अंकांपर्यंत पोहोचला होता, परंतु अखेरीस २४३.७० अंकांच्या घसरणीसह २३,१२३ अंकांवर स्थिरावला.दिवसअखेर मॅक्स हेल्थकेअर, प?वर ग्रिड क?र्पोरेशन, टेक महिंद्रा, भारत इलेक्ट्?निक्स आणि नेस्ले या समभागांनी वाढ नोंदवली. दुसरीकडे विप्रो, जिओ फायनान्शियल, एटरनल, श्रीराम फायनान्स आणि हिंदाल्को इंडस्ट्रीज हे समभाग सर्वाधिक घसरणीतील प्रमुख समभाग ठरले. बाजारातील एकूण चित्र पाहता गुंतवणूकदारांमध्ये सावधगिरीचे वातावरण कायम असल्याचे स्पष्ट झाले.

# इराणचा इस्त्रायलवरील हल्ले थांबवल्याची घोषणा; लेबनॉनबाबतही दिला इशारा

**तेहरान/वृत्तसंस्था-**इस्त्रायल-इराण युद्धादरम्यान एक मोठी घडामोड समोर आली आहे. इराणने इशारा देत इस्त्रायलविरुद्ध सुरू असलेली आपली लष्करी मोहीम थांबवल्याची घोषणा केली आहे.इराणच्या सरकारी माध्यमांनुसार, इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने इस्त्रायलविरोधातील सध्याच्या लष्करी कारवायांचा समारोप जाहीर केला आहे. मात्र, इस्त्रायलने लेबनानवरील हल्ले सुरूच ठेवले तर त्याहून अधिक कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.सोमवारी इराणी लष्कराने जाहीर केले की, रविवारी उशिरा रात्री दोन्ही देशांदरम्यान झालेल्या चकमकीनंतर ते इस्त्रायलविरुद्धची कारवाई थांबवत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेहरान आणि तेल अवीव यांच्यात तातडीच्या युद्धविरामाची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितल्यानंतर इराणचे हे वक्तव्य समोर आले आहे.



तेहरानकडून डागण्यात आलेल्या क्षेपणास्त्रांना प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलने मध्य आणि पश्चिम इराणमधील काही भागांवर हवाई हल्ले केले. या हल्ल्यांमुळे संपूर्ण मध्य पूर्वेत व्यापक प्रादेशिक युद्ध भडकण्याची भीती निर्माण झाली होती.इराणच्या सरकारी दूरदर्शनने इस्फहान, कराज, तब्रीज आणि तेहरान येथे स्फोटांचे आवाज ऐकू आल्याचे वृत्त दिले. मात्र, या घटनांबाबत तत्काळ कोणतीही सविस्तर माहिती देण्यात आली नाही. तेहरानमधील प्रत्यक्षदर्शींनी राजधानीच्या पश्चिम भागात जोरदार स्फोट झाल्याचे सांगितले.इराणी अधिका-यांनी कोणत्या ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले किंवा किती नुकसान झाले याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कार्प्सने दावा केला की, इस्त्रायलने सोमवारी सकाळी केलेल्या हल्ल्यांमध्ये हवेतून डागल्या जाणा-या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा वापर केला. मात्र, यासंदर्भात अधिक तपशील देण्यात आलेला नाही.

## जळगावात 6 लाखांच्या एमडीसह मुख्य पुरवठादार जेरबंद

**जळगाव/प्रतिनिधी-**जळगाव शहरातील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणाच्या तपासात जळगाव पोलिसांना अत्यंत मोठे यश आले आहे. या गुन्ह्याला आता ड्रग्ज रॅकेटची काळी किनार असल्याचे समोर आले असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या प्रकरणातील मुख्य ड्रग्ज पुरवठादाराला बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीकडून सुमारे ६ लाख रुपये किमतीचे एमडी (मेफेड्रोन) हे हायप्रोफाइल ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. या धडक कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात पोलिसांनी आधीच रईस हरून सेफुद्दीन शेख, शौफिक सय्यद आरिफ आणि गुलाम अकबर शेख रईस पटेल या तिघांना अटक केली होती. न्यायालयाने या आरोपींना पोलीस कोठडी सुनावल्यानंतर, पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली. या चौकशी दरम्यान आरोपींनी त्यांना ड्रग्ज पुरवठा करणा-या मुख्य म्होरक्याचे नाव ओकले.मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संशयित ड्रग्ज पुरवठादारावर पाळत ठेवली आणि सापळा रचून त्याला रंगेहात अटक केली. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या एमडी ड्रग्जची किंमत सुमारे ६ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या ड्रग्जची विक्री नेमकी कुठे आणि कोणामार्फत केली जात होती, याचा तपासही आता सुरू आहे. अत्याचार प्रकरण आणि शहरात सक्रिय असलेले ड्रग्ज नेटवर्क यांचे थेट कनेक्शन उघड झाल्याने पोलिसांनी हा गुन्हा अत्यंत गांभीर्याने घेतला आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी पोलिसांनी तीन स्वतंत्र पथके तयार केली असून, ड्रग्ज पुरवठा साखळीतील इतर आरोपी आणि रॅकेटशी संबंधित व्यक्तींचा शोध सुरू आहे. दरम्यान, या कारवाईमुळे शहरातील अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायाविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले असून, येत्या काळात अशा कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



## मुलीच्या साखरपुड्याआधीच आईने तिच्या प्रियकराशी उरकले लग्न

जळगाव, ०८ जून (हिं.स.) जामनेर तालुक्यातील एका गावात धक्कादायक घटना घडली आहे. एका कुटुंबात घडलेल्या अनपेक्षित धक्कादायक घटनेमुळे परिसरात चर्चेला उधाण आले. पोटच्या मुलीचा साखरपुडा अवघ्या काही दिवसांवर आला असताना तिच्या आईने घर सोडून आपल्या परिचित प्रियकरासोबत विवाह केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे खळबळ उडाली असून विविध चर्चा रंगू लागल्या आहेत. या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जामनेर तालुक्यातील एक गावातील संबंधित महिलेच्या मुलीचा साखरपुडा अवघ्या काही दिवसांत होणार होता. मात्र, महिला अचानक घरातून निघून गेल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध घेण्यास सुरुवात केली. काही काळ तिचा संपर्क न झाल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली होती. सावत्र शोध घेतल्यानंतर हि महिला कुठे मिळून आली नाही. काही कालावधीनंतर सोशल मीडियावर संबंधित व्यक्तीच्या सोशल मीडिया खात्यावर विवाहासंदर्भातील फोटो आणि माहिती प्रसिद्ध झाल्याने हा प्रकार उघडकीस आला. ही माहिती समोर आल्यानंतर कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. घटनेनंतर संबंधित महिलेच्या पतीने पोलिसांशी संपर्क साधत परिस्थितीची माहिती दिली. कुटुंबाची सामाजिक अडचण आणि मुलीच्या आगामी साखरपुड्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मदतीची विनंती केल्याचे समजते. पोलिसांनी दोन्ही संबंधित व्यक्तींशी संपर्क साधून आवश्यक समुपदेशन केले असून पुढील घडामोडींवर लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, या घटनेची परिसरात मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे.


## शेतक-यांनी मान्सूनपूर्व पावसावर पेरणीची घाई करू नये

**नांदेड-**खरीप हंगाम २०२६ मध्ये संभाव्य अल-निनोच्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतक-यांसाठी महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सध्या जिल्ह्यात मान्सूनपूर्व पाउस सुरू असला तरी त्याचे स्वरूप वादळी वा-यासह अधूनमधून पडणा-या सरींचे असल्याने शेतक-यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

१ जूनपासून जिल्ह्यात सरासरी चार पावसाचे दिवस नोंदविण्यात आले असून, सरासरी २८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा अल-निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता असल्याने पावसात मोठा खंड पडू शकतो. त्यामुळे दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी शेतक-यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण होईपर्यंत, म्हणजे किमान ८० ते १०० मिमी पाउस झाल्याशिवाय पेरणी करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.अपु-या पावसाच्या आधारे पेरणी केल्यास बियाण्यांची उगवण बाधित होउन दुबार पेरणीची वेळ येउ शकते. त्यामुळे कृषी विभागाच्या शिफारशी व स्थानिक परिस्थितीनुसारच पेरणीचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.शेतक-यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रत्येक गावातील सहाय्यक कृषी अधिकारी गावनिहाय व्हाट्सप गट आणि इतर संपर्क माध्यमांद्वारे पेरणीबाबत सल्ला देत आहेत. सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या गावातील शेतकरी व्हाट्सप गटांमध्ये सहभागी व्हावे तसेच महाविस्तार अप डाउनलोड करून कृषीविषयक अद्ययावत माहितीचा लाभ घ्यावा, असेही कृषी विभागाने म्हटले आहे.पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवणक्षमता स्वत तपासून पाहावी. तसेच शिफारशीनुसार बीजप्रक्रिया करूनच पेरणी केल्यास पिकांची गुणवत्ता आणि उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होईल, असे कृषी तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

# पाउस, वादळात झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा -गुलाबराव पाटील

**पुणे/प्रतिनिधी-** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या वादळी वा-यासह पावसामुळे केळीसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषत? मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली परिसर, रावेर तालुक्यातील अनेक गावे आणि जिल्ह्यातील इतर भागांतील शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे करून नुकसानाचा अहवाल शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.पालकमंत्र्यांनी नुकतेच जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांच्याशी थेट संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच कोणत्याही नुकसानग्रस्त शेतक-यावर अन्याय होणार नाही याची काटेकोर दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी अंतुर्ली परिसरातील नुकसानग्रस्त शेतक-यांच्या थेट बांधावर जाउन प्रत्यक्ष पाहणी केली. केळीच्या बागा भुईसपाट झाल्याचे पाहून त्यांनी तातडीने पालकमंत्र्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि नुकसानीच्या तीव्रतेची माहिती दिली. यानंतर पालकमंत्र्यांनी तातडीने प्रशासकीय यंत्रणेला आदेश जारी केले. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले आहेत की, जिल्ह्यातील ज्या-ज्या भागांमध्ये केळीसह इतर पिकांचे नुकसान झाले असेल, त्या सर्व ठिकाणी तात्काळ पंचनामे पूर्ण करावेत. हा अहवाल तातडीने शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात यावा, जेणेकरून कोणताही पात्र शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही. नुकसानग्रस्त शेतक-यांना धीर देताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, जिल्ह्यातील ज्या शेतक-यांच्या शेतीचे व पिकांचे नुकसान झाले आहे, त्यांनी अजिबात घाबरून जाउ नये. सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतक-यांनी आपल्या भागातील संबंधित तलाठी, कृषी सहाय्यक, मंडळ अधिकारी किंवा ग्रामस्तरीय यंत्रणेशी संपर्क साधून नुकसानीची माहिती द्यावी. प्रशासनाकडून तात्काळ पंचनामे करून शासनाच्या निकषानुसार मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही केली जाईल.



# महायुतीत बंडखोरी, 'संकटमोचक' महाजन अपयशी; एकनाथ खडसे

**पुणे/प्रतिनिधी-** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जळगावमधील राजकीय वातावरण कमालीचे तापले असून महायुतीमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर आला आहे. या निवडणुकीत महायुतीमध्ये उघडपणे बंडखोरी झाली असून, या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी भाजपचे वरिष्ठ नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांच्यावर निशाणा साधत, महायुतीतील बंडखोरी रोखण्यात ते अपयशी ठरल्याचा दावा केला आहे.जळगाव विधान परिषदेच्या जागेवर महायुतीतील दोन्ही पक्षांनी दावा केला होता. शिवसेना (शिंदे गट) नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील हे आपल्या मुलासाठी ही जागा मिळवण्यासाठी आग्रही होते. मात्र, ऐनवेळी ही जागा भाजपकडे गेली आणि नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी देण्यात आली. या निर्णयामुळे गुलाबराव पाटील यांच्यासह स्थानिक शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. आमदार किशोर पाटील यांनीही उघडपणे भाजपविरोधात नाराजी व्यक्त करत, पहिला बंडखोरीचा फटका आम्हालाच बसला, असे म्हणत भाजपवर निशाणा साधला आहे.जळगावातील या सर्व बंडखोरीवर भाष्य करताना एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांचे नाव न घेता जोरदार टोमणा मारला. खडसे म्हणाले महायुतीमध्ये आता अंतर्गत कुजबूज आणि धुसफूस वाढली आहे.



स्वत?ला संकटमोचक म्हणवून घेणा-या नेत्यांना आपल्याच मित्रपक्षातील बंडखोरी आणि नाराजी रोखता आलेली नाही, हे यावरून स्पष्ट होते. जळगावात शिवसेना आणि भाजपमधील दरी आता स्पष्टपणे वाढली आहे.निवडणुकीच्या सध्याच्या स्थितीवर बोलताना खडसेंनी एक खळबळजनक वक्तव्य केले. संख्याबळाचा विचार केला तर भाजपकडे मते अधिक आहेत, त्यामुळे महायुतीचे उमेदवार नंदकिशोर महाजन हे निवडून येउ शकतात. मात्र, पडद्यामागे अजूनही निवडणुकीची खरेदी-विक्री सुरू आहे, फक्त अजून बाजारात भाव फुटलेला नाही, अशी गंभीर टीप त्यांनी रोखठोकपणे मांडली.जागावाटपावरून सुरू असलेला हा वाद केवळ विधान परिषदेपुरता मर्यादित नसून आगामी विधानसभा निवडणुकीतही याचे पडसाद उमटतील, असा इशारा राजकीय विश्लेषकांनी दिला आहे. महायुतीमधील घटक पक्ष जर आगामी काळात संगणमताने आणि एकदिलाने लढले नाहीत, तर त्यांना याचा मोठा फटका बसेल, अशीच चिन्हे सध्या जळगावात दिसत आहेत.

# एनडीएची महत्त्वाची बैठक असल्याने राष्ट्रवादीचा वर्धापन दिन 11 जून रोजी - सुनिल तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एनडीए'ची बैठक दिल्ली येथे बुधवार दिनांक १० जून रोजी बोलावली असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचा २७ वा वर्धापन दिन गुरुवार दिनांक ११ जून रोजी दुपारी २ वाजता षण्मुखानंद सभागृहात आयोजित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.या बैठकीला देशभरातील 'एनडीए'चे घटक पक्ष आणि त्या घटक पक्षांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि काही सदस्य उपस्थित राहणार आहेत. त्या बैठकीला जाणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने मुख्यमंत्री यांच्यामार्फत आमच्या उपमुख्यमंत्री आदरणीय श्रीमती सुनेत्रावहिनी आणि मला बैठकीला उपस्थित राहणे महत्त्वाचे आहे असेही सुनिल तटकरे म्हणाले.दोन वर्षापूर्वी जनतेने तिस?यांदा नरेंद्र मोदी आणि एनडीएला देशाची पुन्हा एकदा सेवा करण्याची संधी दिली. सलग तीन वेळा संधी मिळाल्यानंतर देशाची प्रगती... देशाचा विकास... जगभरात युध्दाचे सावट असताना देशाच्या प्रगतीत तितकीच केलेली वाढ अशा या दोन वर्षे पूर्ततेचा एक आढावा किंवा बैठक ही आहे असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.



दादांच्या नेतृत्वाखाली आम्ही एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर लोकसभेच्या निवडणुकीनंतर एनडीएच्या बैठकीत सहभागी झालो होतो. अशावेळी नरेंद्र मोदींचा गौरव तर आहेच एनडीएच्या भक्कमपणाने... देशात एकसंघपणाने जी वाटचाल होतेय त्या कुशल पुढील वाटचालीचेसुध्दा त्या बैठकीत मंथन होउ शकते हेही सुनिल तटकरे यांनी सांगितले.त्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसचा २७ वा वर्धापन दिन हा गुरुवार दिनांक ११ जून रोजी दुपारी २ वाजता षण्मुखानंद सभागृहात म्हणजे जिथे नियोजित केला होता तिथेच फक्त तारखेमध्ये बदल करण्यात आला आहे. याची माहिती राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या माझ्या सर्व सहका?यांना कळावी म्हणून ही पत्रकार परिषद घेतल्याचे सुनिल तटकरे यांनी सांगितले.दादांच्या दुर्दैवी निधनानंतर आम्ही वर्धापन दिन साजरा करत आहोत. अतिशय संयमाने... धिरोदत्तपणाने राष्ट्रीय अध्यक्षपदाची... उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे सुनेत्रा वहिनींनी हाती घेतल्यानंतर या कालखंडात पक्षाची उभारणी सुरू आहे. सन २०२९ मध्ये एनडीए म्हणून आम्हाला सामोरे जायचे आहे. मधल्या कालावधीत काही जिल्हा परिषद निवडणूका झाल्या आणि अजून जिल्हा परिषदेच्या निवडणूका व्हायच्या आहेत. ५० टक्के आरक्षणाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयातून आल्यानंतर ऑक्टोबर - नोव्हेंबरकडे या निवडणूका होउ शकतात. त्यामुळे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा वहिनींचा राज्यभरातील दौरा नियोजित करत आहोत. एसआयआरचा कार्यक्रम आम्ही दिला आहे. त्याचबरोबर संघटनात्मक बांधणी बुथ लेव्हलपासून राज्यपातळीपर्यंत ते देशपातळीपर्यंत मजबूत करणे पक्षाचा विस्तार करणे याला अधिक प्राधान्य देणार आहोत असे सांगतानाच सुनिल तटकरे यांनी पक्षाचा २७ वा वर्धापन दिन दादांना समर्पण... संघर्ष आणि संकल्प या विचारासह साजरा करणार आहोत असे स्पष्ट केले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# डिजिटल एल्गार

क्रॉ क्रोच जनता पार्टीने (सीजेपी) नीट व सीबीएसई परीक्षांच्या पेपरफुटीच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतरवर दिवसभर धरणे धरले, निदर्शने केली, घोषणा दिल्या आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. सीजेपीची कल्पनाच मुळात भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केलेल्या टीपणीतून झाली. अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेल्या अभिजित दीपकेने सोशल मीडियावर सीजेपीची कल्पना मांडली व त्याला अपेक्षेपेक्षा प्रचंड प्रतिसाद मिळाला. इन्स्टाग्रामवर तर सव्वा दोन कोटी फॉलोअर्स मिळाले. इन्स्टाग्राम किंवा एक्सवर स्थापन केलेल्या सीजेपीचे काय होणार, असा प्रश्न आजही अनेकांना आहे. अभिजित दीपके अमेरिकेहून शनिवारी सकाळी दिल्लीला आला. दिल्ली विमानतळावरून तो थेट संसद मार्ग पोलीस ठाण्यावर गेला आणि त्याने जंतर-मंतरवर धरणे धरण्याची परवानगी मागितली. दिल्ली पोलिसांनीही त्यांच्या संघटनेला धरणे कार्यक्रमासाठी सकाळी दहा ते सायंकाळी पाच अशी काही तासांपुरती परवानगी दिली. गेल्या अनेक वर्षांत असे प्रथमच घडले असावे. सीजेपी हा काही नोंदणीकृत राजकीय पक्ष नाही. आगामी काळामध्ये ही संघटना राजकीय पक्ष म्हणून काम करणार का, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. अभिजितने केवळ तीन प्रवक्ते जाहीर केले आहेत आणि ते तिघेही तरुण उच्चशिक्षित आहेत. हे प्रवक्ते आणि जंतर-मंतरवरील आंदोलन याशिवाय या संघटनेने सोशल मीडियातून त्यांचे सदस्य होण्यासाठीचे जे निकष जाहीर केलेत एवढेच सध्या समोर आलेले आहे; पण हे आंदोलन लक्षवेधी ठरले. सध्या पेपरफुटीमुळे पंचवीस लाख तरुणांचे भवितव्य अंधारात आहे, त्याचा संताप जंतर-मंतरवरील निदर्शनातून दिसून आला. नीट व सीबीएसईच्या परीक्षा या प्रतिष्ठेचा मानल्या जातात. मग, सातत्याने पेपर का फुटतात, परीक्षा रद्द का होतात, पुन्हा पुन्हा परीक्षा देणे यातून विद्यार्थ्यांवर मोठा मानसिक ताण येतो, त्याचे काहीच मोल नाही का? पेपरफुटीनंतर आजवर कोणावर कठोर कारवाई झाली आहे? पेपर फुटीनंतर यंदा पाच विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आजवर शिक्षा होऊन कोणीतरी तुरुंगात गेले आहे का? वारंवार पेपरफुटीच्या घटना होतात म्हणून सीजेपी शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागत आहे. जंतर-मंतरवरील एका दिवसाच्या धरणे आंदोलनानंतर शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिलेला नाही किंवा त्यांना राजीनामा द्या, असे कोणी सांगितलेले नाही. मग, पुढील आठवडाभरात तरी ते राजीनामा देतील कशावरून? पस्तीस वर्षांचा अभिजित हा मूळचा मराठवाड्यातील. पत्रकारितेचे शिक्षण पुण्यात घेतले व बोस्टन येथे पदवी मिळविण्यासाठी तो गेला. मध्यंतरी तो दोन वर्षे आम आदमी पक्षात जनसंपर्क विभागात काम करीत होता. त्यालाही एवढी अपेक्षा नव्हती की, सीजेपीच्या संकल्पनेला प्रचंड प्रतिसाद मिळेल. पेपरफुटी किंवा बेरोजगार तरुणांवर उच्चपदस्थांनी झुरळ म्हणून टीकाटीपणी करणे याचा तरुणाईला राग येणे समजता येईल; पण इन्स्टाग्राम किंवा एक्ससारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून कोणत्या संघटनेची किंवा पक्षाची स्थापना कशी होऊ शकते? विशेष म्हणजे, कोणी कोणाला पाहिलेले नसताना लाखो तरुण सीजेपीला प्रतिसाद देतात, हेच मोठे आश्चर्य आहे. पाच आठवड्यांपूर्वी नीटचे पेपर फुटले, तीन आठवड्यापूर्वी सीबीएसईतील गैरकारभार समोर आला. सरन्यायाधीशांच्या टीकाटीपणीला काही आठवडे लोटले. त्यानंतर जंतर-मंतरवर सीजेपीच्या आंदोलनाला किती लोक जमतात, याचीच सर्वांना उत्सुकता होती. दिल्ली पोलिसांनी अभिजित जेव्हा दिल्ली विमानतळावर उतरला तेव्हा त्याला ताब्यात घेतले नाही किंवा अटक केली नाही. त्याच्या हातात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुखपृष्ठ असलेल्या 'माय ऑटोबायोग्राफी' हे पुस्तक होते. ते पुस्तक उंचावतच अभिजित विमानतळावरून बाहेर आला. विमानतळावर आपल्या स्वागताला कोणी गर्दी करू नये, असे त्याने आवाहन केले होते. पोलिसांना सहकार्य करावे तसेच पोलिसांना फुले देऊन त्यांचे स्वागत करावे, असेही त्याने म्हटले होते. आपल्याला सरकारशी किंवा पोलिसांशी पंगा घ्यायचा नाही. हे त्याने स्पष्ट केले होते. जंतर-मंतरवर हजारो लोकांनी गर्दी केली होती. त्यातही सुशिक्षित तरुणांची संख्या प्रचंड होती. त्यांनी घोषणा दिल्या; पण आंदोलनात कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याविषयी सीजेपी ठाम आहे, असे वारंवार सांगितले गेले. सीजेपीच्या आंदोलनाने विरोधी पक्षांना विशेषत काँग्रेस पक्षाला खूप आनंद झाला. हजारोंच्या संख्येने तरुणाई आंदोलनात उतरत आहे म्हणजे आपल्याला सरकार विरोधात नवे हत्यार मिळाले आहे, असा विरोधी नेत्यांचा समज झाला. जे आपण करू शकत नाही, ते सीजेपी करत आहे म्हणून काँग्रेस पक्ष खूश दिसला. देशात गेल्या बारा वर्षांत भाजपने जे अमर्याद यश मिळवले आहे, त्याचा हेवा विरोधी पक्षाला वाटतो आहे. मोदींची लोकप्रियता उत्तुंग आहे. २२ राज्यांत भाजपप्रणीत एनडीएची सत्ता आहे. सर्वसामान्य जनता व मतदार भाजपबरोबर आहे. प्रत्येक निवडणुकीत विरोधी पक्ष संपत आहे किंवा संकुचित होतो आहे. सरकारच्या विरोधात जनआंदोलन उभारण्याची क्षमता आज कोणत्याही विरोधी पक्षाकडे नाही. म्हणूनच सीजेपी जंतर-मंतरवर केलेल्या आंदोलनाला काँग्रेसने पाठिंबा देऊन टाकला. सीजेपीने अजून तरी राजकीय पक्षांना दूर ठेवले आहे. कोणी राजकीय झेंडे आणू नयेत, अशी त्यांची सक्त ताकीद आहे, तरीही आम्ही तुमच्याबरोबर आहोत, हे दाखविण्याची स्पर्धा विरोधी पक्षांत दिसून आली. सीजेपीचे आंदोलन पोलिसांनी व सरकारने संवेदनशीलपणे हाताळले. पेपरफुटीची सीबीआयमार्फत चौकशी करण्यात येत असून आजवर १३ जणांना अटक झाली आहे. पेपरफुटीची पाळेमुळे खणून काढण्यात येत आहेत. नीट यंत्रणेतही काही बदल केले आहेत. शिक्षण व प्रशासनातील तज्ज्ञांची नियुक्ती केली आहे. सीजेपीचे आंदोलन हा केवळ पेपरफुटीविरोधातील संतापाचा उद्रेक आहे की नव्या राजकीय चळवळीची नांदी, हे येणारा काळच ठरवेल; मात्र या आंदोलनाने एक गोष्ट स्पष्ट केली, तरुणांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे आता कोणत्याही सरकारला परवडणारे नाही. सोशल मीडियातून उभा राहिलेला हा आवाज किती काळ टिकतो आणि कोणती दिशा घेतो, याकडे देशाचे लक्ष लागून राहणार आहे.

# जनगणनेच्या रकान्याबाहेरचा भारत

**घरगणनेच्या कामासाठी शिवारातल्या वस्त्यांवर फिरताना घरं मोजली, माणसं मोजली, खोल्या मोजल्या; परंतु दारिद्र्यात होरपळणाऱ्या त्या घरांमधला अभाव, त्या चेहऱ्यांवरली चिंता आणि त्या आयुष्यांमधली असुरक्षितता याची मोजदाद करता आली नाही. कर्तव्याचा भाग म्हणून माहिती गोळा करताना आकडे मिळाले खरे; मात्र त्या आकड्यांमागे लपलेल्या वेदनांची गणना कोणत्या पद्धतीने करायची, हा प्रश्न सतत मनात घोळत राहिला. त्या दाहक वास्तवाची ही नोंद.**

ज नगणनेच्या कामानिमित्त समृद्धीने वेढलेल्या परिसरात अभाव, वंचना, उपेक्षा यांच्या वेदनेने गदगदलेल्या नदीकाठच्या वस्त्याही फिरलो. कागदावरच्या आकड्यांमध्ये माणसे आणि घरे मोजण्याचे काम होते. पण प्रत्यक्षात वंचित समाजाच्या आयुष्यावर उमटलेल्या जखमा वाचण्याचा क्लेशकारक अनुभव मिळाला.

शिवारात विखुरलेली काही झोपडीवजा घरे होती. घराला दरवाजा नव्हता. कुठे पत्रा उभा, कुठे आडवा लावलेला. आत डोकावले की चार-सहा भांडीकुंडी, एखादी जुनी चटई, अंगावरची फाटकी-विरलेली वस्त्रं आणि तरीही जगण्यासाठी सुरू असलेली केविलवाणी धडपड दिसायची. छोट्याशा जागेत थाटलेला संसार आणि त्याहून संसारासाठी सुरू असलेला मोठा संघर्ष...

जनगणनेच्या ॲपमध्ये वेगवेगळे प्रश्न होते. घरात रेडिओ आहे का? टीव्ही आहे का? मोटरसायकल, कार, लॅपटॉप, इंटरनेट, गॅस, स्वच्छतागृह, मोबाइल आहे का? घर कोणत्या साहित्याचं बांधलं आहे? किती खोल्या आहेत? पण वस्त्यांवर फिरताना दारिद्र्याच्या गर्तेत कोसळून पडलेलं वास्तव पाहिल्यावर हे प्रश्न विचारण्याची हिंमत झाली नाही. किंबहुना गरजच वाटली नाही.

ज्यांच्या घराला नीट दार नाही, ज्यांच्या पोटात दोन वेळचं पोटभर अन्न नाही, ज्यांच्या चेहऱ्यावर कुपोषणाच्या खाणाखुणा विखुरल्या आहेत, ज्यांच्या डोळ्यांत उद्याच्या दिवसाची अस्वस्थ अनिश्चितता आहे, अशा लोकांना 'तुमच्याकडे लॅपटॉप आहे का?' हा प्रश्न विचारणे म्हणजे काळाने दिलेल्या भळभळत्या जखमेवर पुन्हा डागण्या देण्यासारखं वाटत होतं.

कृश शरीरयष्टी, खपाटीला गेलेली पोटे, हाडांना चिकटलेली चामडी, उन्हावाऱ्याने रापलेले चेहरे, मळकटलेले, कळकटलेले, विरलेले कपडे... दारिद्र्याची व्याख्या संशोधन निबंधात लिहिलेली नसते तर अशा दुर्गम भागातल्या अभावग्रस्त वस्त्यांमधून चालताना ती प्रत्येक पावलावर दिसते.

घरगणनेचे काम सुरू असताना आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. प्रगणक प्रश्न विचारायला गेला की समोरच्या माणसाच्या चेहऱ्यावर एक अनामिक अस्वस्थतेची लहर पसरलेली दिसायची. सरकारकडून काय मिळणार यापेक्षा जे मिळतेय ते हिरावले तर जाणार नाही ना, अशी भीती लोकांच्या मनात जास्त होती.

अनेक महिलांचा पहिलाच प्रश्न असायचा, 'सर, तुम्ही ही माहिती घेऊन गेल्यावर सरकार आमच्या लाडक्या बहिणीचे पैसे बंद करणार नाही ना?' तोट्याची हमी असलेला शेती धंदा करणारे शेतकरी विचारायचे, 'घर, गाडी, टीव्ही, गॅस, मोबाईल याची माहिती दिल्यानंतर आमच्या आहेत त्या कांद्याच्या चाळीसारख्या योजना बंद होणार नाहीत ना?' मी माझ्या परीने त्यांना समजावून सांगायचा प्रयत्न केला. ही जनगणना आहे. या माहितीच्या आधारे कोणाच्याही योजना बंद होणार नाहीत. पण त्यांच्या चेहऱ्यावरली, डोळ्यातली शंका पूर्णपणे विरघळत नव्हती.


एका वस्तीवरून दुसऱ्या वस्तीवर जाताना मनात एकच विचार डोकावत असे, की तो म्हणजे ज्यांच्या आयुष्यात अजूनही मूलभूत गरजांचीच कमतरता आहे, ते लोक नवीन लाभ बाजूला ठेवून आधीपासून मिळणारा तुटपुंजा आधारही हातातून निसटेल की काय, या भीतीत जगत आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या विकासाच्या दाव्यातील हवा काढून घेणारा हा कदाचित सर्वांत काळा विनोद आहे.

एका बाजूला देश जागतिक दर्जाच्या अर्थव्यवस्थेची स्वप्नं पाहतोय. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात प्रवेश करतोय. डिजिटल क्रांतीचे गजर करतोय. आणि दुसऱ्या बाजूला अभावात दिवस कंठत असलेले काही नागरिक अजूनही शासन दरबारी आपली नोंद झाली, तर मिळणारा आधार बंद होईल की काय, या भीतीत जगत आहेत.

त्या वस्त्यांतून फिरताना अनेक प्रश्न मनाला छळत राहिले. हे लोक नेमके काय खात असतील? पिण्याच्या पाण्यासाठी नळाचे कनेक्शन नसताना कोठून पाणी वाहून आणत असतील? गॅस कनेक्शन असलं तरी सिलिंडर भरण्यासाठी पैसे नसतील तर त्याचा उपयोग काय? वादळवाऱ्यात, पावसाच्या दिवसांत कच्चीबच्ची घेऊन पत्र्याच्या घरात झोपताना त्यांना सुरक्षित वाटत असेल का? उघड्यावर संडासला जाताना मनात हिंस्र श्वापदांची भीती वाटत नसेल का? हैराण करणाऱ्या तापलेल्या उन्हात पत्र्याच्या लहानशा शेडमध्ये यांचा दिवस कसा जात असेल? तापलेल्या पत्र्याखाली रात्र काढताना अंगाची लाही लाही होत नसेल का?

अभाव आणि दारिद्र्याने गांजलेल्या या लोकांना सध्या या व्यवस्थेत आवाज राहिलेला नाहीये. ते आंदोलन करत नाहीत, मोर्चे काढत नाहीत. एक्सवर 'ट्रेंड' चालवणे त्यांना माहीत नाही. त्यांना फेसबुकवर पोस्ट लिहून 'हॅशटॅग' चालवता येत नाही. ते यू-ट्यूबवर व्हिडिओ टाकत नाहीत. या सगळ्या गोष्टींपासून ते कोसो दूर अंतरावर आहेत. ते फक्त जगत राहतात. कधी अर्धपोटी तर कधी उपाशीपोटी. उद्याची आशा बाळगत कसेबसे दिवस कंठत राहतात.

पूर्वी वर्तमानपत्रांच्या पानांमध्ये या लोकांच्या कहाण्या ठळक स्वरूपात प्रसिद्ध होत असत. वृत्तवाहिन्यांवर अभाव, दारिद्र्य, वंचना आणि शोषणाच्या वेदनांना प्राइम टाइममध्ये स्थान मिळायचे. गेल्या काही वर्षांपासून परिस्थिती झपाट्याने बदलत गेलीय. दारिद्र्याने पिचलेल्या माणसांच्या करुण कहाण्या, त्यांचे जगणे, भोगणे माध्यमांतून जवळजवळ हद्दपार झाल्यात जमा आहे. माध्यमांचा इंडिया आणि गरिबांचा भारत वेगळा आहे.




ज्या घराला दरवाजाच नाही, त्या घरावर घर क्रमांक कुठे लिहायचा? याचा मनातल्या मनात विचार करत होतो. नकळत मनात विचार आला घरगणना करणे (म्हणजे घर मोजणं) किती सोपे आहे. सूचनांनुसार हे काम आपण केले. मात्र घरांची गणना करताना, वेदनांची गणना करायचे राहून गेले. घरगणनेचे आहे तसंच वेदना मोजण्यासाठीचे एखादे ॲप बाजारात येईल?

जनगणनेच्या फॉर्ममध्ये घराची माहिती भरली गेली. भौतिक सुविधा नोंदविल्या गेल्यात. परंतु अभाव कुठे कसा नोंदवायचा? कोणता की बोर्ड वापरून असुरक्षितता कुठे कशी नोंदवायची? हतबलता कोणत्या लिपीत लिहायची? कोणत्या रकान्यात अगतिकता भरायची? वर्षानुवर्षे न बोलता सहन केलेल्या वेदनांची नोंद कोणत्या चौकटीत कशी करायची? हे सगळे प्रश्न मात्र अनुत्तरित आहेत. कालही होते आणि आजही आहेत.

घरगणना करताना आणखी एक गोष्ट लक्षात आली. शासकीय लाभापासून आपण वंचित राहू की काय, ही भीती अनेकांच्या मनात इतकी खोलवर रुजली आहे, की अनेकदा लोक खरी माहिती सांगायलाही कचरतात.

खरे तर गरिबाकडे गमावण्यासारखे फारसे काही नसते. तरीही त्याला भीती वाटते. कारण त्याच्या जगण्याला आधार देणारी एखादी योजना बंद झाली तर? ही भीती अचानक निर्माण झालेली नाही. व्यवस्थेनेच ती वर्षानुवर्षे त्याच्या मनात रुजवली आहे. ही भीतीच आपल्या समाजव्यवस्थेवरची सर्वात तीव्र, सर्वात वेदनादायी टिप्पणी आहे.

जनगणनेदरम्यान घर, मोबाइल, इंटरनेट, गॅस, शौचालय आणि पिण्याच्या पाण्यासारख्या सुविधा आहेत का, याची माहिती घेतली जाते; मात्र कुटुंबावर किती कर्जाचा बोजा आहे, हा महत्त्वाचा प्रश्न मात्र विचारला जात नाही.

घरोघरच्या मुलांशी संवाद साधला. दारिद्र्याचे चटके रोजच्या जगण्यात सोसणाऱ्या काही कुटुंबांतील मुलांच्या डोळ्यांत वयाला न शोभणारी उदासीनता दिसली. अपवाद वगळता नियमित शाळेत जाऊन शिकण्याची जिद्द, उमेद आणि स्वप्ने अनेक मुलांमध्ये हरवलेली जाणवली. मात्र मुली तुलनेने अधिक आत्मविश्वासाने 'आम्हाला शिकायचे आहे' असे सांगताना दिसल्या. गरिबीशी दोन हात करण्यात पालकांची सारी ऊर्जा खर्च होत असल्याने मुलांचे शिक्षण हा पालकांच्या आयुष्यातील केंद्रबिंदू न राहता अनेकदा तो दुय्यम विषय बनून जातो!

मध्यमवर्गीय आयुष्याने मला उन्हापासून बचाव करण्याची साधनं दिली होती;

पण त्या वस्त्यांतील लोकांना आयुष्याच्या उन्हापासून बचाव करण्यासाठी कुठलेच छप्पर लाभे नव्हते.

ग्रीष्माच्या रखरखत्या उन्हाने माझं शरीर होरपळत होतं, तर समोर उभ्या असलेल्या दारिद्र्याच्या विदारक वास्तवाने मनाला असा दाह दिला की त्या उन्हाचाही विसर पडावा.

**भाऊसाहेब चासकर**

## नुसते वृक्षारोपण नको, त्यांचे संगोपन गरजेचे

सद्या जिकडे पाहावे तिकडे वृक्षारोपनाचे महत्त्व वाढताना दिसते आहे कोणत्याही व्यक्तीचा वाढदिवस असो अगर उत्तर कार्य यावेळी इतर खर्चाला फाटा देऊन झाडे लावण्याचे महत्व सांगून बऱ्याच लोकांना झाडे वाटली जातात पण प्रत्यक्षात किती लोकांनी झाडे जगवली हा मात्र संशोधनाचा विषय आहे. नुकताच जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून अनेकांनी वृक्षारोपण केले आहे मात्र यातील किती झाडे जगणारं हा संशोधनाचा विषय आहे दिवसेंदिवस वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे, पावसाचे प्रमाण कमी होत आहे, प्रदूषण वाढत आहे, रोज एक आजार निर्माण होत आहेत नद्या तर गटार गंगा झाल्या आहेत. निसर्गचक्र बदल्यामुळे अशा संकटाना सामोरे जावे लागत आहे हे सर्व ठाऊक असून सुद्धा याकडे गांभीर्याने कोणी लक्ष देत नाहीत. पण संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांनी 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे ! पक्षीही सुस्वरे आळवित !' या प्रसिद्ध अभंगाद्वारे वृक्षाबद्दल प्रेमभावना व्यक्त करून जनजागृती केली आहे. तसेच प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी आपल्या गावी उभी केलेली देवराई निश्चितच प्रेरणादायी आहे यामध्ये महिलांचा मोठा सहभाग आहे, सरकार दरवर्षी पावसाळा सुरू झाला की वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करून कोट्यवधी रुपयांची झाडे लावण्यावर भर देते पण नंतर त्याकडे लक्ष देत नाही ही शोकांतिकाच म्हणावी लागेल ? निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो कधी नाही म्हणत नाही. तरी सुद्धा आपण त्याचा विचार करत नाही. झाडे लावा झाडे जगवा ! नुसता म्हणायचे नाही तर कृतीत आणणे गरजेचे आहे. आगामी काळात पावसाळा सुरु होईल त्या अनुषंगाने देशातील प्रत्येक राज्याच्या वनमंत्र्यांनी लागवडीचे उद्दिष्ट ठरवले असतील. ते पूर्ण करून त्याची जोपासना करणे गरजेचे आहे. आणि ही जबाबदारी प्रत्येकाची आहे. याची जाणीव ठेवली तर आपला देश सुजलाम् सुफलाम् व्हायला वेळ लागणार नाही.

**राजू जाधव**

## वाढत्या उष्णतेला काँक्रिटची जंगले कारणीभूत

आपल्या महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या शहरीकरणामुळे सर्वच शहरांचे तापमान प्रचंड प्रमाणात वाढत चालले आहे. विकासाच्या नावावर घनदाट जंगले नष्ट करून सिमेंट कॉंक्रीटची जंगले वाढवण्यावर सर्वात जास्त भर दिला जात असल्याचाच हा मोठा दुष्परिणाम दिसत आहे. पूर्वी राज्यातील विदर्भ हाच प्रचंड उष्णतेचा विभाग म्हणून ओळखला जात होता. मात्र आता संपूर्ण राज्यातील भागांनाच उष्णतेचा त्रास सहन करावा लागत आहे. पुण्यासारखे शहर पूर्वी इतर शहरांच्या तुलनेने थंड मानले जात असे. परंतु, तेही आता वाढत्या उष्णतेचे बळी ठरले आहे. तिथे वाढती हिट आयलंड म्हणजेच उष्णतेची बेटे तयार होत आहेत. आजपर्यंत पुण्यामध्ये ४३ आणि ४४ अंशाच्या पुढे पुण्यामध्ये तापमान नोंदवले गेले आहे. मागील दहा वर्षांतील हे या शहरातील सर्वाधिक तापमान असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. वेगाने वाढणारे शहरीकरण तापमानवाढीला मोठा हातभार लावत आहे. सिमेंट कॉंक्रीटमुळे शहराच्या विविध भागात अशी बेटे तयार झाली आहेत. शहरातील झाडांची बेसुमार कत्तल हेदेखील तापमानवाढीचे प्रमुख कारण आहे. वाढत्या तापमानामुळे पुण्यातील जनजीवनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. विशेषतः कडक उन्हाच्या काळात रस्त्यावर प्रवास करणाऱ्यांना त्याचा सर्वाधिक फटका बसत आहे. त्याचबरोबर पदपथावरील किरकोळ विक्रेत्यांना वाढते ऊन सहन करणे अशक्य होत आहे. काचा लावलेल्या इमारती यामुळे देखील तापमानवाढीला मदत मिळत आहे. सिमेंट कॉंक्रीटमुळे उष्णता शोषली जाते आणि त्यानंतर त्यातून ज्या उष्णतेचे उत्सर्जन होते ती पुन्हा कॉंक्रिटचेच दुसरे स्ट्रक्चर शोषून घेते. जरी सूर्य मावळला तरी किंवा रात्रीच्या काळातही उष्णता आणि तापमान कायम राहाते. पायाभूत विकास करणे म्हणजे पर्यावरणाला नाश करणे नव्हे, हे सध्याच्या राज्यकर्त्यांना समजेनासे झाले आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

# राणा दाम्पत्य : अमरावतीच्या राजकारणातील न सुटलेले समीकरण

अ मरावतीच्या राजकारणाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा अनेक नेत्यांची नावे त्यामध्ये येतील, मात्र गेल्या दोन दशकांमध्ये सातत्याने चर्चेत राहिलेले आणि समर्थक-विरोधकांना सारखेच विचार करायला भाग पाडणारे नाव म्हणजे रवी राणा आणि नवनीत राणा. हे दाम्पत्य नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले आहे. त्यांच्यावर टीका करणाऱ्यांची संख्या मोठी आहे, तर त्यांच्यावर विश्वास ठेवणारा वर्गही तितकाच मजबूत आहे. त्यामुळे राणा दाम्पत्याचे राजकारण समजून घेण्यासाठी केवळ पक्षीय चष्म्यातून पाहून चालत नाही.

रवी राणा यांचा राजकीय प्रवास पाहिला तर तो पारंपरिक राजकीय घराण्यातून आलेल्या नेत्यांसारखा नाही. मोठा राजकीय वारसा, सहकारी साखर कारखाने, शैक्षणिक संस्था किंवा घराणेशाहीची पार्श्वभूमी नसताना त्यांनी स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. त्यासाठी त्यांनी संघर्ष केला, विविध राजकीय समीकरणे जुळवली, मित्र बदलले, विरोधक बदलले आणि परिस्थितीनुसार भूमिका देखील बदलल्या. याच कारणामुळे त्यांच्या विरोधकांकडून त्यांच्यावर संधीसाधूपणाचे आरोप होतात. नवनीत राणा यांचाही प्रवास तितकाच वैशिष्ट्यपूर्ण राहिला आहे. संसदेत असो, प्रसारमाध्यमांमध्ये असो किंवा एखाद्या आंदोलनात, त्यांनी स्वतःची आक्रमक आणि स्पष्टवक्ती प्रतिमा तयार केली. विदर्भातील महिला नेतृत्वामध्ये त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे त्या केवळ रवी राणा यांच्या पत्नी म्हणून नव्हे तर स्वतंत्र राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणूनही ओळखल्या जातात. राणा दाम्पत्यावर सर्वात मोठी टीका ही सत्तेसाठी कायम धडपड करणारे नेतृत्व अशी केली जाते. अनेकांना वाटते की त्यांची राजकीय भूमिका ही विचारसरणीपेक्षा सत्तेच्या समीकरणांवर अधिक आधारित असते. मात्र राजकारणाच्या वास्तवाकडे पाहिले तर सत्तेपासून दूर राहून प्रभाव टिकवणे अत्यंत कठीण असते. त्यामुळे सत्ता मिळविण्याचा प्रयत्न हा प्रत्येक राजकीय नेत्याचा स्वाभाविक भाग असतो. फरक एवढाच असतो की काही जण ते उघडपणे करतात आणि काही जण पडद्यामागून. अमरावतीमध्ये अनेक प्रभावी नेते झाले. यशोमती ठाकूर, बच्चू कडू, खोडके कुटुंब यांसारख्या नेत्यांनी आपापल्या पद्धतीने जनाधार निर्माण केला. तरीही राणा दाम्पत्याला पूर्णपणे राजकीयदृष्ट्या संपविणे कोणालाही शक्य झाले नाही. याचे कारण केवळ त्यांची आर्थिक किंवा संघटनात्मक ताकद नाही, तर लोकांमध्ये कायम चर्चेत राहण्याची आणि स्वतःची राजकीय उपयुक्तता टिकवून ठेवण्याची क्षमता आहे. आजही अमरावतीच्या राजकारणात असे कोणतेही नेतृत्व दिसत नाही जे राणा दाम्पत्यासाठी कायमस्वरूपी अडथळा निर्माण करू शकेल. त्यामुळे ते सत्तेपासून काही काळ दूर राहिले तरी पुन्हा नव्या स्वरूपात आणि नव्या समीकरणासह पुढे येण्याची त्यांची क्षमता कायम आहे. भविष्यातील राजकारणाचा विचार केला तर नवनीत राणा यांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तरी त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. उलट अशा परिस्थितीत राष्ट्रवादीलाही त्याचा फायदा होऊ शकतो.

पश्चिम विदर्भात, विशेषतः अमरावती जिल्ह्यात, राणा दाम्पत्याची राजकीय ताकद आणि जनसंपर्क यंत्रणा आजही प्रभावी आहे. त्यामुळे कोणत्याही पक्षासाठी ते उपयोगी राजकीय भागीदार ठरू शकतात. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुमित्रा पवार यांच्यासारखे अनुभवी आणि चाणाक्ष नेतृत्व आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीत पश्चिम विदर्भातील समीकरणे मजबूत करण्यासाठी राणा दाम्पत्यासारख्या प्रभावी नेतृत्वाचा विचार होणे स्वाभाविक आहे. राजकारणात कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, तर कायमस्वरूपी असतात ते हितसंबंध. त्यामुळे भविष्यात कोणतेही नवीन समीकरण घडले तर त्याकडे आश्चर्याने पाहण्याचे कारण नाही. राणा दाम्पत्याचे राजकारण सर्वांना आवडेलच असे नाही. त्यांच्या अनेक भूमिकांवर नैतिकतेच्या आधारावर प्रश्न उपस्थित होऊ शकतात. मात्र एक गोष्ट मात्र त्यांचे कट्टर विरोधकही नाकारू शकत नाहीत की त्यांनी आपले अस्तित्व स्वतःच्या हिमतीवर, कौशल्यावर, धाडसावर आणि राजकीय चातुर्यावर उभे केले आहे. ते राजकारण नैतिकतेच्या आदर्श चौकटीत बसते की नाही हा वेगळा वादाचा विषय असू शकतो, परंतु राजकीय स्पर्धेच्या मैदानात स्वतःला सतत टिकवून ठेवणे ही देखील एक कला असते. आणि ही कला राणा दाम्पत्याने आत्मसात केली आहे. म्हणूनच अमरावतीच्या राजकारणात राणा दाम्पत्य हे केवळ दोन व्यक्तींचे नाव नसून एक असे राजकीय समीकरण आहे, जे अनेकांनी सोडविण्याचा प्रयत्न केला, पण आजपर्यंत पूर्णपणे उलगडू शकलेले नाही.

**ॲड. धनंजय देशमुख**
अमरावती
९२८४३८२१०२

मंगळवार, दि. ९ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# पालकमंत्र्यांनी लोकशाहीचा गळा घोटला..!

## पैशाच्या व सत्तेच्या जोरावर निवडणूक बिनविरोध – सचिन नाईक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ८ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत सत्तेचा आणि पैशाचा गैरवापर करून लोकशाही मूल्यांची पायमल्ली करण्यात आली असून मतदारांचा निवडीचा अधिकार हिरावून घेण्यात आला आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांनी केला. पालकमंत्र्यांच्या हस्तक्षेपामुळे निवडणूक प्रक्रिया प्रभावित झाली असून काही उमेदवारांवर अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकण्यात आल्याचा दावाही त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

नाईक म्हणाले की, निवडणूक ही लोकशाहीचा आत्मा असताना सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना संधी न देता बिनविरोध निवडणुकीचा मार्ग स्वीकारला. यामुळे मतदारांना पर्यायापासून वंचित राहावे लागले. सत्तेचा माज आणि आर्थिक ताकदीच्या बळावर लोकशाहीला कमकुवत करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची टीका त्यांनी केली. यावेळी त्यांनी राज्यातील सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधत पैशाच्या जोरावर आणि कथित ३२ टक्के कमिशनच्या राजकारणातून सरकार चालविले जात आहे. उमेदवार अर्ज मागे घेत असताना त्यांच्या मागे सत्ताधारी नेत्यांचे कार्यकर्ते उभे असल्याचे चित्र संपूर्ण जिल्ह्याने पाहिले असा आरोप केला. लोकशाही वाचविण्यासाठी आता नागरिकांनीच पुढाकार घेण्याची गरज असून भ्रष्टाचाराविरोधात व्यापक जनआंदोलन उभारण्याची वेळ आल्याचेही ते म्हणाले. दरम्यान, काही नगरसेवकांनी देखील या घडामोडींवर नाराजी व्यक्त केली असून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. निवडणूक आयोगाने या प्रकाराची दखल घ्यावी तसेच भविष्यात अशा परिस्थितीत मतदारांना पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी 'नोटा'सारख्या पर्यायाबाबतही विचार व्हावा, अशी मागणी काँग्रेससह विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. स्थानिक प्रश्नांशी संबंध नसलेल्या व्यक्तीला उमेदवारी देण्यात आल्याबद्दलही काँग्रेसने आक्षेप नोंदविला. स्थानिक नेतृत्वाला डावलून बाहेरील व्यक्तीला संधी देणे म्हणजे मतदारांच्या भावना आणि स्थानिक कार्यकर्त्यांचा अपमान असल्याचे नाईक यांनी म्हटले.यापुढे जिल्ह्यात काँग्रेस अधिक आक्रमक आणि सक्षम विरोधी पक्षाची भूमिका बजावणार असून आगामी जिल्हा परिषद निवडणुका नियोजनबद्ध पद्धतीने लढविण्याची तयारी सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. संघटनात्मक पातळीवर तालुका अध्यक्ष, एससी-एसटी सेल, ओबीसी सेल आणि अन्य आघाड्यांमध्ये मोठे फेरबदल करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच "सर्वोदय संकल्प अभियान" अंतर्गत एक हजार तरुणांना निवडणूक प्रक्रिया, संविधानिक मूल्ये आणि राजकीय नेतृत्वाचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या पत्रकार परिषदेला आरिज बेग, संजय ठाकरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 10 जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा हल्लाबोल..

## सरसकट कर्जमाफी व यवतमाळ जिल्ह्याचा पीक विमा योजनेत समावेश करण्याची प्रमुख मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ८ :** खरीप हंगाम 2025 मध्ये यवतमाळ जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती व पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असताना, 2025 च्या पीक विमा लाभातून यवतमाळ जिल्ह्याला वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

या संदर्भात लोकप्रतिनिधींची उदासीनता आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळू शकला नसल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. त्यातच राज्य सरकारने कर्जमाफीची घोषणा केली असली, तरी विविध अटी व निकष लावून अनेक शेतकऱ्यांना त्यापासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. त्यामुळे ही कर्जमाफी अपुरी व अन्यायकारक असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.




या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने दि. 10 जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर "हल्लाबोल आंदोलन" आयोजित करण्यात आले आहे. हे आंदोलन कोणत्याही पक्षाचे नसून शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी उभारलेले असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.यवतमाळ जिल्ह्याचा तात्काळ पीक विमा योजनेत समावेश करावा तसेच जाहीर करण्यात आलेली कर्जमाफी कोणत्याही अटींशिवाय सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट लागू करावी, या प्रमुख मागण्या घेऊन जिल्ह्यातील हजारो शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार आहेत. या आंदोलनात जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या न्याय, हक्क आणि अधिकारांसाठी एकजुटीने लढा उभारावा, असे आवाहन आयोजक शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे

# विवाहितेचा उपचारा दरम्यान मृत्यू..!

## पैशासाठी मृतदेह रोखून ठेवला,आरोग्यधाम हॉस्पिटल वादाच्या भोवऱ्यात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. ८ :** शहरातील डॉक्टर संत रामराव बापू महाराज आरोग्यधाम हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर सेंटर येथे उपचारासाठी दाखल असलेल्या 21 वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्यानंतर मृतदेह ताब्यात देण्यास विलंब केल्याचा आरोप नातेवाईकांनी केल्याने सोमवारी दिग्रसमध्ये तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

मृत महिला सेजल रवी राठोड (वय 21, रा. वसंतनगर) हिला छातीत गाठ असल्याने काही दिवसांपूर्वी संबंधित रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, महिलेला मधुमेहाचा त्रास असतानाही आवश्यक तपासण्या व शहानिशा न करता शस्त्रक्रिया करण्यात आली. उपचारादरम्यान तिची प्रकृती खालावली आणि आयसीयूमध्ये उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. महिलेच्या मृत्यूनंतर रुग्णालय प्रशासनाने थकीत बिलाची रक्कम जमा करण्याची अट घालत मृतदेह ताब्यात देण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. मृत्यूनंतर सुमारे पाच तास उलटल्यानंतरही मृतदेह न मिळाल्याने नातेवाईक व वसंतनगर येथील ग्रामस्थ संतप्त झाले. त्यांनी दिग्रस पोलीस ठाणे गाठून संबंधित डॉक्टरांविरोधात तक्रार देण्याची मागणी केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांनी हस्तक्षेप करून रुग्णालय प्रशासनाला मृतदेह तातडीने नातेवाईकांच्या स्वाधीन करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. ग्रामस्थांनी मृतदेह वसंतनगर येथे नेऊन अंत्यसंस्कार केले. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रुग्णालय परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर, शायर बेताब यांच्या शायरीने जिंकली मने



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ८ :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती व सकल धनगर समाजाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सामाजिक एकात्मता, महिला सक्षमीकरण आणि अहिल्यादेवींच्या आदर्श कारभाराचा जागर घडला.

सकाळी अमोल इंडस्ट्रीज येथून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर महात्मा फुले चौक व येरावार चौकातील स्मारकांवर महाआरती व अभिवादन कार्यक्रम पार पडले. विविध राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव केला. सायंकाळी बचत भवनातील कार्यक्रमात शायर बेताब यांच्या प्रभावी शायरीने उपस्थितांची मने जिंकली. "जुल्म सितम की तोड़ दी बेड़ी, खुश हुई हर नारी..." या ओळींमधून त्यांनी अहिल्यादेवींच्या कर्तृत्वाला शब्दबद्ध केले. शायरीनंतर टाळ्यांचा कडकडाट आणि 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या घोषणांनी सभागृह दणाणून गेले. यानंतर अहिल्यादेवींच्या मूर्तीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले. अहिल्यादेवींच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन समाजकार्यात पुढे यावे, असे आवाहन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पांडुरंग खांदवे यांनी केले.

## थोडक्यात



### शेतातील गोठ्याला आग दोन लाखाचे नुकसान..!

**झरी :** तालुक्यातील आमलोन येथील घटना असून शनिवारी दुपारी दोन वाजता च्या दरम्यान शेतातील गोठ्याला आग लागून दोन लाख रुपयाचे जवळपास नुकसान झाले आहे. जगन्नाथ तुळशीराम ताजने रा. आमलोन असे त्या नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे नाव आहे. एका अज्ञात शेतकऱ्याने धुर्यावरील कचरा पेटविण्याचे समजते. आगीने दुपारी रौद्ररूप धारण करताच आग आटोक्यात न आल्याने शेतातील असलेल्या गोठ्यात दोन गोरे अंदाजे 50 हजार रुपये किमतीचे व शेतीचे अवजारे फ्रीज पेट्रोल पंपचे फवारणी यंत्र कुटार डेळीफाटे टीन पत्रे असे अंदाजे दोन लाख रुपयाचे नुकसान झाले आहे त्याबाबत संबंधित तलाठी ला माहिती दिल्यानंतर त्यांनी स्पॉट पंचनामा केला आहे.ऐन पावसाळ्याच्या तोंडावर शेतीचे अवजारे आगीत भस्म झाल्याने व वहितीचे गोरे होरपळून गेल्याने शेतकऱ्यासमोर संकट उभे झाले आहे. संबंधित विभागाने पंचनामा करून शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळावा असे त्या शेतकऱ्यांची मागणी आहे.

### महिलेची गळफास घेऊन आत्महत्या..! परिसरात हळहळ

**उमरखेड :-** पोफाळी पोलीस स्टेशन हद्दीतील हातला येथे एका 40 वर्षीय महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.
ग्राम हातला येथील पोलीस पाटील सतीश काळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पल्लवी प्रवीण शिंदे, वय 40 वर्ष, रा. हातला, ता. उमरखेड, जि. यवतमाळ यांनी दि. 08/06/2026 रोजी मध्यरात्री 12.00 ते पहाटे 5.30 वाजताच्या दरम्यान राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.
घटनेची माहिती मिळताच पोफाळी पोलीस ठाण्याचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह ताब्यात घेऊन दोन पंचांसमक्ष महिला पोलीस अधिकाऱ्यामार्फत इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, उमरखेड येथे पाठविण्यात आला.
वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून प्राथमिक अहवाल दिला असून, गळफास घेतल्याने मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले आहे.
मृत महिलेच्या नातेवाईकांकडून तक्रार प्राप्त होताच पुढील कायदेशीर कारवाई पोफाळी पोलीस स्टेशन करीत आहे.
आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असून पुढील तपास ठाणेदार निलेश शेंबडे साहेब करीत आहेत.

# पुसद शहर पोलिसांची अवैध गावठी हातभट्टीवर धाड, 1,61,770/-रुपयेचा मुदेमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ८ :** पोलीस अधिक्षक यवतमाळ कुमार चिंता यांनी पुणे येथे घडलेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन कोणत्याही प्रकारची घटना यवतमाळ जिल्हयात घडु नये म्हणुन जिल्हयात अवैध गावठी हातभटी दारु गाळना-यावर कारवाई करन्याची विशेष मोहीम राबवुन अवैध्यरीत्या गावठी हातभट्टी गाळना-यावर कडक कारवाई करन्याचे आदेश पोलीस स्टेशन पुसद शहरचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांना दिले.

त्यावरुण ठाणेदार सेवानंद वानखडे यांनी पोलीस स्टेशन पुसद शहर चे पोलीस अधिकारी व अमलदार यांचे वेगवेगळे पथक तयार करुण दि. 03/06/2026 पासुन रोज सकाळी आरेगाव, मोहा, अश्निनपुर, सेलु, बोरनगर, वसंतपुर, बोरी, येथे वेगवेगळ्या ठिकाणी अवैध्यरीत्या गावठी हातभट्टी दारु गाळना-यावर धाडी टाकुण एकुण 18 गावठी हातभट्टीचे अड्डे उध्दवस्त करुण अंदाजे 2,100 लिटर मोहामास सडवा नष्ट केला व 56 लिटर गावठी हातभट्टी दारु असा एकुण 1,61,770/-रुपयेचा मुद्देमाल जप्त करन्यात आला असुन गावठी हातभट्टीची दारु गाळना-या संबधितावर महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हे नोंद करन्यात आले आहेत तसेच त्यांचे कडुन भविष्यात अशाच प्रकारचे गुन्हे पुन्हा घडु नये म्हणुन प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करन्यात आली आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक, कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक, थोरात, एस.डी.पी.ओ.गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सेवानंद वानखडे, पोउपनि अक्षय सनगर, पोउपनि राजू ठोंमरे, स.फो.सुभाष जाधव, पो. हवा. मनोज कदम, ईदंल आडे, निलेश उचेकर, अविनाश राठोड, अतुल दातीर, निरंजन आडे, पो, काँ, शुध्दोधन भगत, पो.कॉ. सुदर्शन खंदारे, पो.काँ. अनुप मडके, म.पो.कॉ. किरण राठोड, हेमलता रोकडे, रजनी बानाईत यांनी केली आहे.

# गांजाविरोधात एलसीबीची धडक कारवाई..!

## अडीच किलो अमली पदार्थ जप्त, विठाळा येथील युवक ताब्यात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस , दि. ८ :** यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेने अमली पदार्थांविरोधात धडक मोहीम राबवत दिग्रस तालुक्यातील विठाळा येथे कारवाई करून सुमारे अडीच किलो गांजा जप्त केला. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ८ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे एपीआय पवन राठोड, पीएसआय कायंदे तसेच त्यांच्या पथकाने दिग्रस पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्राम विठाळा येथे गोपनीय माहितीच्या आधारे छापा टाकला.

यावेळी दिलीप शंकर मसे (वय ३८, रा. विठाळा, ता. दिग्रस) हा त्याच्या राहत्या घरात अवैधरित्या अमली पदार्थ बाळगत असल्याचे आढळून आले. पोलीस व पंचांच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या झडतीदरम्यान आरोपीच्या घरातून अंदाजे २ हजार ४७५ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थाचा पंचनामा करून तो ताब्यात घेण्यात आला. या कारवाईत एपीआय पवन राठोड, पीएसआय कायंदे, हेड कॉन्स्टेबल सोहेल मिर्झा, बबलू चव्हाण, मिथुन जाधव, किशोर झेंडेकर, पोलीस कॉन्स्टेबल अमित झेंडेकर तसेच चालक पोलीस कॉन्स्टेबल कुमरे यांनी सहभाग घेतला. सदर प्रकरणी आरोपी दिलीप मसे याच्याविरुद्ध मादक द्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ प्रतिबंधक कायदा (NDPS Act) अंतर्गत दिग्रस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# स्टेट बँक चौक ते बोरगडी रोड खड्डेमय, ना दुरुस्त..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## नागरिकांमध्ये संतापाची लाट



**पुसद, दि. ८ :** स्टेट बँक चौक ते बोरगडी रस्ता हा खड्डेमय झाल्यामुळे आज पाऊस पडल्यामुळे या रस्त्यातील खड्ड्यात पाणी साचून पाई चालणार्या नागरिकांना तसेच मोटर सायकल धारकांना ये-जा करण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

काल ७ जून २०२६ पासून मृग नक्षत्र लागू झाल्यामुळे आज दि.८ जून रोजी सायंकाळी ४ वाजताच्या दरम्यान पुसद मध्ये ४५ मिनिटे सारखा पाऊस पडल्यामुळे या रोड मधील मोठमोठ्या खड्ड्यात पाणी साचून वाहन जात असतांना पायी चालणाऱ्या नागरिकांच्या अंगावर पाणी उडत आहे व आजूबाजूच्या छोटे-मोठ्या चिल्लर विक्री व्यवसायिक यांच्या दुकानात मोटरसायकल तसेच एस.टी. महामंडळाचे वाहन तसेच अनेक चार चाकी वाहनांमुळे दुकानात पाणी उडत असल्यामुळे या व्यापाऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहेत. हा वर्दळीचा रस्ता नगरपरिषद अंतर्गत येत असल्यामुळे या रस्त्यासाठी गेल्या दोन वर्षापासून अनेक सामाजिक संघटना व राजकीय पक्षांनी निवेदन देऊन दुरुस्तीची मागणी केली आहे, तसेच विविध दैनिक वृत्तपत्रात बातम्या सुद्धा प्रसिद्ध होऊन हा रोड लवकरात लवकर दुरुस्ती करून नागरिकांची गैरसोय दूर करावी अशा बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहे. परंतु अद्याप पर्यंत या रोडची दखल ना नगरपरिषद प्रशासनाने घेतली ना जिल्हा परिषद प्रशासनाने घेतली आहे, हा रोड अत्यंत खड्डेमय झाल्यामुळे या ठिकाणी अनेक अपघाताच्या घटना घडत असुन एखादा अवचित प्रकार घडल्यास या जबाबदार कोण? असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित झाला आहे,

हा रस्ता बरेच दिवसापासून ना-दुरुस्त असल्यामुळे ग्रामीण भागात जाणाऱ्या येणाऱ्या मोठ्या प्रमाणात मोटरसायकल धारकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नगर प्रशासनाने त्वरित या रोडची दुरुस्ती करून हा रस्ता वाहतुकीस जाण्यालाईक करावा अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# कांबळे यांच्या माघारीची स्वतंत्र चौकशी करा..! नगरसेवक व मतदारांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ८ :** यवतमाळ स्थानिक प्राधिकारी विधानपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून नगरसेवक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य आणि मतदारांनी जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी केली आहे.

कांबळे यांची माघार स्वेच्छेने नसून राजकीय दबाव, आर्थिक प्रलोभन किंवा अनुचित प्रभावाखाली झाल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.निवेदनात लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील तरतुदींचा उल्लेख करत, उमेदवाराला धमकी, दबाव किंवा आर्थिक आमिष दाखवून माघार घेण्यास भाग पाडणे हे भ्रष्ट आचरण असल्याचे नमूद करण्यात आले आहे. एका उमेदवाराच्या माघारीमुळे उर्वरित उमेदवार बिनविरोध निवडून येण्याची शक्यता निर्माण झाली असून त्यामुळे मतदारांचा घटनात्मक मतदानाचा अधिकार हिरावला जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारदारांनी निवडणूक आयोगाच्या निरीक्षकांमार्फत स्वतंत्र चौकशी, चौकशी पूर्ण होईपर्यंत निकाल अथवा बिनविरोध निवड जाहीर करण्यास स्थगिती, दोषींवर फौजदारी कारवाई, तसेच मतदारांच्या अधिकारासाठी 'नोटा'चा पर्याय उपलब्ध करण्यासह दहा प्रमुख मागण्या केल्या आहेत. याशिवाय मतदार यादीतील कथित त्रुटी व विसंगतींचीही स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, तक्रारदार लवकरच प्रत्यक्षदर्शी मतदार व लोकप्रतिनिधींची शपथपत्रे तसेच अन्य पुरावे सादर करणार असल्याचे सांगितले आहे. या गंभीर आरोपांवर निवडणूक प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# विदर्भातील शाळा कधी सुरू होणार?

## आज नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील शाळा १५ जूनपासून सुरू करण्याच्या सरकारच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोकादायक आणि अव्यवहार्य असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. उन्हाळी अवकाशकालीन न्यायपीठासमोर तातडीने झालेल्या सुनावणीत न्यायालयाने राज्य शासनाला नोटीस बजावत ९ जूनपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले होते.आता विदर्भातील शाळा कधी सुरु होणार याचा निर्णय मंगळवार ९जुन होणार आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे वर्धेचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि नागपूर जिल्हाध्यक्ष लिलाधर ठाकरे यांनी ही याचिका दाखल केली आहे. या प्रकरणावर न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या समक्ष सुनावणी झाली होती. याचिकेनुसार, विदर्भातील शाळा १५ जूनपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने २८ मार्च २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार घेतला आहे. तसेच, शाळांना १५ ते ३० जूनदरम्यान सकाळी ७ ते ११.४५ या वेळेत वर्ग घेण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, विदर्भातील तापमान जून महिन्यात ४२ ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत गेले आहे तसे अधिकृत नोंदींमधून स्पष्ट होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना तीन ते पाच किलोमीटर पायी चालत शाळेत जावे लागते. सकाळी सात वाजेपर्यंत शाळेत पोहोचणे तसेच दुपारी १२ नंतर प्रखर उन्हात घरी परतणे विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरू शकते. याचिकेत २००७ मधील उच्च न्यायालयाच्या निर्णयाचाही संदर्भ



देण्यात आला आहे. त्यावेळीही विदर्भातील उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शाळा ३०जूननंतरच सुरू करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. राज्य सरकारने त्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. मात्र, ती नंतर मागे घेण्यात आली होती.

### आपल्याच धोरणाचा शासनाला विसर

राज्य शासनाने विदर्भातील शाळा ३० जूननंतर सुरू करण्याचे धोरण २२ जून २००७, ११ एप्रिल २०२२ आणि २० एप्रिल २०२३ रोजी शासन निर्णय काढत स्वीकारले होते. अशा परिस्थितीत या शासन निर्णयाच्या विरोधात नवीन परिपत्रक काढण्याचा अधिकार शिक्षण विभागाला नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. भानुदास कुलकर्णी यांनी, राज्य शासनातर्फे ॲड. कोल्हे यांनी बाजू मांडली होती.आता शासना कडून कशी बाजु न्यायालयात मांडली जाते याकडे लक्ष लागुन आहे.

उच्च न्यायालयाने नोटीस बजावत उन्हाळी अवकाशानंतर उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. प्रकरणाची सुनावणी मंगळवार ९ जून रोजी निश्चित करण्यात आली आहे.मंगळवारी विदर्भातील शाळा कधी सुरु होणार याचा निर्णय न्यायायल देणार आहे.या निर्णयाकडे विदर्भातील पालक, विद्यार्थी, शिक्षक यांचे लक्ष लागुन आहे अशी माहीती राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.

## सार्वजनिक वाहतूक वाहनांमध्ये ‘पॅनिक बटन्स’ आणि ट्रॅकिंग यंत्रणा अनिवार्य

**अमरावती/का.प्र.**

महिला आणि मुलांच्या सुरक्षेचा विचार करून, सार्वजनिक वाहतूक वाहनांमध्ये ‘व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस’ (वाहनाचे स्थान दर्शवणारी यंत्रणा) आणि ’पॅनिक बटन्स’ बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनमालकांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारने २०१८ मध्ये सर्व सार्वजनिक वाहतूक वाहनांमध्ये लोकेशन ट्रॅकिंग यंत्रणा आणि पॅनिक बटन्स बसवण्याचा नियम लागू केला होता. असे असूनही, आतापर्यंत खूपच कमी वाहनांमध्ये ही सुरक्षा यंत्रणा बसवण्यात आली आहे. या परिस्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त करत, नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात आला आहे. या निर्देशानुसार, टॅक्सी, कॅब, बसेस आणि इतर प्रवासी वाहनांमध्ये पॅनिक बटन्स आणि व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग यंत्रणा बसवणे अनिवार्य असेल. ही यंत्रणा वाहनाचे ’रिअल-टाइम’ स्थान (सद्यस्थितीतील स्थान) शोधण्यास आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळवून देण्यास मदत करेल. पॅनिक बटण दाबल्यावर, वाहनाच्या स्थानासह एक आपत्कालीन संदेश थेट पोलीस नियंत्रण कक्ष आणि परिवहन विभागाच्या सर्व्हरकडे पाठवला जाईल. यामुळे विशेषतः महिला, तरुणी आणि मुलांची सुरक्षा अधिक बळकट होण्यास मदत होईल. तसेच, वाहनात बसवलेली ट्रॅकिंग यंत्रणा केंद्र सरकारच्या अधिकृत पोर्टलशी आणि वाहन देखरेख प्रणालीशी (व्हेईकल मॉनिटरिंग सिस्टम) जोडलेली असणे आवश्यक आहे, जेणेकरून परिवहन विभाग आणि संबंधित यंत्रणांना वाहनांवर लक्ष ठेवता येईल.परिवहन विभागाच्या म्हणण्यानुसार, ज्या सार्वजनिक वाहतूक वाहनांमध्ये ही सुरक्षा यंत्रणा नसेल, त्यांना वार्षिक ’फिटनेस प्रमाणपत्र’ (वाहन योग्यता प्रमाणपत्र) दिले जाणार नाही. शिवाय, नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहनमालकांवर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. अशा वाहनांची तपासणी करण्यासाठी वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाकडून विशेष मोहीम राबवली जाईल. सुरक्षा मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी वाहनमालकांनी लवकरात लवकर पॅनिक बटन्स आणि व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग यंत्रणा बसवावी, असे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे.

## अधिकमासाच्या पर्वावर एक लक्ष दिव्यांनी उजळले कौंडण्यपूर !

**अमरावती/का.प्र.**

विदर्भाची राजकन्या श्री रुक्मिणी मातेचे माहेरघर आणि भगवान श्रीकृष्णाचे सासर म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे अधिकमास निमित्त एक लाख दिव्यांच्या दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या दिव्य सोहळ्याने संपूर्ण कौंडण्यपूर नगरी भक्तिमय आणि प्रकाशमय झाली.

भागवताचार्य माऊली महाराज सालगावकर यांच्या सात दिवसीय भागवत सप्ताहाचा समारोप या भव्य दीपोत्सवाने करण्यात आला. वर्धा नदीच्या घाटापासून थेट श्री रुक्मिणी मातेच्या मंदिराच्या पायरीपर्यंत




तब्बल एक लाख दिव्यांची आकर्षक आरास करण्यात आली होती. हजारो भाविकांच्या उपस्थितीत उजळलेल्या या दीपमाळांनी परिसरात अद्भूत आणि नयनरम्य वातावरण निर्माण केले. या सोहळ्यास अंबा रुक्मिणी सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष रविराज देशमुख तसेच माजी आमदार दादाराव केचे यांची प्रमुख उपस्थिती होती.सोहळ्याचे संचालन ह. भ. प. संजय महाराज ठाकरे यांनी केले. मान्यवरांनी दीपोत्सवात सहभागी होत भक्तांना अधिकमासाच्या शुभेच्छा दिल्या.दीपोत्सवाच्या निमित्ताने मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, हरिनाम संकीर्तन आणि भागवत सप्ताहातील विविध धार्मिक विधी पार पडले.दीपांच्या प्रकाशाने उजळलेला वर्धा नदीघाट आणि मंदिर परिसर पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. अधिकमासाच्या पवित्र पर्वात आयोजित करण्यात आलेल्या या दीपोत्सवामुळे कौंडण्यपूरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर पडली असून हा सोहळा भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला.

## डॉ. महेश पाटील यांची अभिनंदन बँकेला सदिच्छा भेट

**अमरावती/का.प्र.**

विशेष पोलीस महानिरीक्षक (अमरावती परिक्षेत्र) डॉ. महेश पाटील यांनी ५ जून रोजी अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ‘अभिनंदन हाइट्स’ला सदिच्छा भेट दिली. यावेळी बँकेचे अध्यक्ष ॲड. विजय बोथरा, उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र बरडिया आणि व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सुदर्शन गांग यांनी शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित ‘अर्थसरिता’ स्मरणिका देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी ॲड. विजय बोथरा यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेत सांगितले की, ३१ मार्च २०२६ अखेर बँकेच्या ठेवी ४२५.६७ कोटी रुपये, कर्जे २८७.९४ कोटी रुपये, एकूण व्यवसाय ७१३.६१ कोटी रुपये असून बँकेने ५.४८ कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. बँक आधुनिक डिजिटल सेवा उपलब्ध करून देत असून तिला राज्य शासनाच्या ‘सहकार निष्ठ’ आणि ‘सहकार भूषण’ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.डॉ. पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना बोथरा यांनी त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील उल्लेखनीय योगदानाचा आढावा




घेतला. अहमदनगर, पुणे, नांदेड, नागपूर, ठाणे आणि मुंबई येथे वरिष्ठ पदांवर कार्यरत असताना त्यांनी गुन्हेगारीविरोधी मोहिमा, सामाजिक उपक्रम आणि जनहिताच्या योजना प्रभावीपणे राबवल्या. त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी त्यांना २०१८ आणि २०२६ मध्ये राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सुदर्शन गांग यांनी डॉ. पाटील यांनी व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून बँकेला भेट दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला.मनोगतात डॉ. महेश पाटील यांनी अभिनंदन बँकेच्या पारदर्शक, शिस्तबद्ध आणि ग्राहकाभिमुख कार्यपद्धतीचे कौतुक केले. संचालक मंडळाची एकजूट, कमी एनपीए आणि आधुनिक सेवा सुविधा यामुळे बँक सातत्याने प्रगती करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## ४.२८ लाख घरांपर्यंत नळाद्वारे पाणी

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्याने ‘जल जीवन मिशन’ योजनेअंतर्गत एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. जिल्ह्यातील एकूण १,५८८ गावांपैकी १,५३० गावांमध्ये घराघरांत नळ जोडणीचे काम पूर्ण झाले असून, ही गावे ’हर घर जल’ गावे म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

परिणामी, जिल्ह्यातील एकूण ४,३२,३११ कुटुंबांपैकी ४,२८,१६७ कुटुंबांपर्यंत नळाद्वारे पाणीपुरवठा पोहोचला आहे. प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला त्यांच्या दारात शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.त्याचबरोबर, प्रशासन शाळा, अंगणवाड्या, सार्वजनिक संस्था आणि गावातील इतर ठिकाणीही नळाद्वारे पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे.मंजूर केलेल्या ६६६ प्रकल्पांपैकी ६०७ प्रकल्प आतापर्यंत पूर्ण झाले आहेत. विविध कारणांमुळे १२ प्रकल्प रद्द करण्यात आले, तर ४७ प्रकल्प सध्या प्रगतीपथावर आहेत. सुरुवातीला,हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन सप्टेंबर २०२४ पर्यंत होते. मात्र, निधीच्या कमतरतेमुळे अनेक भागांत कामाचा वेग मंदावला आणि वेळेत काम पूर्ण होऊ शकले नाही. जल जीवन मिशनची सद्यस्थिती या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने या योजनेच्या अंमलबजावणीची मुदत मार्च २०२८ पर्यंत वाढवली आहे.- मेळघाटमध्ये अजूनही टँकरवर



अवलंबित्व जल जीवन मिशनद्वारे ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा निर्माण केल्या गेल्या असल्या तरी, काही दुर्गम भागांत पाणीपुरवठा हे अजूनही एक आव्हान आहे. सध्या मेळघाटमधील चिखलदरा तालुक्यातील नऊ गावांना २० टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात असून, प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

## शासकीय वसतिगृहांची प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती/का.प्र.**

सामाजिक न्याय विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या शासकीय वसतिगृहांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना या वसतिगृहांमध्ये मोफत प्रवेश दिला जाईल.

शाळेतील विद्यार्थी (इयत्ता ८ वी ते १० वी) तसेच कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन आणि इतर सुविधा पुरवल्या जातील, असे विभागाने जाहीर केले आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम अधिकृत ऐंए पोर्टलद्वारे ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. त्यानंतर, अर्जाची प्रिंटआउट काढून ती संबंधित वसतिगृहात ऑफलाइन पद्धतीने सादर करणे अनिवार्य आहे.अमरावती शहरातील निंभोरा येथील ’भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह’ (युनिट १, २ आणि ३) व ’संत गाडगे महाराज शासकीय मुलांचे वसतिगृह’, तसेच कॅम्प परिसर आणि जेल रोड येथील ’क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींचे वसतिगृह’ यांच्यासाठी ही प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. याव्यतिरिक्त, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील शासकीय वसतिगृहांमध्येही अर्ज स्वीकारले जात आहेत. विभागाच्या वेळापत्रकानुसार, इयत्ता ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांच्या अर्जासाठी अंतिम मुदत ३० जून २०२६ आहे. या विद्यार्थ्यांची पहिली प्रवेश यादी ७ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाईल.कनिष्ठ महाविद्यालय आणि बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ जुलै आहे, तर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर केले जाईल. सामाजिक कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधव यांनी विद्यार्थ्यांना वेळेत अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी विभागाशी ०७२१-२६६१२६१ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

## संक्षिप्त

### शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती -** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर १२५ वी जयंतीनिमित्त मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, अमरावती’ येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रवेशासाठी विद्यार्थिनींना ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावे लागणार आहेत.मागासवर्गीय विद्यार्थिनींनी चालू शैक्षणिक वर्षात अमरावती शहरातील महाविद्यालयांमध्ये किंवा संस्थांमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतला आहे, त्या अर्ज करण्यास पात्र आहेत. यात अकरावी,पदवी,पदविका, आयटीआय प्रवेश घेतलेल्यांना प्रवेश मिळणार आहे. वसतिगृहात प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत निवास, राहण्याची उत्तम व्यवस्था, मोफत भोजन व्यवस्था, स्टेशनरी भत्ता, ड्रेसकोड भत्ता, शैक्षणिक सहल आणि प्रोजेक्ट्स (प्रकल्प) खर्च, या सुविधा पूर्णपणे मोफत पुरवल्या जाणार आहेत.अर्ज करताना विद्यार्थिनींनी उत्पन्नाचा दाखला, मागील वर्षाच्या गुणपत्रकेची झेरॉक्स प्रत, जात प्रमाणपत्र, ही कागदपत्रे सादर करावी लागणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थिनींनी प्रवेशासाठी hmas.mahait.org या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन शासकीय वसतिगृहाच्या गृहप्रमुखांनी केले आहे.

### वृद्धाची गळफास घेऊन आत्महत्या

**कुऱ्हा -** वरखेड येथील वयोवृद्ध नागरिक यांनी आपल्या घरी कुणी नसल्याची संधी साधून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवार ८ जून रोजी सकाळी १० वाजताचे दरम्यान घडली आहे. आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव श्यामराव विश्वासराव बोके वय ७४ वर्ष असे आहे.घरी कुणी नसल्याचे पाहून शामरावने दोरीचे साह्याने गळफास घेतला. पत्नी घरी आल्यानंतर घराचा दरवाजा लोटल्यानंतर ही घटना उघडकीस आली. याबाबत तिवसा पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला व मृतदेह शव विच्छेदनासाठी तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला होता. सायंकाळी अंत्यविधी पार पडला असून त्याचे पश्चात पत्नी मुलगा विवाहीत मुलगी असा आप्त परिवार आहे.

### राजुराबाजार येथून दुचाकी चोरी

**वरूड -** पोलिसस्टेशन अंतर्गत येणाऱ्या राजुराबाजार येथील आठवडी बाजारातून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली.खेमचंद भिमराव तट्टे (४७) रा. पारडी असे फिर्यादीचे नाव आहे. त्यांनी त्यांची दुचाकी क्रमांक एम. एच. २७/२७०३ किंमत अंदाजे २५ हजार रूपये आठवडी बाजारात उभी करून ठेवली असता ती चोरट्याने चोरून नेली. या घटनेची तक्रार तट्टे यांनी वरूड पोलिसांत दाखल केली असता पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

### मोर्शी येथे फिट इंडिया उत्सव

**मोर्शी -** जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधून शासनाच्या परिपत्रकानुसार फिट इंडिया उत्सव १ ते १४ जून या कालावधीत साजरा होत आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी सर्व पोलीस ठाण्यांना सकाळी ६ ते ८.३० या वेळेत फिट इंडिया उत्सव कार्यक्रमात सहभाग घेण्यास सांगितले. मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या नेतृत्वात ५ जून रोजी निर्देशाप्रमाणे मोर्शी पोलीस स्टेशनच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योगा झुम्बा डान्स प्रात्यक्षिक केले. मॉर्निंग फिटनेस ग्रुपनेसुद्धा सहभाग नोंदविला.

### निसर्गरक्षणासाठी लोकसहभागातून वृक्ष लागवड

**अमरावती -** जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या यावली शहीद गावात ठीक ठिकाणी वृक्षारोपण करून, पर्यावरण आणि निसर्गरक्षणाचा जागर करण्यात आला. यामध्ये निसर्ग रक्षणासाठी महिला तथा तरुणांचा लक्षणीय सहभाग विशेष लक्ष वेधून गेला. यावेळी वृक्षारोपणाचा महासंकल्प सुद्धा करण्यात आला. ‘माझी वसुंधरा’ अंतर्गत आयोजित या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मोर्शी नगर परिषद शाळा मुख्याध्यापक हरिनारायण मालटे, ग्रा.पं. प्रशासक शिल्पा खवले, ग्राम विकास अधिकारी ललित बैलमारे. माजी पहिली महिला सरपंच शोभा गंगाधर श्रीखंडे, तुकडोजी महाराज जन्मस्थान मंदिर उपाध्यक्ष काशिनाथ जवणे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या डॉ.राहत चाऊस, गुरुदेव प्रचारक ह.भ.प. चोरे महाराज,गुरुदेव प्रेमी बाबुराव धोटे, निपाणे दादा, गंगाधर, राजाभाऊ खवले श्रीखंडे,वृक्षवल्ली ग्रुपचे मेंबर नितीन भाऊ औंधकर, सचिन टाकरखेडे,मंगेश आवारे, संकेत श्रीखंडे, शितल श्रीखंडे,शुभम यावलीकर,कैलास टाकोने, प्रवीण आसरे,राकेश आसरे, गणेश भोपळे, अक्षय भोपळे, रवी यावले,अनंत हागोने, रोशन खवले, शेख कमर,आशा सेविका ज्योती निमकर, सुलभा कांडलकर, रजनी लंगडे, निलेशा कांडलकर, रेखा देशमुख, सुनील देशमुख, आरोग्य उपकेंद्राचे कर्मचारी ज्योती यावलीकर, रेखात यावलीकर, संदीप पाचघरे, अतुल यावलीकर,शेखर खवले, पूजा यावलीकर, लता उनोने, ममता केने, उज्वला उनोने, गायत्री यावलीकर, हर्षा यावलीकर, सुनिता यावलीकर, संतोष ठाकरे, उमेश टाकरखेडे, प्रभाकर वाघमारे, श्रीधर यावलीकर, अरुण तडस, अरविंद देशमुख,शुभम दाणे, तसेच बाल मंडळी मंथन उनोने, मानस श्रीखंडे, नक्ष उनोने,प्रणव यावलीकर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## आजीवन अध्ययन विभागाचे सर्वच अभ्यासक्रम रोजगारभिमुख - नयना गुंडे

**अमरावती/का.प्र.**

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे सर्वच अभ्यासक्रम रोजगारभिमुख आहेत, असे उद्गार अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांनी काढले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या पदवी वितरण समारंभात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून अधिसभा सदस्य डॉ. संतोष कुटे, डॉ. प्रशांत



विघे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

श्रीमती गुंडे पुढे बोलतांना म्हणाल्या, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या रोजगारभिमुख अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी शिकून लवकरच आपला रोजगार मिळवू शकतात आणि आपण जे शिकतो, त्याच्या आधारे रोजगारही मिळाला पाहिजे. आपला प्रशासकीय सेवेतील अनुभव सांगतांना विद्यार्थीनींनी प्रशासकीय सेवेकडे वळावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ उन्हाळा २०२५ परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीतील प्राविण्यप्राप्त विद्यार्थी पुनम राठी, अपूर्वा इंगळे, कविता पडोळे, अंजली उमाळे, प्रीती क्षीरसागर, प्रतीक्षा खैरे, अश्विनी कोळमकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. अर्चना ढोरे यांनी पदविकांक्षींना सादर केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभाग अंतर्गत एम.ए.योगशास्त्र, आजीवन अध्ययन व विस्तार, एम. ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन, समुपदेशन व मानसोपचार या पदव्युत्तर पदवीकांक्षींना, तर योगथेरेपी, इंग्रजी संवाद कौशल्य, मानसोपचार व निसर्गोपचार व योगशास्त्र पदवीकाकांक्षींना त्या विभागाचे समन्वयक प्रा. स्वप्निल मोरे, प्रा. राम मिश्रा, डॉ. भैय्यासाहेब चिखले, प्रा. राधिका खडके, प्रा. अलका ब्राम्हणकर, प्रा. आदित्य पुंड यांनी पदविकांक्षींना सादर केले व त्यांचा पदवी देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.अधिसभा सदस्य डॉ. संतोष कुटे म्हणाले, नावाप्रमाणेच आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे काम सुरू आहे व महाराष्ट्रभर त्याचा नक्कीच विस्तार होईल. एवढेच नाही, तर डॉ. श्रीकांत पाटील यांचे विचार व स्वप्न देखील या माध्यमातून ते पूर्ण करीत आहेत. विद्यार्थ्यांनी सुध्दा प्रयत्नांची पराकाष्ठा करुन यश संपादन करावे, असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. डॉ. प्रशांत विघे म्हणाले, डॉ. श्रीकांत पाटील यांच्या आजीवन अध्ययन विभागाचा महाराष्ट्रभर नावलौकीक होत असून विभागाचे काम सुध्दा अतिशय दर्जेदार व रोजगारभिमुख असल्याचे सांगून पदवीकांक्षींना शुभेच्छा दिल्यात.अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांनी सर्वप्रथम आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील पदविका व पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने झाली. प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. याप्रसंगी मान्यवरांचे स्मृतिचिन्ह व रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माझी वसुंधरा पर्यावरण पूरक अभियानांतर्गत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपस्थितांना प्रतिज्ञा देण्यात आली. संचालन प्रा. आदित्य पुंड व डॉ. अनघा देशमुख यांनी, तर आभार डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी मानले. पदवी वितरण कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत चालविल्या जाणा-या सर्व अभ्यासक्रमांचे समन्वयक, पदवीधारक विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक उपस्थित होते.

# एकात्मिक कीड नियंत्रणाची समग्र माहिती

ज्या विविध कारणांमुळे पिकाचे नुकसान होते, त्यात किडी, रोग आणि इतर अनपेक्षित घटकांचा वाटा मोठा असतो. त्यापासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांची सतत धडपड चाललेली असते. त्यात शेतकऱ्यांचा भर प्रामुख्याने रासायनिक कीडनाशकांच्या फवारणीवर अधिक असतो. कारण ती उपाययोजना तुलनेने सोपी, सोईस्कर वाटते. मात्र शेती, पर्यावरणासोबतच स्वतः शेतकरी आणि ग्राहकांवर त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात.



त्याच बरोबर सातत्याने केलेल्या रासायनिक कीडनाशकांच्या फवारणीचे अन्य दुष्परिणामही आहेत. उदा. कीडनाशकांप्रति किडींमध्ये निर्माण होणारी प्रतिकारशक्ती, किडींबरोबरच त्यांच्या नैसर्गिक शत्रूंना पोचणारी हानी, पर्यायाने पिकावरील किडींचा उद्रेक वाढणे, उत्पादनामध्ये शिल्लक राहणारे कीडनाशकांचे अवशेष किंवा अंश, त्यामुळे आरोग्यावर उद्‌भविणारे विविध दुष्परिणाम, परागीकरण करणाऱ्या मधमाश्यांसारख्या उपयुक्त कीटकांची हानी, आर्थिकदृष्ट्या खर्चिक पद्धत, इ.

या समस्येतून मार्ग काढण्याचा रास्त उपाय म्हणजे एकात्मिक कीड नियंत्रण होय. या पद्धतीमध्ये मशागतीपासूनच विविध पद्धतीचा अवलंब केला जातो. अगदीच गरज भासल्यास रासायनिक कीडनाशकांचा वापर मर्यादित व योग्य प्रमाणात केला जातो. अशा प्रकारे विविध पद्धतींचा समन्वय साधत केलेल्या शेतीमध्ये एक महत्त्वाचा भाग येतो, तो म्हणजे जैविक पद्धतीने किडींचे नियंत्रण. या सर्वांत महत्त्वाच्या घटकाच्या शेतकऱ्यांचे बऱ्यापैकी दुर्लक्ष होते. शेतकऱ्यांपर्यंत हे तंत्र पोहोचविण्यासाठी डॉ. शेवाळे यांनी 'जैविक कीडनियंत्रण आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन' हे पुस्तक लिहिलेले आहे.

या पुस्तकात पिकांवरील विविध किडींच्या नियंत्रणासाठी जैविक पद्धती आणि अन्य विविध घटकांचा एकात्मिक पद्धतीने समन्वय कसा साधावा, याची माहिती दिली आहे. कीड नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनातील विविध मशागत, यांत्रिक, भौतिक पद्धतींचा वापर कसा करावा, याची सोप्या- सरळ भाषेत आणि आवश्यक छायाचित्रांसह दिलेली माहिती शेतकऱ्यांना उपयुक्त ठरू शकते.

जैविक पद्धतीत मुख्यतः दोन बाबींचा समावेश असतो. प्रमुख म्हणजे निसर्गात (शेतात) नैसर्गिक रीतीने उपलब्ध असलेली विविध मित्र कीटक (परभक्षक, परोपजीवी कीटक) आणि पिकावरील किडींना रोगकारक ठरणारे विविध जीव-जिवाणू यांचे संरक्षण व संगोपन करणे. दुसरे म्हणजे अन्य ठिकाणाहून आणून किंवा प्रयोगशाळेत वाढवून शेतामध्ये कीड रोग नियंत्रणासाठी त्यांचा वापर करणे होय.

यामध्ये जैविक घटक उदा. विविध बुरशा, जिवाणू, विषाणू आणि सूत्रकृमी यांचा समावेश होतो. त्याच प्रमाणे घरगुती शेती परिसरामध्ये उपलब्ध असलेल्या विविध वनस्पतींपासून घरगुती कीडनाशके कशी तयार करायची, याचीही उत्तम माहिती पुस्तकात दिलेली आहे. त्यामुळे पर्यावरण पूरक पद्धतीने व कमी खर्चामध्ये पीक संरक्षण शक्य होऊ शकते.

रासायनिक कीड नियंत्रणाच्या विविध पद्धती, कीटकनाशकांचे विविध प्रकार, त्यांचा कीड नियंत्रणासाठी उपयोग, फायदे व मर्यादा, आनुवंशिक पद्धती, कायदे संबंधित नियमावली इत्यादी विविध घटकांचाही या पुस्तकात समावेश केला आहे. अधिक स्पष्टीकरणासोबतच आवश्यक तिथे छायाचित्रांची जोड दिली आहे. स्वतः डॉ. बी. एस. शेवाळे यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठात कीटक शास्त्रज्ञ म्हणून संशोधन, शिक्षण व विस्तार शिक्षण या शाखेतील प्रदीर्घ अनुभव आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत सारी माहिती आपल्यासमोर मांडली आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ विजय सैंदाणे यांनी मोजक्या रंगात आणि कल्पकतेने सजवले आहे. हे पुस्तक शेतकरी, कृषी पदवीचे विद्यार्थी व अन्य गरजू घटकांना निश्चितच उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे.

**डॉ. भास्करराव पवार**

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



महाराष्ट्रा मध्ये कधी नव्हे इतकी मोठी कर्जमाफी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस एकनाथ शिंदे सुनीत्रा पवार यांनी केली. या कर्जमाफीच्या माध्यमातून सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे ३६ हजार कोटी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी करिता दिले. निवडणुकीच्या जाहीरनामा मध्ये कर्जमाफी म्हटलं होते. जाहिरनामा नुसार आश्वासन पूर्ण केले आहे. या सोबतच शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होऊ नये यासाठी धोरण आखत आहे. हे सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिक्रिया पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी अमरावती मध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना दिले.

यावेळी बच्चू कडू यांनी केलेल्या व्यक्त्यावार बोलताना हे सर्वात मजबूत सरकार आहे. आम्ही एकत्र आहे. देवेंद्र फडवणीस दिल्लीत जावे हा निर्णय करण्याचा अधिकार कोणाला नाही आहे.. देवेंद्र फडवणीस महाराष्ट्रातला कर्तृत्वान विकसित महाराष्ट्राचा संकल्प करून देशातील सर्वात अव्वल महाराष्ट्र करायचा आहे हा निर्णय देवेंद्र फडणीस यांनी घेतला आहे. देवेंद्र फडवणीस दिल्लीत जावे हा विचार कोणी करू नये असे गावागावांमध्ये खडे फोडून मुख्यमंत्रीपदावर बोलून आपल्या भूमिका व्यक्त करू नये प्रत्येकाला वाटते आपल्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री झाला पाहिजे. महायुतीमध्ये सर्व मताने एकमताने देवेंद्र फडवणीस नेता मुख्यमंत्री आहे. काही भूमिका अशा असतात त्या आपल्या पक्ष नेत्याला विचारून भूमिका मांडायला पाहिजे असं समन्वय समितीमध्ये ठरला आहे. समन्वय समितीमध्ये ठरलेला कोणी पाळत नसेल तर त्यावर चर्चा करू असल्याचे प्रतिक्रिया महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी दिली. सर्व इतिहासाचे विक्रम मोडून प्रवीण पोटे विक्रमी मतांनी निवडून येणार असल्याचे मत मांडत बाजोरिया यांच्यावर प्रतिक्रिया देत. आम्ही काही निवडणूक आयोगाचे ठप्पे मारले का कोणीही लढलो असतो. तरी देखील प्रवीण पोटे प्रचंड मतांनी निवडून आले असते. सर्व इतिहासाचे विक्रम मोडून प्रवीण पोटे विजय होणार आहे. प्रवीण पोटे सर्व समावेशक उमेदवार असल्याची प्रतिक्रिया यावेळी दिली.

**नवनवीत राणा चा पक्ष योग्य वेळी विचार करेल...**

नवनीत राणा भारतीय जनता पार्टीचे अत्यंत निष्ठावान कार्यकर्त्या आहे. त्या कधीही भाजप सोडून जाणार नाही. त्या हिंदुत्ववादी जय श्रीराम जय हनुमान म्हणत काम करत आहे. नवनीत राणा या कधीही भाजप सोडू शकत नाही. नवनीत राणा कट्टर हिंदुत्ववादी जय श्रीराम म्हणत काम करत असतात. त्यांच्याबाबत कधी संभ्रम निर्माण करू नये. नवनीत राणा भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय नेत्या आहे. नवनीत राणा भाजपच्या विचाराच्या आहे आयुष्यभर त्या भाजपमध्ये राहतील ..नवनीत राणा यांचा मानसन्मान उच्च पदावर भारतीय जनता पार्टी मध्ये आहे. एक निवडणूक हरली म्हणजे सर्व संपलं का? नवनीत राणा यांना आजही आम्ही खासदार मानतो त्या खासदारच्या कमी नाही. काही मतांनी नवनीत राणा हरल्या त्या पुन्हा निवडून येतील ..नवनीत राणा यांचा योग्य वेळी पक्ष विचार करणार असल्याची प्रतिक्रिया पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावती मध्ये दिली.

# 'धर्मांतर जिहाद'

नाशिक येथील टी.सी. एस मधील कार्पोरेट जिहादचे धक्कादायक प्रकरणानंतर मुंबईतील स्टेट बँकेतील प्रकरण समोर आले. आता पुण्यातील विप्रो या नामांकित आस्थापनातूनही कॉर्पोरेट जिहाद आणि धार्मिक छळाचे अत्यंत गंभीर प्रकरण समोर आले आहे. याप्रकरणी पीडित महिलेनी हिंजेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार प्रविष्ट झाली आहे. संबंधित पीडित हिंदू महिलेने हिंदू जनजागृती समितीने घेतलेल्या प्रकार परिषदेत प्रत्यक्ष उपस्थित राहून या प्रकरणाला धैर्याने वाचा फोडली. विप्रो मध्ये कार्यरत असताना पीडितेवर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी आणि एका मुसलमान व्यक्ती समवेत शारीरिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रचंड मानसिक दबाव निर्माण करण्यात आला. या धर्मविरोधी आणि अनैतिक प्रकाराला तिने ठामपणे नकार देत आस्थापनाच्या व्यवस्थापनाकडे तक्रार केली मात्र व्यवस्थापनाने आरोपीवर कारवाई करण्याऐवजी पीडितेला नोकरीवर काढून टाकले. संबंधित मुसलमान महिला ही पुण्यातील विप्रोच्या कार्यालयात कधी आली नाही. ती बेंगलोर कार्यालयात काम करते. तिला अन्वेषणासाठी पुण्यात बोलवले आहे अशी माहिती हिंजेवाडी पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांनी दिली. हे प्रकरण धर्मांतराच्या असल्याचे पीडित हिंदू महिलेने तक्रारीत म्हटले आहे यावर ते म्हणाले की आरोपी महिलेची चौकशी केल्याविना यावर आम्हाला काही भाष्य करता येणार नाही. तसेच हा दोन्ही महिलांमधील वाद आहे. आम्ही याची पूर्ण चौकशी करत आहोत. या विरुद्ध पीडित तरुणीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दुसऱ्या एका प्रकरणात बँकेत काम करणाऱ्या नवीनच लग्न झालेल्या एका मुलीशी एक धर्मांध महिला ने ग्राहक बनवून ओळख वाढवली आणि त्यानंतर ती आपल्या मुलाशी लग्न करण्याचा आग्रह करू लागली. काही दिवसांनी एक धर्मांध तरुण तिला प्रत्यक्ष भेटून माझं तुझ्याशी लग्न ठरलेला आहे असं आईने सांगितलं असं सांगून तिच्यावर बळजबरी करू लागला. स्वत: ची सुटका करून घेतल्या नंतर तिने सर्व प्रकार आपल्या पतीला आणि शाखेतील मुख्य अधिकारी यांना सांगितला पण दुर्दैवाची गोष्ट दोघांनीही ते गांभीर्याने घेतले नाही. परिणाम असा झाला की एक दिवस ती तरुणी घरी परत आलीच नाही. पोलिसांनी तपास केल्यावर ती बँकेतून बाहेर गेली पण बँकेत परत आली नाही हे सिद्ध झाले आणि तिचा शेवटचा ठाव ठिकाणा हा एका मुसलमान बहूल क्षेत्रात आढळला पण पुढे त्याच्यावर काय कारवाई झाली हे काही कळू शकलं नाही.

हे सर्व प्रकरणे म्हणजे जनसंख्या जिहाद असल्याचे समोर आले आहे. आजपर्यंत त्यांचा धर्मनिरपेक्ष चेहराच जगासमोर राहिला आहे परंतु अशा घटनातून विप्रोत नेमकं काय चालू आहे, हे पहिले जाणे आस्थापनातील सहस्त्रावधी हिंदू कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे.

**लीना गाडगीळ**

# धरती आबा बिरसा मुंडांचा अमर वारसा

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध संघर्ष, त्याग, बलिदान आणि जनआंदोलनांनी समृद्ध झालेला इतिहास आहे. या इतिहासात अनेक महान नेत्यांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी अमिट ठसा उमटविला आहे. तथापि, दीर्घकाळ भारतीय इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात काही अशा व्यक्तिमत्त्वांकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले, ज्यांनी आपल्या समाजासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्ष करणारे बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे, सामाजिक परिवर्तनाचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक होते. आदिवासी समाज त्यांना प्रेमाने आणि आदराने 'धरती आबा' म्हणजेच 'धरतीचे पिता' म्हणून संबोधतो. ९ जून हा त्यांचा स्मृतिदिन असून हा दिवस केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा नसून आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखाली होता. इंग्रजांनी आपल्या प्रशासनिक आणि आर्थिक धोरणांच्या माध्यमातून भारतीय समाजातील विविध घटकांवर प्रभाव टाकला. या धोरणांचा सर्वाधिक विपरीत परिणाम आदिवासी समाजावर झाला. जंगल, जमीन आणि जल यांवर आधारित जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे अस्तित्वच धोक्यात आले. ब्रिटिशांनी वनकायदे लागू करून जंगलांवरील आदिवासींचे पारंपरिक हक्क नाकारले. महसूल व्यवस्थेमुळे त्यांच्या जमिनींवर कर लादले गेले. सावकार, व्यापारी आणि जमीनदार यांच्या संगनमताने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जाऊ लागल्या. परिणामी हजारो आदिवासी कुटुंबे आपल्या पारंपरिक उपजीविकेपासून वंचित झाली. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर गंभीर परिणाम झाला. अशा कठीण परिस्थितीत आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले. त्या काळात आदिवासी समाज अनेक समस्यांनी ग्रस्त होता. आर्थिक शोषण, सामाजिक उपेक्षा, अशिक्षण आणि अंधश्रद्धा यांमुळे समाजाची प्रगती खुंटली होती. बिरसा यांनी ओळखले की समाजाच्या उन्नतीसाठी सर्वप्रथम सामाजिक जागृती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यांनी लोकांना मद्यपान, जादूटोणा, अंधश्रद्धा आणि इतर सामाजिक कुरीतींपासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी स्वच्छता, शिक्षण, शिस्त, नैतिकता आणि परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रेरणादायी विचारांमुळे हजारो लोक त्यांच्या सभांमध्ये सहभागी होऊ लागले. बिरसा मुंडा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक धार्मिक जागृतीचे प्रणेतेही होते. त्यांनी आदिवासी समाजाला त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक मुळांशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्या काळात विविध धर्मप्रचारक संस्थांचा आदिवासी भागांमध्ये प्रभाव वाढत होता. अनेक आदिवासी आपली पारंपरिक ओळख गमावण्याच्या स्थितीत होते. बिरसा यांनी आदिवासी संस्कृती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचे संरक्षण करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी एकेश्वरवादाचा संदेश दिला आणि नैतिक जीवन जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अनुयायांमध्ये एक नवीन धार्मिक-सामाजिक चेतना निर्माण झाली. पुढे ही चळवळ 'बिरसाईत' म्हणून प्रसिद्ध झाली.

याच काळात बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली 'उलगुलान' या ऐतिहासिक चळवळीची सुरुवात झाली. 'उलगुलान' म्हणजे महान क्रांती किंवा महान उठाव. ही चळवळ आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी उभारलेली व्यापक लोकचळवळ होती. बिरसा यांनी 'अबुआ दिशुम, अबुआ राज' म्हणजे 'आपला देश, आपले राज्य' हा संदेश दिला. या घोषणेमध्ये स्वराज्याची बीजे दडलेली होती. त्यांनी आदिवासींना अन्यायकारक कर भरण्यास नकार देण्याचे आणि आपल्या जमिनींचे रक्षण करण्याचे आवाहन केले. १८९५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना अटक केली. त्यांना कारावासाची शिक्षा झाली. परंतु तुरुंगवासामुळे त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नाही. उलटपक्षी, त्यांचे विचार अधिक व्यापक प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचले. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी नव्या जोमाने चळवळीला सुरुवात केली. त्यांनी आदिवासी समाजाला अधिक संघटित केले आणि ब्रिटिशांविरुद्ध संघर्षाची तयारी केली. १८९९ आणि १९०० या काळात उलगुलान चळवळ आपल्या शिखरावर पोहोचली. हजारो आदिवासी बिरसा यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभे राहिले. अनेक ठिकाणी सरकारी यंत्रणांविरुद्ध प्रतिकार करण्यात आला. शोषण करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारण्यात आला. या उठावामुळे ब्रिटिश प्रशासन हादरून गेले. आदिवासी समाजाची एकजूट आणि त्यांची संघर्षशक्ती पाहून ब्रिटिश सरकार चिंतेत पडले. उलगुलान चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ राजकीय बंड नव्हती. ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीची चळवळ होती. आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांची जमीन वाचविणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या चळवळीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने अनेक पावले उचलली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. तरीही आज अनेक आदिवासी समुदाय दारिद्र्य, अशिक्षण, बेरोजगारी, आरोग्यविषयक समस्या आणि विस्थापन यांसारख्या आव्हानांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत बिरसा मुंडा यांचे विचार आणि कार्य अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला आत्मसन्मान, संघटन आणि स्वावलंबनाचा संदेश आजही मार्गदर्शक आहे. आज भारत सरकार आणि विविध राज्य सरकारांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या नावाने विद्यापीठे, संग्रहालये, विमानतळ, शैक्षणिक संस्था आणि संशोधन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जाणारा 'जनजातीय गौरव दिवस' हा आदिवासी समाजाच्या योगदानाचा राष्ट्रीय गौरव करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. यामुळे नवीन पिढीला त्यांच्या कार्याची ओळख होत आहे. ९ जून हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की स्वातंत्र्य, समानता आणि न्याय यांसाठीचा संघर्ष कधीही व्यर्थ जात नाही. बिरसा मुंडा यांनी पेटवलेली स्वाभिमानाची ज्योत आजही लाखो लोकांच्या हृदयात तेवत आहे. त्यांनी



दाखवून दिले की संघर्षातून परिवर्तन घडवून आणता येते आणि आत्मविश्वासाच्या बळावर कोणतीही गुलामी झुगारून देता येते. म्हणूनच ते केवळ इतिहासातील एक व्यक्ती नाहीत, तर एक विचार आहेत, एक प्रेरणा आहेत आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे शाश्वत प्रतीक आहेत. धरती आबा बिरसा मुंडा यांचे जीवन भारतीय इतिहासातील तेजस्वी पर्व आहे. त्यांचा संघर्ष, त्याग, नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील. आदिवासी स्वाभिमानाचे हे महानायक, स्वातंत्र्याचे अमर सेनानी आणि सामाजिक न्यायाचे अखंड दीपस्तंभ म्हणून त्यांचे नाव भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त या महान विभूतीस विनम्र अभिवादन करताना त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि न्याय्य, समताधिष्ठित व मानवतावादी समाज घडविण्याचा संकल्प करूया. हाच त्यांना वाहिलेला खरा श्रद्धासुमनांचा हार ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# जननायक बिरसा मुंडा

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले. एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# साजिद पठाणांना 'बेस्ट आमदार' चा बहुमान

## विकासकामांच्या पाठपुराव्याला मिळाली सन्मानाची मोहोर

■ प्रतिनिधी | अकोला ■

*अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांना ऑल इंडिया लूक लाईक असोसिएशनच्या वतीने 'बेस्ट आमदार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अकोला येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित कार्यक्रमात असोसिएशनचे अध्यक्ष आरिफ खान यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.*



अकोला पश्चिम मतदारसंघातील विविध विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तसेच सर्वसमावेशक विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत हा सन्मान देण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.


आमदार पठाण यांनी निवडून आल्यानंतर मतदारसंघातील पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, रस्ते आणि पाणीपुरवठा यांसारख्या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

मतदारसंघातील नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या एप्प राजराजेश्वर मंदिराच्या परिसराच्या विकासासाठी त्यांनी विधानसभेत सातत्याने पाठपुरावा केला. तसेच उर्दू घर उभारणीसाठी निधी मंजूर करून घेण्यासाठीही प्रयत्न केले. विविध प्रश्न शासनदरबारी प्रभावीपणे मांडून विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

पुरस्कार स्वीकारताना आमदार साजिद खान पठाण म्हणाले, 'हा सन्मान माझ्यासह अकोला पश्चिम मतदारसंघातील प्रत्येक नागरिक, कार्यकर्ता आणि मतदारांचा आहे. जनतेने दाखविलेला विश्वास कायम राखण्यासाठी विकासकामांचा वेग आणखी वाढविण्याचा प्रयत्न करणार आहे.' यावेळी अकोला गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, नगरसेवक, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या पुरस्कारानंतर राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून आमदार साजिद खान पठाण यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीचे कौतुक व्यक्त केले जात आहे.

# अपहार झाकण्यासाठी मोघम व दिशाभूल करणारा चौकशी अहवाल सादर ?

## पिंपळखुटा ग्रामपंचायत प्रकरण तापले; विस्तार अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी




■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या पिंपळखुटा ग्रामपंचायतीतील कथित अपहारप्रकरणात चौकशी प्रक्रियेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ग्रामपंचायत निधीतील गैरव्यवहाराच्या तक्रारीनंतर करण्यात आलेला चौकशी अहवाल तब्बल चार महिने दडपून ठेवण्यात आला आणि नंतर संबंधितांना वाचविण्यासाठी मोघम व दिशाभूल करणारा अहवाल सादर करण्यात आला, असा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभेचे जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांनी केला आहे. या प्रकरणी विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे यांच्यावर विभागीय चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

पिंपळखुटा ग्रामपंचायतीच्या सामान्य निधीतील कथित अपहार व आर्थिक अनियमिततेबाबत १८ डिसेंबर २०२५ रोजी अरविंद पाटील यांनी गटविकास अधिकारी, पातुर यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर ३० जानेवारी २०२६ रोजी विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे यांनी चौकशी केली. मात्र, चौकशी पूर्ण होऊनही अहवाल तत्काळ सादर न करता तो चार महिने प्रलंबित ठेवण्यात आला. अखेर २१ मे २०२६ रोजी सादर करण्यात आलेल्या अहवालावर आता संशयाची सावली पडली आहे.

तक्रारीनुसार, ग्रामपंचायतीने लाखो रुपयांच्या विकासकामांमध्ये शासनाच्या ई-निविदा नियमांना जाणीवपूर्वक बगल दिली. तीन लाखांवरील कामांसाठी ई-टेंडर प्रक्रिया बंधनकारक असतानाही पेव्हर ब्लॉक, नाली बांधकाम आणि इतर विकासकामांचे कृत्रिम तुकडे करण्यात आले. त्यामुळे निविदा प्रक्रिया टाळून काही विशिष्ट कंत्राटदारांना थेट लाभ मिळवून देण्यात आल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे तर ग्रामपंचायतीकडे जमा झालेली वसुलीची रक्कम नियमानुसार बँक खात्यात जमा न करता थेट खर्च करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकाराकडे चौकशी अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अपहाराच्या आरोपांपेक्षा चौकशी प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित होऊ लागल्याने पिंपळखुटा ग्रामपंचायत प्रकरण अधिकच गाजण्याची चिन्हे आहेत. चौकशी अहवालातील कथित विसंगती, चार महिन्यांचा विलंब आणि निविदा प्रक्रियेतील अनियमिततेच्या आरोपांमुळे आता प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**फौजदारी गुन्ह्याची मागणी**

'विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे यांनी वस्तुस्थिती लपवून चुकीचा अहवाल सादर केला आहे. अहवालातील आकडेवारी आणि प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारांमध्ये विसंगती दिसून येते. त्यामुळे त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून निलंबित करण्यात यावे.'

**अरविंद पाटील,**
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभा

-----------

**तक्रार बिनबुडाची**

'पिंपळखुटा प्रकरणाची चौकशी समितीमार्फत पारदर्शक पद्धतीने चौकशी करण्यात आली आहे. समितीत तीन सदस्य होते. माझ्याविरोधातील आरोप निराधार असून तक्रारीत कोणतेही तथ्य नाही.'

**अनंत लव्हाळे,**
विस्तार अधिकारी, पंचायत समिती पातुर

### चार महिन्यांचा विलंब संशयास्पद

चौकशी अहवाल वेळेत सादर झाला असता तर अनेक बाबी स्पष्ट झाल्या असत्या. मात्र अहवाल दडपून ठेवल्यामुळे संबंधितांना रेकॉर्डमध्ये बदल करण्याची, नोंदी दुरुस्त करण्याची आणि संभाव्य पुरावे नष्ट करण्याची संधी मिळाली, असा आरोप तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे चौकशी प्रक्रियेची निष्पक्षता आणि विश्वासार्हताच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

### जिल्हा परिषद प्रशासनासमोर आव्हान

एका बाजूला अपहाराच्या आरोपांची चौकशी, तर दुसऱ्या बाजूला चौकशी अधिकाऱ्यावरच संगनमताचे आरोप झाल्याने जिल्हा परिषद प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. या प्रकरणात स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून संपूर्ण प्रकरणाची नव्याने चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

नेमता तारिख : - २६.०६.२०२६

चौकशी क्रमांक :- १४/२०२६ कलम 50A(1) कलम ५० ( अ ) नुसार जाहिर नोटिस

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० ( अ ) अन्वये
**अर्जदार :-** १ ) श्री.मोहन अनंतराव आसरकर, रा. आसरकर वाडा, अकोट +7
सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यांत येते की,

**१ ) श्री. गजानन धर्मशाळा, आकोट, ता. आकोट जि. अकोला. ई- १५०** या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्य रितीने चालावा या दृष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

२) हयाअर्थि या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजनेविषयी काही निवेदन/हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० ( तीस ) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन/हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देउन मुंबई सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा, तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक २५/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

(शिक्का)
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

नेमता तारिख : - २४.०६.२०२६

चौकशी क्रमांक :- १०/२०२६ कलम 50A(1) नुसार जाहिर नोटिस

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० अ(१) अन्वये
**अर्जदार :-** १ ) श्री. बबनराव कृष्णराव देशमुख +1
सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यांत येते की, **श्री पायविहीर संस्थान, भांबेरी, ता. तेल्हारा जि. अकोला ई- ३०** या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्य रितीने चालावा या दृष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

२) हयाअर्थि या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजनेविषयी काही निवेदन/हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० ( तीस ) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन / हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देउन मुंबई सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्त - २, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा, तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक २०/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-२, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

(शिक्का)
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

# तेल्हारा तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतींच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

## उद्या विशेष ग्रामसभांमधून प्रभागनिहाय आरक्षण निश्चित होणार

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या नव्याने निर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागनिहाय सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतींमध्ये उद्या बुधवारी १० जून रोजी विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार महेश राममुंडे यांनी दिली.

आरक्षण सोडत प्रक्रिया संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.प्रभागनिहाय आरक्षण सोडत बुधवार, १० जून रोजी दोन टप्प्यांत होणार आहे. सकाळी १० वाजता पहिल्या गटातील ग्रामपंचायतींसाठी, तर दुपारी १ वाजता दुसऱ्या गटातील ग्रामपंचायतींसाठी विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आल्या आहेत. सकाळच्या सत्रात खंडाळा, सांदळा, अडगाव बु., दानापूर, रायखेड, घोडेगाव, वरूड बु., नरसिंगपूर, भांबेरी, वडगाव राठे, सिसोली, वाकोडी, वाडी अळमपूर, नेर, खेर्डेशपांडे, वांगरगाव आणि बेलखेड या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. दुपारच्या सत्रात गोर्धी, मनबदा, तळेगाव वडनेर, इसापूर, पिंपळखुर्द, दुधगाव, हिंगणी बु., चांगलवाडी, कालव बु., शिवाजीनगर, थार, खेळ सटवाजी, आडसुळ, अटकळी, उस्तवागाव आणि रणगाव या ग्रामपंचायतींमध्ये आरक्षण सोडतीची प्रक्रिया पार पडणार आहे. तहसील प्रशासनाच्या वतीने आरक्षण सोडत प्रक्रिया पूर्णपणे खुली व पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामपंचायत निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या प्रक्रियेकडे संभाव्य इच्छुक उमेदवारांसह ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# अकोल्यात बुधवारी पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

नोकरी इच्छुक उमेदवारांना खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राद्वारे १० जूनला सकाळी १० वा. पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यात २ नामांकित कंपन्यांतील एकूण ३८ पदांची भरती करण्यात येत आहे. यामध्ये दहावी,बारावी, आयटीआय, पदवीधर उमेदवारांना संधी उपलब्ध आहेत. सदर मेळाव्यासाठी ऑनलाईन आवेदन करणे करिता https://rojgar.mahaswayam.gov.in/#/home/index या वेबपोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन माध्यमातून नोंदवावी व दिनांक १०/०६/२०२६ रोजी मुलाखतीसाठी प्लेसमेंट ड्राईव्ह (रोजगार मेळाव्यास) प्रत्यक्ष उपस्थित राहावे.

पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यास' ऑनलाईन सहभाग नोंदविण्यासाठी पुढील प्रक्रिया करावी. www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या. एम्प्लॉयमेंट टॅबवर क्लिक करा. जॉबसीकर हा पर्याय निवडून आपला सेवायोजन नोंदणी क्रमांक किंवा आधार क्रमांक व पासवर्ड वापरून साईन इन करा. आपल्या होम पेजवरील जॉब फेअर हा पर्याय निवडा. अकोला जिल्हा निवडून फिल्टर बटणावर क्लिक करा नंतर दिनांकित मेळावा दिसेल त्यासमोर असलेल्या ?क्शन बटणाच्या खाली व्ह्यू आणि अप्लाय बटन दिसेल. त्यानंतर मेळाव्यास उपस्थित राहणारे उद्योजक व त्यांच्याकडील पदाबाबत माहिती दिसेल. आपल्या पात्रतेनुसार पदाची निवड करून अप्लाय बटणावर क्लिक करा. आय ॲग्री हा पर्याय निवडा. दिनांक १० जून २०२६ रोजी जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा, शैक्षणिक कागदपत्रे, तसेच पासपोर्ट साईज फोटो व इतर आवश्यक कागदपत्रासह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला येथे स्वखर्चाने उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा.

# ३ लक्ष १४ हजार रू. चा मुद्देमाल जप्त

**अकोला** : राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने जिल्ह्यात हातभट्ट्यांविरूद्ध मोहिम राबवून ३ लक्ष १४ हजार रू. चा मुद्देमाल जप्त केला. मेथेनॉल मिश्रित विषारी मद्य प्राशनामुळे सुमारे २० नागरिकांचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना नुकतीच पुण्यात घडली. अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत यासाठी राज्य उत्पादन शुल्क जिल्हा अधीक्षक सीमा झावरे यांच्या नेतृत्वात २९ मे ते दि.७ जून दरम्यान मोहिम राबविण्यात आली.

# अ भा गुजराती समाजाच्या राष्ट्रीय बैठकीत गुजराती समाजाच्या विकासावर चर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■



अ भा गुजराती समाजाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी व महाराष्ट्र-गोवा युनिटची बैठक उत्साहात रायगड जिल्ह्याच्या महाड येथे अलीकडेच पार पडली.राष्ट्रीय अध्यक्ष संजयभाई पटेल यांच्या अध्यक्षतेत संपन्न या बैठकीत राष्ट्रीय महामंत्री चेतनभाई पटेल, राष्ट्रीय कोषाध्यक्ष मनोजभाई झा, राष्ट्रीय मंत्री निलेशभाई शाह, महाराष्ट्र व गोवा अध्यक्ष मोहनभाई पटेल, महाराष्ट्र व गोवा उपाध्यक्ष हेमेन्द्रभाई राजगुरू, सरदार वल्लभभाई पटेल सुरक्षा योजनेचे चेअरमन व अ भा गुजराती समाजाचे केंद्रित कार्यकारी सदस्य जिग्नेश गोकाणी आणि बैठकीचे आयोजन करणारे महाड निवासी सुभाषभाई सेठ, नीताबेन सेठ इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत करून बैठक सुरु करण्यात आली. बैठकीत राष्ट्रीय व राज्य पातळीवर विविध शहरांकडून प्रतिनिधी उपस्थित होते. राष्ट्रीय अध्यक्ष व पदाधिकारी सक्रियपणे सहभागी होऊन अनेक मुद्द्यांवर सविस्तर चर्चासत्र घेतले.

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. ०८, (२६-२७)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत ०२ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/१९४/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : ०८/०६/२०२६

**Change In Name**
old Name - **ASHA ARJUN SHIRSAT**
-To- New Name
- **ASHA SANDIP PAHURKAR**
ADD - BHIM NAGAR OLD CITY AKOLA-444001
par NOTED· REG. As par Notary No Reg
page No - 56sr No 298/26. Date 08/06/26.

# अकोल्यात भव्य योग महोत्सव

## पाच हजारांहून अधिक नागरिकांची ऑनलाइन नोंदणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योगा, आयुष मंत्रालय भारत सरकार आणि योग फाउंडेशन संचालित महाराष्ट्र योग शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला भव्य योग महोत्सव आज डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सुमारे ५ हजार नागरिकांनी ऑनलाइन नोंदणी केली होती.



आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून निमित्त जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात योगाचे महत्त्व, निरोगी जीवनशैली आणि भारतीय संस्कृतीतील योग परंपरेचा प्रचार-प्रसार करण्यात आला. सकाळी पार पडलेल्या या योग महोत्सवात विविध वयोगटातील नागरिक, योग प्रशिक्षक आणि योग साधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार तथा लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे होते. यावेळी अकोला विधी व न्याय विभागाचे न्यायाधिश डि एस दाभाडे,महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ मनोज निलपवार , गुणवंतराव जानोरकर, कार्याध्यक्ष डॉ कृणाल महाजन, राज्य संपर्क अधिकारी प्रसाद कुलकर्णी, डॉ पंदेकृवि चे किशोर बिडवे, राष्ट्रवादीचे माजी जिल्हाध्यक्ष कृष्णाभाऊ अंधारे, , विभागीय अध्यक्ष योगगुरू डॉ. चंद्रकांत अवचार, जिल्हाध्यक्ष डॉ. उल्हास मोकळकर, नगरसेवक गणेश अंधारे, विनोद मापारी, मंगेश काळे, जिल्हा महासचिव श्रीधर मेतकर, कोषाध्यक्ष किशोर गावंडे, सुभाष तायडे, महिला जिल्हाध्यक्ष वैशाली दातकर, , नरेंद्र मुळे, डॉ. विनोद लाहोळे, किसनराव नागे, संघटन सचिव उद्धवराव धाडे, सहकोषाध्यक्ष डॉ. विनोद देशमुख, माध्यम प्रमुख प्रमोद मुरुमकार, सोशल माध्यम प्रमुख संतोषकुमार गवई, कार्यालय सचिव सुनील बोंडे, महिला प्रकल्प प्रभारी तृप्ती बढे, चंदना जैन, प्रेमा काटे, जयश्री तडस, संगिता मोकळकर , अश्विनी चौरपगार व योगा क्विन वर्ग , अर्चना काठोळे , ज्योती चोपडे , पुनम ठाकरे, राधा अवचार, कविता अंबाडकर, छाया इंगळे, वैशाली नानोटे, सराळे, अनिता तिवारी, शोभा गवई, स्वाति पाटील संगिता बचाटे, मिनाक्षी पदमने, वर्षा अवचार, अर्चीत अवचार, राजेश नानाटे,किसन धागे,राजेश्वर नकासकर, सुधाकर बारस्कर, जनार्दन नवथळे, प्रकाश रणबावळे, प्रभाकर तुळजापूरे,यांच्यासह अनेक पदाधिकारी व योग प्रशिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे आयोजक समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात विभागीय अध्यक्ष डॉ. चंद्रकांत अवचार यांनी योग महोत्सवाची संकल्पना, उद्दिष्टे आणि आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी अध्यक्षीय भाषणात लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे यांनी योगाचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी आणि संतुलित जीवन जगण्याचा प्रभावी मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच योग महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व पदाधिकारी, प्रशिक्षक व स्वयंसेवकांचे त्यांनी विशेष कौतुक केले. विक्रम गुणवंराव जानोरकर यांची कन्या विरा जानोरकर हिने कथ्थक नृत्यामध्ये विश्व विक्रम केल्याबद्दल तिचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**जाहीर नोटीस**
**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७०६/२०२६ — प्रोसेस नं.६५१३/२०२६
चौ.ता. ०४/०७/२०२६ — दिनांक : ०७/०५/२०२६

**अर्जदार :** १. किशोर गजानन काळे २. आनंद गजानन काळे नं. १ व २ रा. गोकुळ कॉलनी, कृषी नगर रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. विंदा श्रीकांत नवसाळे रा. राम मंदिर जवळ, दिनदयाल नगर, वार्ड नं. २७, चिखली, ता. चिखली, जि. बुलढाणा. ४. सौ. लता प्रशांत खोडसकार रा. प्लॉट नं. ३९, विद्यानिकेतन कॉलनी, जालना रोड, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्री गजानन शामराव काळे २. मंगला गजानन काळे
**पत्ता :-** रा. गोकुळ कॉलनी, कृषी नगर रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री गजानन शामराव काळे यांचे दि.१५/०१/२००३ रोजी व तसेच मयत मंगला गजानन काळे यांचे दि. ०२/०४/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# दारूला मोकळा रस्ता,दुधावर गंडांतर

- एफडीएची वीजगती कारवाई
- एक्साईज विभाग मात्र ‘झोपेच्या सोंगात
- गांधींच्या वर्ध्यात दारूबंदीचा फज्जा

**वर्धा/ जनमाध्यम**

महात्मा गांधींच्या विचारांनी ओळखल्या जाणाऱ्या वर्धा जिल्ह्यात आज एक विचित्र आणि संतापजनक चित्र पाहायला मिळत आहे. एका बाजूला दूधासारख्या जीवनावश्यक वस्तूवर प्रशासनाची वीजगती कारवाई होते, तर दुसऱ्या बाजूला दारूबंदी असलेल्या जिल्ह्यात खुलेआम सुरू असलेल्या दारूच्या अवैध धंद्यांकडे संबंधित यंत्रणा कानाडोळा करत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे.

खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी असलेल्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) गेल्या आठवड्यात वर्धा शहराला दूधपुरवठा करणाऱ्या गोरस भंडारवर कारवाई केली. या कारवाईनंतर शहरातील दूध वितरण व्यवस्था विस्कळीत झाली. अनेक भागांमध्ये नागरिकांना दूध मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या. सकाळच्या चहापासून लहान मुलांच्या आहारापर्यंत अनेक कुटुंबांना याचा फटका बसला.

एफडीएने आपले कर्तव्य बजावत कारवाई केली, याबाबत कुणाचेही दुमत नाही. मात्र याच वेळी नागरिक एक ज्वलंत प्रश्न उपस्थित करत आहेत. वर्धा जिल्ह्यात कायद्याने दारूबंदी लागू असताना गावागावांत, शहरातील अनेक भागांत आणि महामार्गालगत अवैध दारू विक्रीचे जाळे कसे फोफावत आहे? दारूमध्ये भेसळ करणारे, अवैध दारू विक्रेते आणि तस्कर यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी असलेला राज्य उत्पादन शुल्क विभाग (एक्साईज) नेमका काय करत



आहे,

स्थानिकांच्या मते, जिल्ह्यात दारूबंदी केवळ कागदोपत्री उरली आहे. अवैध दारू सहज उपलब्ध होत असल्याने तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत आहे. अनेक ठिकाणी हातभट्टी आणि बनावट दारूचा व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. तरीही मोठ्या प्रमाणावर धडक कारवाया होताना दिसत नाहीत.

वर्ध्यात दारू सहज मिळते, पण दूध मिळत नाही, अशी उपरोधिक प्रतिक्रिया आता नागरिकांतून उमटू लागली आहे. एका विभागाने दाखविलेली तत्परता दुसऱ्या विभागाकडून का दिसत नाही, हा प्रश्न अधिक तीव्र होत आहे. गांधीजींच्या कर्मभूमीत दारूबंदीचा कायदा प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी प्रशासनाचीच आहे. त्यामुळे एफडीएप्रमाणेच एक्साईज विभागानेही अवैध दारूच्या साम्राज्यावर कठोर कारवाई करून दारूबंदीची अंमलबजावणी प्रत्यक्षात आणावी, अशी जोरदार मागणी आता वर्धेकरांकडून होत आहे.

# तारासावंगा-वडाळा पशुवैद्यकीय दवाखान्याचा कारभार रामभरोसे

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**

शेतकऱ्यांची जीवनवाहिनी असलेल्या जनावरांच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळणारे तारासावंगा आणि वडाळा येथील पशुवैद्यकीय दवाखाने सध्या अक्षरशः रामभरोसे असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. दवाखान्यात डॉक्टर नियमित उपस्थित राहत नसल्याने पशुपालक आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

गुरेढोरे आजारी पडल्यावर उपचारासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, संबंधित डॉक्टर फोन उचलत नसल्याने आणि अनेकदा संपर्काबाहेर राहत असल्याने शेतकऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. अनेक वेळा दवाखान्यात जाऊनही डॉक्टर अनुपस्थित आढळत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून जनावरांमध्ये विविध संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे. अशा वेळी पशुवैद्यकीय सेवा प्रभावीपणे उपलब्ध होणे आवश्यक असताना दवाखान्यांची अवस्था चिंताजनक असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, पशुपालकांना खासगी डॉक्टरांचा आधार घ्यावा लागत असून त्यासाठी मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

पशुपालक महावीरनेहारे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत सांगितले की, माझ्याकडे दहा दुभत्या गायी आहेत. त्यातील एक गाय आजारी पडल्याने दवाखान्यात गेलो असता, डॉक्टर गेल्या सहा महिन्यांपासून आले नसल्याची माहिती मिळाली. फोन केल्यावरही प्रतिसाद मिळत नाही. तक्रारी करूनही सुधारणा होत नसेल तर दवाखान्याला कुलूप ठोकून आंदोलन करावे लागेल.

जनावरे आजारी, दवाखाने ओस आणि डॉक्टर संपर्काबाहेर मग पशुवैद्यकीय सेवेचा लाभ नेमका कोणाला असा प्रश्न आता परिसरातील शेतकरी उपस्थित करीत आहेत. संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून नियमित सेवा सुरू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



## फकिराच्या वेशात आले, मंगळसूत्र घेऊन पसार

**गिरड :** फकिराच्या वेशात आलेल्या दोन भामट्यांनी महिलेची फसवणूक करून ३० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र लंपास केल्याची घटना खापरी येथे घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.शांता धारणे (३५) यांच्या घरी दोन इसम फकिराच्या वेशात आले होते. त्यांनी पिण्यासाठी पाणी मागितले. संवादादरम्यान त्यांनी मंगळसूत्र खराब झाल्याचे सांगत ते साफ करून देण्याचा बहाणा केला. विश्वास ठेवून शांता धारणे यांनी मंगळसूत्र त्यांच्या ताब्यात दिले. त्याचवेळी मुलगी रडत असल्याने त्या घरात गेल्या. हीच संधी साधून दोघेही पसार झाले.नंतर चापापूर परिसरात काही फकिर फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर चौकशी करण्यात आली. त्यातून चोरीचा उलगडा झाला. गिरड पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## अंधश्रद्धेविरोधातील लढ्याला राज्याचा सलाम; महाराष्ट्र अंनिस वर्धा जिल्हा शाखेला राज्यस्तरीय ‘लक्षवेधी’ पुरस्कार

**वर्धा/ जनमाध्यम**

अंधश्रद्धा, बुवाबाजी, व्यसनाधीनता आणि सामाजिक अनिष्ट प्रथांविरोधात गेल्या दोन दशकांपासून सातत्याने लढा देणाऱ्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धा जिल्हा शाखेच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. उत्कृष्ट सामाजिक कार्य आणि जनजागृती उपक्रमांबद्दल वर्धा जिल्हा शाखेला राज्यस्तरीय ‘लक्षवेधी पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

अहिल्यानगर येथे आयोजित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीदरम्यान हा सन्मान प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष लोमटे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. यावेळी प्रा. सुभाष वारे, राज्याध्यक्ष माधव बावगे, राज्य कार्याध्यक्ष प्रा. संजय



बनसोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, सारिका डेहनकर, प्रकाश कांबळे, रजनी सुरकार, कल्पना सातव-फुसाटे आणि अशोक हेडावू यांनी संयुक्तपणे सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व सन्मानपत्र स्वीकारले. सन २००२ मध्ये विदर्भातील पहिली अंनिस शाखा वर्ध्यात स्थापन झाली. त्यानंतर पर्यावरणपूरक गणेशोत्सव, निर्माल्यदान मोहीम, व्यसनमुक्ती अभियान, फटाकेमुक्त दिवाळी, सर्पदंश जनजागृती, वैज्ञानिक दृष्टिकोन प्रशिक्षण, बुवाबाबांचा भंडाफोड आणि अंधश्रद्धाविरोधी प्रबोधन अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजपरिवर्तनाची चळवळ उभी करण्यात आली.

या पुरस्कारामुळे वर्धा जिल्ह्याच्या सामाजिक कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून विविध सामाजिक संस्था, संघटना आणि नागरिकांनी अंनिसच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी सुरू असलेल्या या लढ्याला मिळालेली ही मोठी राज्यस्तरीय पावती मानली जात आहे.

## संक्षिप्त

### नागाझरीत घरफोडी; ८० हजारांचे मंगळसूत्र लंपास

**कारंजा :** नागाझरी येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.मनीषा चोपडे (३७) यांचे कुटुंब रात्रीच्या वेळी घराच्या स्लॅबवर झोपले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील साहित्याची पाहणी करत त्यांनी सोन्याचे मंगळसूत्र लंपास केले. सकाळी उठल्यानंतर घरातील वस्तूंची तपासणी करताना चोरीचा प्रकार निदर्शनास आला. घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी रात्रीच्या वेळी अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित केले आहेत. अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू असून परिसरातील संशयितांवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

### क्षुल्लक वादातून युवकाला बेदम मारहाण

**वर्धा :** क्षुल्लक कारणावरून एका युवकाला लाथाबुक्क्यांनी तसेच दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना सावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एवोनिथ कंपनी परिसरात घडली.नीलेश मानकर (३४, रा. भूगाव) हे भोजनासाठी जुबेर धाब्यावर गेले होते. तेथे काही मित्र भेटल्याने त्यांच्यात चर्चा सुरू होती. दरम्यान, प्रवीण सातपुते तेथे आला. तुम्ही माझ्याबद्दल काय बोलता, असा जाब विचारत त्याने नीलेश यांच्याशी वाद घातला. वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. आरोपीने लाथाबुक्क्यांनी तसेच दगडाने हल्ला करून नीलेश यांना जखमी केले. घटनेनंतर जखमीने सावंगी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला असून आरोपीचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### बसस्टॉपवर झोप लागली; दुचाकी व मोबाईल चोरीला

वर्धा : बसस्टॉपवर विश्रांती घेत असताना युवकाची दुचाकी आणि मोबाईल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना पिपरी (मेघे) येथील गुरष्ठ गुरुकृपा लॉन परिसरात घडली.रोशन कोहळे (२९, रा. ज्ञानेश्वरनगर) हे हॉटेलमधून भोजन करून घरी परतत होते. वाटेत अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी करून बसस्टॉपवर विश्रांती घेतली. थकव्यामुळे त्यांना झोप लागली. काही वेळाने जाग आल्यावर त्यांची एमएच-३२ एबी-००५८ क्रमांकाची दुचाकी आणि मोबाईल फोन गायब असल्याचे दिसून आले. अज्ञात चोरट्यांनी दोन्ही वस्तूंवर हात साफ केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी रामनगर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. चोरट्यांचा शोध सुरू आहे.

### कीटकनाशक प्राशनाने वृद्धाचा मृत्यू

**देवळी :** इंदिरानगर येथील एका वृद्धाने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या प्रकरणी देवळी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. किसन कामडी (६३, रा. इंदिरानगर) यांनी त्यांच्या राहत्या घरी कीटकनाशक प्राशन केले होते. प्रकृती गंभीर झाल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला.घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून विविध अंगांनी तपास केला जात आहे. वृद्धाच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईकांनी शोक व्यक्त केला आहे. तपास देवळी पोलीस करीत आहेत.

## वर्धा-नागपुरात मानसिक आरोग्य सेवांचे जाळे अधिक मजबूत

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये मानसिक आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री अनर्ह् ईंर्हैन्े यांच्या नेतृत्वाखाली नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या ‘उडान’ प्रकल्पाला पाच वर्षांची मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

शासनाच्या निर्णयानुसार, ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर आणि अन्यथा फाऊंडेशन यांच्या सहकार्याने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०३१ या कालावधीत हा करार लागू राहणार असून तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्याने शासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही.

राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मेंदू विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणानुसार देशातील १० ते १४ टक्के प्रौढ नागरिक मानसिक आरोग्याच्या समस्यांनी ग्रस्त आहेत. महाराष्ट्रात ही संख्या तब्बल १.२ ते १.८ कोटींच्या दरम्यान असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मानसिक आरोग्याला प्राधान्य देत शासनाने ‘उडान’ प्रकल्पाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रकल्पांतर्गत गावपातळीवर जनजागृती, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मानसिक आरोग्य सेवा, मनुष्यबळ प्रशिक्षण, मातृ मानसिक आरोग्य कार्यक्रम तसेच समुपदेशन व मानसोपचार सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. नागपूरमध्ये मिळालेल्या यशानंतर आता वर्धा जिल्ह्यातही हा उपक्रम विस्तारला जाणार असून ग्रामीण नागरिकांना स्थानिक स्तरावरच मानसिक आरोग्य उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## जिद्दीच्या पंखांना यशाची भरारी
# गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी गौरव सोहळा

**वर्धा/ जनमाध्यम**

प्रयत्न सोडणारे कधी जिंकत नाहीत आणि जिंकणारे कधी प्रयत्न सोडत नाहीत, हा प्रेरणादायी संदेश देत संत पैकाजी महाराज सेवा समिती, वर्धा (वांढेकर कुणबी समाज) यांच्या वतीने आयोजित विद्यार्थी मार्गदर्शन शिबिर व गुणगौरव सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. नालवाडी येथील माँ भगवती अनुसया माता सेलिब्रेशन हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान तर केलाच, शिवाय त्यांच्या स्वप्नांना नवी दिशा दिली.

इयत्ता दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थी तसेच नवोदय विद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन संत पैकाजी महाराज, समाजभूषण स्व. विनायकराव चौधरी आणि संस्थापक अध्यक्ष स्व. रा. म. धोटे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून



करण्यात आले.

मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना करिअर, स्पर्धा परीक्षा, आत्मविश्वास आणि जीवनमूल्यांबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे, एक विद्यार्थी एक झाड या पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला रोपटे, ट्रॉफी, प्रशस्तीपत्र, पुस्तक संच आणि रोख पारितोषिक देण्यात आले.

समितीचे अध्यक्ष गुरुदेव चौधरी यांनी गेल्या बारा वर्षांतील सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला.

विद्यार्थी, पालक आणि समाजबांधवांच्या मोठ्या उपस्थितीत झालेला हा सोहळा केवळ सत्काराचा नव्हता, तर नव्या पिढीच्या स्वप्नांना बळ देणारा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज प्रगतीचा संदेश देणारा ठरला.

# कधी उजाडणार बळीराजाच्या सुखाचे दिवस

## बी-बियाणे, खते, औषधांचे भाव गगनाला; शेतमाल मात्र कवडीमोल

**कारंजा घाडगे/ जनमाध्यम**

महागाईच्या वणव्यात सर्वसामान्यांसह आता बळीराजाही होरपळून निघत आहे. एका बाजूला पेट्रोल-डिझेल, गॅस सिलिंडर, बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीचे दर आकाशाला भिडले आहेत, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या घामाने पिकवलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडण्याच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. त्यामुळे 'कधी येणार बळीराजाचे सुखाचे दिवस?' असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. शेती हा देशाचा कणा मानला जातो. मात्र याच कण्याला मोडून काढण्याचे काम वाढती महागाई करीत असल्याचे चित्र आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढला असून त्याचा थेट फटका शेतीला बसत आहे. बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, वीज बिल, सिंचन आणि मजुरी यासाठी शेतकऱ्यांना पूर्वीपेक्षा अनेकपटीने अधिक खर्च करावा लागत आहे. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना बाजारात शेतमालाला मात्र अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे.

कांदा, टोमॅटो, सोयाबीन, कापूस, ऊस आणि भाजीपाल्याचे दर अनेकदा उत्पादन खर्चापेक्षाही कमी मिळतात. शहरात प्रत्येक वस्तू महाग होत असताना शेतकऱ्याचा माल मात्र स्वस्तच राहतो, ही मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे शेती व्यवसाय तोट्याचा ठरत असून ग्रामीण भागातील तरुण शेतीपासून दूर जात असल्याचे वास्तव समोर येत आहे.

विशेष म्हणजे ग्राहकांना बाजारात भाजीपाला आणि धान्य महाग मिळत असले तरी त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. दलाल आणि व्यापाऱ्यांच्या साखळीत उत्पादक व ग्राहक यांच्यात मोठी दरी निर्माण झाली आहे. शेतकरी कमी दरात माल विकतो, तर तोच माल बाजारात दुप्पट-तिप्पट दराने विकला जातो.

वाढती महागाई, बदलते हवामान, पाण्याची टंचाई आणि बाजारातील अस्थिरता यामुळे बळीराजाचे जगणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. शासनाकडून कर्जमाफीच्या घोषणा केल्या जात असल्या तरी शेतकऱ्यांचे मूळ प्रश्न कायम आहेत. भीक नको, आमच्या घामाच्या शेतमालाला योग्य भाव द्या, अशी आर्त हाक आता राज्यातील शेतकरी देत आहेत. बळीराजाच्या कष्टाचा सन्मान करून हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी करणे ही काळाची गरज बनली आहे.



## आधी ओबीसींची नोंद, मगच जनगणना; वर्ध्यात राष्ट्रवादीचा सरकारला इशारा

**वर्धा-** ओबीसी समाजाची खरी लोकसंख्या लपवून त्यांचे घटनात्मक हक्क डावलण्याचा डाव सरकार रचत आहे का, असा प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने सोमवारी वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार आंदोलन छेडले. आधी ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम द्या आणि मगच जनगणना करा अशी ठाम भूमिका घेत पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात ओबीसी समाजाची स्वतंत्र जातनिहाय नोंदणी न झाल्यामुळे शिक्षण, नोकरी, आरक्षण आणि विविध कल्याणकारी योजनांमध्ये समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप करण्यात आला स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत ओबीसी समाजाची अधिकृत लोकसंख्या सरकारकडे उपलब्ध नसल्याची बाब अधोरेखित करत आंदोलकांनी १९३१ नंतर देशात ओबीसींची स्वतंत्र जनगणना झाली नसल्याची आठवण करून दिली. मंडल आयोगाने ५२ टक्के लोकसंख्या असल्याचा अंदाज व्यक्त केला होता; मात्र आजही सरकारकडे यासंदर्भातील अचूक आकडेवारी नाही. त्यामुळे ओबीसी समाजाला न्याय द्यायचा असेल तर जनगणनेच्या अर्जात स्वतंत्र कॉलमचा समावेश करणे अपरिहार्य असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. एकीकडे डिजिटल आणि आधुनिक जनगणनेच्या घोषणा केल्या जात असताना दुसरीकडे नागरिकांमध्ये संभ्रम आणि असंतोष वाढत असल्याचा आरोपही करण्यात आला. ग्रामीण भागात जनगणनेला विरोध करणाऱ्या नागरिकांवर दबाव टाकला जात असल्याची टीका करत लोकशाही व्यवस्थेत अशी दडपशाही खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा देण्यात आला.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १९२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# तडीपार गुन्हेगाराचा पोलिस ठाण्यात धुडगूस

## महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन, शासकीय मालमत्तेची तोडफोड

### परतवाडा पोलिस ठाण्यात मध्यरात्रीचा गोंधळ

**परतवाडा/प्रतिनिधीः-** परतवाडा पोलिस ठाण्यात रविवारी मध्यरात्री एका तडीपार गुन्हेगाराने धुडगूस घालत पोलिस यंत्रणेलाच आव्हान दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पोलिस ठाण्यात घुसून शिवीगाळ, धमक्या, महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन आणि शासकीय मालमत्तेची तोडफोड केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनायक शंकर गुळदे वय (४८, रा. धोतरखेडा, अचलपूर) हा रविवारी रात्री उशिरा मोटारसायकलवरून परतवाडा पोलिस ठाण्यात आला. तडीपार कारवाईबाबत संताप व्यक्त करत त्याने पोलिस ठाण्याच्या प्रवेशद्वाराजवळच मोटारसायकल आदळून गोंधळ घालण्यास सुरुवात केली. यावेळी त्याने पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना उद्देशून अश्लील भाषेत शिवीगाळ केली. गोंधळ वाढत असल्याने ड्युटीवरील महिला पोलिस कर्मचारी घटनास्थळी आल्या असता आरोपीने त्यांच्याशीही अशोभनीय वर्तन केले. अश्लील इशारे करत त्यांचा पाठलाग केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. या घटनेमुळे पोलिस ठाण्यात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, आरोपीला शांत करण्यासाठी पुढे आलेल्या पोलिस कर्मचारी यांच्याशी त्याने धक्काबुक्की केली. कॉलर पकडून जीवे मारण्याची धमकी देतानाच कार्यालयातील टेबलवरील शासकीय रजिस्टर उचलून फेकल्याने त्याचे नुकसान झाले. गुळदे याला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न सुरू केल्यानंतर त्याने कर्मचाऱ्यांशी झटापट केली. स्वतःलाच दुखापत करून पोलिसांवर आरोप करण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. पोलिस ठाण्याच्या भिंतीवर डोके आपटणे तसेच स्वतःची जीभ चावून जखमी करून घेण्याचा प्रकार त्याने केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिस कर्मचारी मंगेश अघलते यांच्या तक्रारीवरून विनायक गुळदे याच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, शासकीय मालमत्तेचे नुकसान, धमकी देणे व इतर संबंधित कलमांन्वये परतवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, स्वतःविरुद्ध करण्यात आलेल्या तडीपार कारवाईचा राग मनात धरून आरोपी पोलिस ठाण्यात पोहोचला होता. यावेळी त्याने पोलिसांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# वादळासह पावसाचा अमरावतीत वीज यंत्रणेवर परिणाम

## खंडित झालेल्या ५ उपकेंद्राचा वीज पुरवठा युध्द पातळीवर पुर्ववत

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रचंड वादळासह पावसाचा परिणाम होऊन सोमवारी संध्याकाळी अमरावती शहरातील ५ उपकेंद्रे बाधित झाली होती. परंतू वादळ थांबताच महावितरण कर्मचाऱ्यांनी कामाला युध्दस्तरावर गती देवून प्रथम बाधित झालेल्या उपकेंद्राचा वीज पुरवठा काही तासातच पुर्ववत केला आहे. परंतू अद्याप उपकेंद्रापासून ग्राहकांना होणारा वीज पुरवठ्याचे काम गतीने सुरू असून वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.



पावसासह वादळाचा प्रचंड वेगामुळे तांत्रिक बिघाड निर्माण होऊन ३३ केव्ही वडाळी आणि ३३ केव्ही विद्युत भवन उपकेंद्राचा वीज पुरवठा २२० केव्ही कोंडेश्वर या अतीउच्चदाब उपकेंद्रापासून संध्याकाळी ५ : ८ वाजता बंद पडला. परंतु महावितरणच्या तत्परतेने या दोन्ही उपकेंद्राचा वीज पुरवठा काही मिनिटातच म्हणजे ५:३० वाजता पुर्ववत करण्यात आला. झाड पडून बंद पडलेले कॉंग्रेस नगर उपकेंद्रही ५:३२ ला सुरू करण्यात आले. तसेच २२० केव्ही लालखडी उपकेंद्रातून वीज पुरवठा होणारी ३३ केव्ही पॉवर हाऊस आणि ३३ केव्ही हनुमान नगर उपकेंद्राचा वीज पुरवठा अनुक्रमे २२० केव्ही राहटगाव आणि ३३ केव्ही अकोली उपकेंद्रातून बॅकफिडींगच्या माध्यमातून पुर्ववत करण्यात आला आहे.

वीज दुरूस्तीच्या कार्याला युध्दस्तरावर गती देण्यात आली असून उपकेंद्रानंतर वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी असणारे ९८ पैकी ९६ फिडरचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात महावितरणला यश आले आहे. ३३ केव्ही हनुमान नगर उपकेंद्रावरील बाकी असलेल्या दोन फिडरच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे. तसेच फिडरनंतर महावितरणने रोहित्र निहाय दुरूस्ती कार्याला गती दिली आहे. टप्प्या - टप्प्याने वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी झाडे वीज वाहिन्यांवर पडल्याने, ते हटवून वीज पुरवठा दुरूस्त करण्यास थोडा कालावधी लागत आहे. मुख्य अभियंता अशोक साळुंके तसेच अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांचे संपूर्ण परिस्थितीवर लक्ष असून या काळात सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

### काली माता मंदिराजवळील वडाचे झाड कोसळले



आज दिनांक ८ जून २०२६ रोजी ४ वाजता वादळी पावसामुळे सबनीस प्लॅाट काली माता मंदिराचे मोठे वडाचे झाड रस्त्यावर पडले होते. नगरसेवक हिवसे यांनी भ्रमणध्वनीवरून तत्काळ सूचना दिल्याप्रमाणे त्या ठिकाणी महापालिकेच्या पथकाने पोहोचून त्यांचे सोबत उपस्थित सह त्वरित जेसीबी ची व्यवस्था करण्यात आली.

# प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांना पितृशोक

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांचे वडील शामराव चंद्रभानजी गवई यांचे आज रविवार दि.७ जून रोजी रात्री ८ वा. च्या सुमारास दिर्घआजाराने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. निधनाची बातमी कळताच देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती भूषण रा. गवई यांनी सुभाष गवई यांना फोनद्वारे संवेदना व्यक्त केली.



स्व. शामराव चं. गवई हे ज्ञानमाता हायस्कुल मध्ये गणित विषयाचे शिक्षक आणि व्हॉलीबॉल चे उत्कृष्ट खेळाडू होते. त्यांची अंत्ययात्रा आज सोमवार दि.८ जून ला दु. १२.३० वा त्यांचे निवासस्थान येथून निघाली. कॉंग्रेस नगर येथील ख्रिचन स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. शामराव गवई यांच्या पश्चात दोन मुले सुधीर गवई, प्राचार्य डॉ. सुभाष गवई, तीन मुली संध्या, एड. सुलभा, माधुरी यांचे सह जावई प्रदीपराव वानखडे, रत्नदीपराव खंडारे, मनिषराव बरडे यांच्यासह सुना, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# एस. बी. खोबरागडे यांचा नागरी अभिष्टचिंतन सोहळा उद्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एस. बी. खोबरागडे यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त नागरी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन बुधवार (दि.१०) रोजी सकाळी ९ वाजता संबोधीः डॉ. बाबासाहेब आंबेडकर सस्कार भवन, भीमटेकडी, अमरावती येथे करण्यात आले आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर श्रीचंद तेजवाणी हे राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून मनपा आयुक्त वर्षा लड्डा, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, नगरसेवक मंगेश मनोहरे, नगरसेविका अर्चना पाटील, बौद्ध धम्म प्रचार समिती भीम टेकडीचे अध्यक्ष उमेश शहारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

सोहळ्यात सत्कारमूर्ती एस. बी. खोबरागडे यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. खोबरागडे परिवार व मित्र परिवार यांच्या वतीने आयोजित या नागरी अभिष्टचिंतन सोहळयास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पाहिजेत

न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा व्दारा संचालित अनुदानित व विनाअनुदानित शाळेमध्ये रिक्त पद भरणे आहे.

| अ.क्र. | पदाचे विवरण | शैक्षणिक पात्रता | पद संख्या | पुर्ववेळ / अर्धवेळ | वेतन | अनुदानित / विनाअनुदानित | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविद्यालय शाखा एच.एस.सी.व्ही | एम.ए.मराठी. बी.एड (व्दितीय श्रेणी) | १ | घडयाळी तासिका नुसार | शासन नियमाप्रमाणे | अनुदानित | |
| | | एम.ए. इंग्रजी, बी.एड (व्दितीय श्रेणी) | १ | | | | |
| | | एम.कॉम बी.एड (व्दितीय श्रेणी) पायाभुत अभ्यासक्रम | १ | | | | |
| २ | गांधी प्राथमिकशाळा (मराठी माध्यम जुनी वस्ती, बडनेरा, पुर्व प्राथमिक शिक्षक (के.जी १ केजी २) | एस.एस.सी./एच.एस.सी (विज्ञान शाखा) बी.एस.सी./एम.एसी. डी.एड. मॉन्टेसरी | ३ | पूर्णवेळ | एकमुस्त मानधन | विनाअनुदानित | |
| ३ | गांधी प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम जुनी वस्ती, बडनेरा, पुर्व प्राथमिक शिक्षक (के.जी १ केजी २) १ ते ४ | एच. एस.सी टी.ई.टी. (विज्ञान शाखा) बी.एस.सी./एम.एसी डी.एड. मॉन्टेसरी | ७ | पूर्णवेळ | एकमुस्त मानधन | | |

**टिपः १)** इच्छुक पात्रता धारक उमेदवारांनी शनिवार दि.१३.०६.२०२६ ला प्रत्यक्ष मुलाखतीसाठी संस्थेचे कार्यालय, गांधी विद्यालय, बडनेरा रेल्वे. (रेल्वे स्टेशनजवळ) ता.जि. अमरावती. येथे सकाळी १०.०० वाजता आपले शैक्षणिक, व्यवसायिक व इतर पात्रतेच्या मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने हजर राहावे.

**डॉ.श्री.बळीरामजी ना.ग्रेसपुजे**
**सभापती शाळा समन्वय समिती, न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा रेल्वे.ता.जि. अमरावता**

**श्री.विनोद व. चिचोळकर**
**सचिव, न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेरा रेल्वे. ता.जि. अमरावती.**

**डॉ.श्री. हेमंतजी मु.देव**
**अध्यक्ष, न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा रल्वे, ता.जि. अमरावती.**

## जाहीर नोटीस

आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **विपुल भानुदास ठाकरे, रा.पथ्रोट, ता.अचलपूर, जि.अमरावती** यांचेपासून त्यांचे मालकीची खालील वर्णनांकित शेत जमीन खरेदीखत क्र.९२३/२०२६ दि. ०७.०२.२०२६ नुसार विकत घेतलेली आहे. त्या मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

नोंदणी पोट तुकडी, अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हददीतील मौजे परसोडा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे क्र.४६/१ व ४६/२, शेत गट क्र.२०९ मधील ३ हे २३ आर जमीनीतील सहायक संचालक नगर रचना अधिकारी अमरावती यांचे आदेश क्र.१८२२ दि.१२.११.१९८७ नुसार लेआउट मंजूर व वि.एस.डी.ओ. साहेब अमरावती यांनी त्याचे फाईलावरील ज्याचा रा.मा.क्र. एन.ए.पी.-३४/ परसोडा-८/१९८७-१९८८ नि.ता. २८.०२.१९८७ नुसार लेआउट मंजूर झालेल्या जागेतील प्लॉट क्र. १ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७८.५ चौ.मी.(८४४६.११चौ.फुट) आहे ज्याची चर्तुःसिमा :-

पुर्वेस - प्लॉट नं. २ पश्चिमेस - लेआउट मधील रोड
उत्तरेस - प्लॉट नं. ६ व ७ दक्षिणेस- अमरावती-आर्वी रोड

सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्ता माझे पक्षकार यांनी रजिस्टर्ड खरेदीखतानुसार विकत घेतलेली आहे. सदर मालमत्तेबाबत आता कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार कोणाशीही करु नये.तसा केल्यास तो माझे पक्षकार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. कृपया आम जनतेने याची नोंद घ्यावी.

करिता सदरची जाहीर नोटीस.

दिनांक :- ०९.०६.२०२६
अमरावती

**सही /-**
**ॲड. नरेश एम.सोनी**
**मो.९०९६३११२५९**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री.ए.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.८८८/२०२६
**सुमीत व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.०६.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Sumit Prkashrao Mohod, Age 35 Yrs. Occu.: Business R/o. Near Masjid Pravi Nagar, Amravati
2. Snehal Prakashrao Mohod, Age 38 Yrs. Occu.: Household R/o C/o. Ganeshe Kene, flat No. E-1803,E-Block Arvind Oasis B/h Sheetal Petrol Pump, Nagasandra, Dist- Bengluru (Karnataka)

-- विरुध्द --

**गैरअर्जदार : निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रकाशराव गंगाधर मोहोड** हे दिनांक 08.09.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुमित व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुमित व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **विपुल भानुदास ठाकरे, रा.पथ्रोट, ता.अचलपूर, जि.अमरावती** यांचेपासून त्यांचे मालकीची खालील वर्णनांकित शेत जमीन खरेदीखत क्र.९२८/२०२६ दि.०७.०२.२०२६ नुसार विकत घेतलेली आहे. त्या मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

नोंदणी पोट तुकडी, अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावतीचे हददीतील मौजे परसोडा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे क्र.४६/१ व ४६/२, शेत गट क्र.२०९ मधील ३ हे २३ आर जमीनीतील सहायक संचालक नगर रचना अधिकारी अमरावती यांचे आदेश क्र.१८२२ दि.१२.११.१९८७ नुसार लेआउट मंजूर व वि.एस.डी.ओ. साहेब अमरावती यांनी त्याचे फाईलावरील ज्याचा रा.मा.क्र. एन.ए.पी.-३४/ परसोडा-८/१९८७-१९८८ नि.ता.२८.०२.१९८७ नुसार लेआउट मंजूर झालेल्या जागेतील प्लॉट क्र. २ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ६३६ चौ.मी.(६८४८चौ.फुट) आहे ज्याची चर्तुःसिमा :-

पुर्वेस - प्लॉट नं. ३ पश्चिमेस - प्लॉट नं. १
उत्तरेस - प्लॉट नं. ५ व ६ दक्षिणेस- अमरावती-आर्वी रोड

सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्ता माझे पक्षकार यांनी रजिस्टर्ड खरेदीखतानुसार विकत घेतलेली आहे. सदर मालमत्तेबाबत आता कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार कोणाशीही करु नये. तसा केल्यास तो माझे पक्षकार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. कृपया आम जनतेने याची नोंद घ्यावी.

करिता सदरची जाहीर नोटीस.

दिनांक :- ०९.०६.२०२६
अमरावती

**सही /-**
**ॲड. नरेश एम.सोनी**
**मो.९०९६३११२५९**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, नामे सौ.प्रतिभा नरेश भुसारी, रा.जलाराम नगर, अमरावती यांनी इक्वीटास स्मॉल फायनान्स बॅकेकडून रुपये ११,००,०००/-(अक्षरी अकरा लाख रुपये) लोन घेतलेले आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

प्लॉट नं.३२, एसआर नंबर २२ व ५९/२, याचे क्षेत्रफळ ६०० चौ.फुट, मौजे- राजापेठ, प्रगणे-बडनेरा, अमरावती

पुर्वेस - रोड
पश्चिमेस - गजभिये यांचे घर
उत्तरेस - रोड
दक्षिणेस - सर्व्हीस लाईन

सदर्हू वरील वर्णनाचा व चर्तुःसिमेवरील सदर मिळकत सबंधी इतर कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसबंध, बोजा, गहाण व इतर कसलाही प्रकारचा अधिकार असल्यास, त्या संबंधी नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०३ (तीन) दिवसाचे आंत व लवकरात लवकर लेखी हस्तक्षेप/ आक्षेप कागदपत्रांसह नोंदवावा अन्यथा त्यासंबंधी कुठलीही हरकत नसल्याचे गृहीत धरण्यात येईल. त्यानंतर कोणाचाही, कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी , करिता ही जाहीर नोटीस.

**आपली**
**सौ.प्रतिभा नरेश भुसारी**
**अमरावती**

## जाहीर नोटीस

आम जनतेला सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार चंद्रकांत विठ्ठलराव कुरडकर रा. अर्जुन नगर, अमरावती यांनी खालील वर्णनांकित शेत १) संजय पंजाबराव डहाके, रा.रहाटगावं, अमरावती, २) सुनिता अजय डाहाके,रा.अर्जुन नगर, अमरावती, ३) माधुरी देवानंद कावलकर, रा.पिंपळखुटा, ता.जि.अमरावती, ४) विमल पंजाबराव डहाके, रा.तळेगांव जि.वर्धा, ५) अक्षिता अजयराव डाहाके,रा.अमरावती, ६) नमिता अजयराव डाहाके रा.अमरावती यांचे कडून माझे पक्षकाराने खरेदी करण्याचा सौदा केला आहे. सदर शेत जमीनीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

नोंदणी पोट तुकडी, वर्धा व पोट तुकडी आष्टी ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व वर्धा न.प. चे हददीतील मौजा तळेगाव, ता.आष्टी, जि.वर्धा येथील भुमापन क्र. भूमापन ९८, भोगवटदार वर्ग १, खाते क्र.८८, फेरफार क्र.९१७, आकारणी रु. ६.३० पै, एकुण क्षेत्रफळ १ हे १६ आर शेत जमीन व यातील झाडा झुडपासह व तदंगभुत वस्तुंसह सदरहू शेत जमिनीची चर्तुःसिमा :-

पुर्वेस - पांदण रस्ता व अनंत पांडुरंग इंगळे यांचे शेत
पश्चिमेस - पांदण रस्ता व रविंद्र मुरलीधर भुयार यांचे शेत
उत्तरेस - पांदण रस्ता व सरकारी जमिन
दक्षिणेस- अशोक भगवान दुर्ग यांचे शेत व रस्ता

वरील नमुद मिळकत (शेतजमीन) माझे पक्षकार यांनी क्र.१ ते ६ यांच्यासोबत खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे.

तसेच सदरच्या मालमत्तेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज गहाण बोजा किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क आणि हितसबंध अथवा कोणाचाही आक्षेप किंवा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास किंवा सदरची शेतजमीन कोणत्याही सरकारी प्रकल्पाअंतर्गत संपादीत झाली असल्यास किंवा सदर शेताच्या वहीवाट व रस्त्याबाबत काही आक्षेप असल्यास सदरचा जाहीरनामा प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कागदपत्रांसह खालील पत्यांवर संपर्क करावा. अन्यथा त्यानंतर कोणाचाही उजर चालणार नाही. करिता सदरचा जाहीरनामा.

**अमरावती**
**दिनांक ०८/०६/२०२६**

**सही /-**
**ॲड. मंगेश बी.तिडके**
**मो.९३२६४४९२४९**

महाराष्ट्र शासन
## तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय
**(जन्म मृत्य प्रमाणपत्र शाखा)**
**Email-tah.chanduRz@gmail.com**

क्र/स.म.अ./कावी ४२६/२०२६ दिनांक ०८.०६.२०२६

### जाहिरनामा

**अर्जदार :- जरिना अंजुम अ. बशीर**
**रा. देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती**

**-: विरुध्द :-**

**गैरअर्जदार :- :- निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा ग्रामपंचायत’**
**ता. चांदुर बाजार जि. अमरावती**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहिरपणे कळविण्यात येते की, **जरिना अंजुम अ. बशीर रा. देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती** यांनी स्वतः चे **जन्म दिनांक ०१.११.१९८१** त्यांचा राहत्या घरी झाला परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म मृत्यु कार्यालय ग्रामपंचायत देऊरवाडा पंचायत समिती चांदुर बाजार जि. अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत देऊरवाडा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.वरील जन्माची नोंदकरुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काहि आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अथवा हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सदर जाहिरनामा आज दिनांक ०८.०६.२०२६ रोजी माझ्या सहि व शिक्क्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.

शिक्का

**तहसिलदार तथा तालुका**
**दंडाधिकारी चांदुरबाजार**

महाराष्ट्र शासन
## तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय
**(जन्म मृत्य प्रमाणपत्र शाखा)**
**Email-tah.chanduRz@gmail.com**

क्र/स.म.अ./कावी ४२७/२०२६ दिनांक ०८.०६.२०२६

### जाहिरनामा

**अर्जदार :- समीना बानो अ. बशीर रा. देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती**

**-: विरुध्द :-**

**गैरअर्जदार :- निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा ग्रामपंचायत**
**ता. चांदुर बाजार जि. अमरावती**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहिरपणे कळविण्यात येते की, **समीना बानो अ. बशीर रा. देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती** यांनी **स्वतः चे जन्म दिनांक ०९.०३.१९८८** त्यांचा राहत्या घरी झाला परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म मृत्यु कार्यालय ग्रामपंचायत देऊरवाडा पंचायत समिती चांदुर बाजार जि. अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत देऊरवाडा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंदकरुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काहि आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल करावयात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अथवा हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सदर जाहिरनामा आज दिनांक ०८.०६.२०२६ रोजी माझ्या सहि व शिक्क्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.

शिक्का

**तहसिलदार तथा तालुका**
**दंडाधिकारी चांदुरबाजार**

महाराष्ट्र शासन
## तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय
**(जन्म मृत्य प्रमाणपत्र शाखा)**
**Email-tah.chanduRz@gmail.com**

क्र/स.म.अ./कावी ४२८/२०२६ दिनांक ०८.०६.२०२६

### जाहिरनामा

**अर्जदार :- मोहम्मद जफिर मोहम्मद बशीर**
**रा. देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती**

**-: विरुध्द :-**

**गैरअर्जदार :- निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा ग्रामपंचायत देऊरवाडा**
**ता. चांदुर बाजार जि. अमरावती**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहिरपणे कळविण्यात येते की, **मोहम्मद जफिर मोहम्मद बशीर रा. देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती** यांनी स्वतः चे **जन्म दिनांक ०२.०३.१९७९** त्यांचा राहत्या घरी झाला परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म मृत्यु कार्यालय ग्रामपंचायत देऊरवाडा पंचायत समिती चांदुर बाजार जि. अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत देऊरवाडा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंदकरुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काहि आक्षेप अथवा हरकत असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आपला आक्षेप अथवा हरकती लेख स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अथवा हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सदर जाहिरनामा आज दिनांक ०८.०६.२०२६ रोजी माझ्या सहि व शिक्क्यानिश प्रसिध्दी करण्यात येत आहे.

शिक्का

**तहसिलदार तथा तालुका**
**दंडाधिकारी चांदुरबाजार**

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस
**विजय जी. परवरे, दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) भातकुली, जि अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक- १६०/२०२६ ने.ता. २०/०६/२०२६

अर्जदार :- **1-Gopal Vishnu Makesar**, Age- 50 yrs, Occu- Labour, R/o. Jalaka Hirapur, Tq. Dist. Amravati.**2-Smt. Suman Vishnu Makesar,** Age- 78 yrs, Occu- Household, R/o. Jalaka Hirapur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati.**3-Ranjan Ambadas Tayade,** Age- 78 yrs, Occu- Household, R/o. Ward No. 1, Brahamanwada Pathak, Post. Sonori, Tq. Chandur Bz, Dist. Amravati.

**-विरुध्द- गैरअर्जदार - निरंक**

यापेक्षा **Vishnu Bodhaji Makesar** के दि. २६/१२/२०२५ रोजी मयत झाले. अर्जदार **Gopal Vishnu Makesar, Age- 50 yrs, Occu- Labour, R/o. Jalaka Hirapur, Tq. Dist. Amravati.** व इतर यांनी **बॉम्बे रेग्यूलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि. १७/०४/२०२६ रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Vishnu Bodhaji Makesar** यांचे वारस आहेत. ते सदरहु **Vishnu Bodhaji Makesar** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या अर्जदार फक्त मयत जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावीत. तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहु अर्जदारांना मयताचे वारस म्हणुन घोषित करण्यात येईल आणि त्या नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.आज दि. २०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**(कनिष्ठ स्तर) भातकुली**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शेतकरी कर्जमुक्ती योजनेत सुधारणा करण्याची बच्चू कडू यांची मागणी

**अमरावती/का.प्र.**
विधान परिषद सदस्य तथा माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील त्रुटी दूर करून अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात बच्चू कडू यांनी नमूद केले आहे की, २०२६ मध्ये जाहीर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत अनेक शेतकरी पात्र असूनही विविध कारणांमुळे लाभापासून वंचित राहणार आहेत. अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती तसेच आर्थिक अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांना नियमित कर्जफेड करणे शक्य झाले नाही. त्यामुळे कर्जमाफी



योजनेतील पात्रतेच्या अटींमध्ये बदल करून वंचित शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.तसेच, योजनेअंतर्गत देण्यात येणारी ५० हजार रुपयांची प्रोत्साहनपर अनुदान रक्कम १ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याची मागणी त्यांनी केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे आणि भविष्यातही कर्जफेडीची शिस्त कायम राहावी, यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.आ. कडू यांनी महिला, दिव्यांग, अल्पभूधारक शेतकरी, भूदानधारक तसेच इतर वंचित घटकांनाही सरसकट कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी केली आहे. याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ आणि महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत पात्र ठरलेल्या, मात्र लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.नगर पंचायत, महानगरपालिका, ग्रामपंचायत सदस्य, हंगामी कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी आणि सेवा सहकारी संस्थांच्या संचालकांनाही कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही आ. बच्चू कडू यांनी शासनाला दिला आहे.

# नगराध्यक्षांनी घेतला पाणीटंचाई संदर्भात आढावा

## निधी मंजूर असून मुख्य रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण; नाल्याला अंडरग्राऊंडची नागरिकांनी केली मागणी

**अचलपूर/वार्ताहर**
अचलपूर शहरातील मालवेशपुरा परिसराची ८ जून रोजी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी पाहणी करून पाणीटंचाई संदर्भात आढावा घेतला आणि पाणीटंचाई ची समस्या मार्गी लावण्याचे निर्देश पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहे .आणि पाइपलाइन टाकण्याचे काम ही सुरू झाले आहे. यावेळी प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक कल्लू महाराज दीक्षित,नगरसेविका सौ.कविता आखुड प्रामुख्याने उपस्थितीत होते.यावेळी माळवेशपुरा परिसरातील काशीकर फटाका सेंटर ते श्याम मेहाडीया यांच्या घरापर्यंत मुख्य रस्त्याची दुरावस्था झाली असून निधी मंजूर होऊन ही कामाला तत्काळ सुरू करणे आणि भव्य - दिव्य नाल्याला अंडरग्राऊंड करण्याची मागणी सुद्धा गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांकडून होत आहे .यामुळे अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष सौ.रुपाली माथने यांनी काल माळवेशपुरा परिसराची पाहणी केल्याने आता मालवेशपुरा परिसरातील प्रलबीत समस्या मार्गी लागणार असल्याची आशा नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.यावेळी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष सौ.रुपाली माथने यांनी नागरिकांशी संवाद ही



साधला.अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात एकूण २० प्रभाग आहे .आणि अनेक प्रभागात पाहणी करून नागरिकांशी संवाद साधत विविध समस्या जाणून त्या सोडविण्यासाठी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने अग्रेसर असल्याने त्यांच्या कार्यशैलिचे कौतुक होत आहे.आणि अचलपूर नगर परिषद शहर कार्यालयात ही अनेक वेळी सकाळीच उपस्थितीत राहून साफसफाईचा आढावा सुद्धा अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष सौ.रुपाली माथने यांनी घेतला आहे .अचलपूर शहरातील माळवेशपुरा परिसरात पाणीटंचाई ची गंभीर समस्या मुळे नागरिक त्रस्त झाले आहे. त्यानुषंगाने नगरसेवक कल्लू महाराज दीक्षित,नगरसेविका सौ.कविता आखुड यांनी पाणी टंचाई चा मुद्दा रेटून धरल्याने याची तत्काळ दखल घेत अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष सौ.रुपाली माथने यांनी पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी यांना उपाययोजना करण्याचे निर्देश दिले .यामुळे आता या परिसरातील मुख्य रस्त्याचे कायापालट होऊन भव्य - दिव्य नाल्याचे अंडरग्राऊंड करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.ही मागणी आता मार्गी लागणार अशी आशेची किरण माळवेशपुरा परिसरात अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष सौ.रुपाली माथने यांनी केल्यानंतर निर्माण झाल्या आहे.

### लग्नाच्या वरातीत नाचण्यावरून दोन गटात वाद

# आरोपींना ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यामध्ये जामीन मंजूर

## ॲड. शिरीष जाखड व ॲड. विक्रम सरवटकर यांचा यशस्वी युक्तिवाद

**अमरावती/का.प्र.**
नांदगाव पेठ पोलीस स्टेशन हद्दीतील टाकळी जहागीर येथे लग्नाच्या वरातीत नाचण्याच्या कारणावरून झालेल्या दोन गटांतील वाद प्रकरणातील आठ आरोपींना अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आरोपींच्या वतीने ॲड.शिरीष जाखड व ॲड. विक्रम सरवटकर यांनी केलेला युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरत २ जून रोजी जामीन मंजूर करण्याचा आदेश दिला. मिळालेल्या माहितीनुसार, २ मे २०२६ रोजी टाकळी जहागीर येथे फिर्यादीच्या मित्राच्या लग्नाची वरात गावातून जात असताना वरातीत नाचण्याच्या कारणावरून फिर्यादी व आरोपी यांच्यात वाद झाला. सुरुवातीला झालेला वाद शिवीगाळपर्यंत मर्यादित होता परंतु काही वेळाने त्याचे रूपांतर दगडफेक व मारहाणीमध्ये झाले.तक्रारीनुसार, काही आरोपींनी फिर्यादीच्या घरासमोर जाऊन शिवीगाळ केली तसेच बौद्ध विहाराजवळ जाऊन इतर आरोपींना लाठ्या काठ्या, लोखंडी रोड, चाकू व दगडांसह बोलावून फिर्यादी व त्यांच्या मित्रांना मारहाण केली. तसेच अश्लील शिवीगाळ करून दोन गटांमध्ये जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी गुन्हा नोंदवून ३ मे २०२६ रोजी आठ आरोपींना अटक केली होती. त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १८९(२) (४), १९१(३), २९६, २९९, ३५१(२) (३) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३(१)(r) (s) व ३(२) (va) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.अटकेनंतर आरोपींच्या वतीने ॲड. शिरीष जाखड व ॲड. विक्रम सरवटकर यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल करून युक्तिवाद केला. न्यायालयाने तो ग्राह्य धरत सर्व आरोपींना जामीन मंजूर केला.या प्रकरणात ॲड. नंदकुमार मुलतैकर, राहुल कडूसकर, चेतन उर्फ गजानन चौके आणि गुणवंत खोब्रागडे यांचेही सहकार्य लाभल्याची माहिती मिळाली आहे.

# रेन वॉटर हार्वेस्टिंगचा विसर पावसाच्या लाखो लीटर पाण्याचा अपव्यय!

**अमरावती-** हवामान बदल,अनियमित पाऊस आणि भूजन पातळीतील घट यामुळे जलसंधारणाचा प्रश्न दिवसेंबदवस गंभीर होत आहे. अशा परिस्थितीत पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग (पावसाचे पाणी संकलन) हा प्रभावी उपाय मानला जातोः मात्र अमरावती जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी अपेक्षित प्रमाणात होत नसल्याचे चित्र आहे. नियम असूनही अनेक शासकीय व खासगी इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था नसल्याने दरवर्षी लाखे लीटर पाणी वाया जात आहे.जिल्ह्यात वार्षिक सरासरी सुमारे ८६२ मि. मी. पाऊस पडतो. हा पाऊस काही दिवसांतच कोसळत असल्याने मोठ्या प्रमाणात पाणी नाल्यांमधून वाहून जाते, हेच पाणी जमिनीत मुरविले, तर भूजलपातळी वाढण्यास मोठी मदत होऊ शकते. त्यामुळे शासनाने नवीन इमारतींच्या बांधकाम परवानग्यांसाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे केले आहे; मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या अटींचे पालन होत नाही.

फ्लॅट विकणे आहे
2 BHK Flat
त्वरित विकणे आहे
Contact: 8275420070

# शिवसेना पक्षासोबत बेइमानी करणाऱ्याला इतिहास कधीच माफ करणार नाही-सुधीर सूर्यवंशी

**कुऱ्हा/वार्ताहर**
एकीकडे उन्हाच्या झळांनी संपूर्ण राज्य होरपळून निघत असतांना दूसरीकडे राज्याच्या राजकारणातही अनेक घडामोडी घडत आहेत निवडणुकांना तसा अवकाश असला तरी सर्वच राजकीय पक्ष पूर्व तयारी म्हणून आपापल्या कार्यकर्त्यां पर्यन्त पोहोचण्याचे वेगवेगळे प्रयत्न करीत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आपल्या शिवसैनिकां मध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी राज्यभर कार्यकर्ता मेळावे आयोजित करण्याच्या सूचना पक्ष नेतृत्वाकडून देण्यात आल्या आहेत. निमित्य आहे ते हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताबदी वर्ष आणि शिवसेना पक्ष स्थापनेला ६० वर्षे पूर्ण



होत आहेत त्यांचं त्या अनुषंगाने शिवसैनिक जोमाने कामाला लागले आहेत.

तिवसा शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षा तर्फे याचं पार्श्वभूमीवर एका दिव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं होतं ज्याने तिवसा तालुक्याचच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याच लक्ष वेधून घेतलं आहे. कार्यक्रमाच्या आयोजनाची जवाबदारी माजी पं.स.सभापती तथा तिवसा विधानसभा संघटक श्री विलास माहूरे यांच्यावर देण्यात आली आणि ती त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने यशस्वीपणे पूर्ण पाडली श्रीजित मंगल कार्यालयाचे मुख्य सभागृह या देदीप्यमान सोहळ्याचे साक्षीदार बनले जेथे शिवसानिकांच्या जय भवानी जय शिवाजी आणि शिवसेना जिंदाबाद च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता कार्यक्रमाची सुरूवात दिप प्रज्वलन आणि महापुरुषांच्या हार अर्पणाने झाली.शिवसेना उपनेते तथा नागपूर जिल्ह्याचे संपर्गप्रमुख श्री.सुधीर सूर्यवंशी यांनी मेळाव्याचे उद्घाटन केले.या प्रासांगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा.अनंतराव गूढे तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हा प्रमुख पराग गुधडे माजी जिल्हा प्रमुख श्री. प्रादिपजी बजाड,शिवसेना उपजिल्हा प्रमुख राजेशभाऊ बंड उपस्थित होते.

यात विष्णुपंत खंडारे, राहूल इंगळे अनकवाडी, आशिष पूनवटकर गुरुदेव नगर,गौरव राऊत दापोरी यांच्या सोबत असंख्य कार्यकर्ता पक्षप्रवेशा वेळी हजर होते.या कार्यकर्ता मेळाव्याला प्रमुख पाहुणे नितीन तारेकर नितीन हटवार तालुका प्रमुख, अशोक पवार जेष्ठ पत्रकार, डॉ कोचर, विलास देशमुख, बच्चू भाऊ वानखडे, जयकांत माहोरे उपासभापती, मंदाबाई श्रीखंडे पतसंस्था अध्यक्ष, बेबी ताई तायडे पतसंस्था उपाध्यक्ष,विनोद ढोणे तालुका प्रमुख सरपंच संघटना, आकाश माहुरे ख. वि. स. तिवासा, हे होते.

व कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी दिलीप केणे तालुका प्रमुख, सुनील तालन उपतालुका प्रमुख, देविदास निकाळजे शहर प्रमुख, शरद वानखडे, उप तालूका प्रमुख, पूनम राघोर्ते तालुका महिला संघटक, पवन खंडारे युवासेना तालुका प्रमुख, श्रीकुशन अरमळ विभाग प्रमुख, गजानन बाळकस विभाग प्रमुख, शरद इंगळे विभाग प्रमुख, गजानन पाथरे उपविभाग प्रमुख दीपक कमलापुरे उपविभाग प्रमुख, गिराधर राठोड उपविभाग प्रमुख, निखिल वाढोणकर उपविभाग प्रमुख, विजय शेलोकर उपविभाग प्रमुख शिशुपाल इखार शहर प्रमुख कुऱ्हा, मनोज काळे उपविभाग प्रमुख, अनिल कळमेघ माझी सभापती, महादेव भुसाटे तालुका समन्वयक, दिलीप चौधरी जेष्ठ शिवसैनिक, अतुल भुयार जेष्ठ शिवसैनिक, संजय निघोट प्रमोद विघणे, विनोद गुल्हाने, दिनेश बगने, शुभाश केवटकर, अजय रावेकर उमेश टेकाडे, प्रवीण हिमाने, सुरज इंगोले, निलेश कामलापुरे, निलेश बोके, हर्षल वानखडे, अंकुश खारकर, अंकुश गहुकार, अतुल ठाकरे, संचालन युवती पदाधिकारी वैष्णवी काजळकर तर आभार पिंटूभाऊ खटे यांनी मानले कार्यक्रमाला शिवसैनिक, महिला आघाडी व युवासेना चे हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर सूचना

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **श्री सुनील पंजाबराव अंबुलकर** रा. पाण्याच्या टाकीजवळ, बुलढाणा ता. जि. बुलढाणा यांच्या ताब्यात असलेले मौजे कठोरा बु. सर्वे नं. ८३/२/अ यामधील प्लॉट क्रं ६ बी व ७ ए यांचे **दस्त क्रं ५५७५ व ५५७६ नुसार दि. १२/७/२०२२** रोजी श्री शिवाजी दिवाकरराव पवार यांनी राजेंद्र कुमार मोतीलाल चंदेल यांच्याकडून खरेदी खतान्वये विकत घेतले होते. ते मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या मिळकतीचे मुळ खरेदी खत कोणालाही मिळाल्यास माझ्या खालील पत्त्यावर आणून देण्यात यावे ही विनंती.

**अमरावती** **ॲड. एम.यू. गावंडे**
**दि.९/६/२०२६ रा. गणेश नगर सुत गिरणी रोड अमरवती**
**पिन. ४४४६०७**
**मो. ९६०४९१०२०७**

# नीट पेपरफुटी प्रकरणामुळे मला अनेक गोष्टी आठवू लागल्यात!

मी १९६९ ला मॅट्रिक ला होतो. मला कोणीतरी सांगितले की आज जिथे उत्तम मिठाई गृह आहे त्याच्या मागील बाजूस हॉटेल रॉयल नावाचे हॉटेल होते. टवाळखोर विद्यार्थ्यांमध्ये प्रिय होते. तिथे म्हणे मॅट्रिक परीक्षेचे पेपर आदल्या दिवशी मिळतात. दोनशे रुपयाला. बरेच जण दावा करायचे आम्हाला इथे गेस पेपर मिळाला अन तो सही उतरला!मला गणिताच्या पेपर मध्ये इंटरेस्ट होता. मी प्रयत्न केला नाही पण ज्यांनी केला आणि मिळवला त्यांची निराशा झाली होती कारण रॉयल मधून मिळालेला गेस उतरलाच नाही. याच्या मागेपुढेच नवनीत चे २१ अपेक्षित सर्वच विषयाचे मिळू लागले आणि ते छापील स्वरूपात परिक्षेपूर्वी १५-२०दिवस आधी. त्यातील काही प्रश्न उतरायचे म्हणे. पुढे पदवी परीक्षा देताना आमच्या शेजारी प्रा. मार्तंडराव शेळगावकर भौतिकशास्त्र विषयाचे प्रमुख रहायचे. ते पेपर सेटर आणि मॉडरेटर होते.त्यांनी मला एकदा पेपर सेटिंग आणि मॉडरेटिंग समजून सांगितले. पेपर फुटणे इतके सोपे नाही हे तेव्हा लक्षात आले. पदवी आणि पदव्युत्तर परिक्षे वेळी IMP Topics किंवा गेस मधील दोन चार तुक्के लागल्याचे मला आठवते.

माझी एक नातेवाईक सीईटी सुरू झाली त्या पहिल्या बॅच ला होती. त्या वेळचा घोटाळा म्हणजे तेव्हा MCQ ची जी Answer Key होती त्यातील पाच भोके इकडची तिकडे केली गेली होती त्या मुळे चुकीची उत्तरे देणारे मेरिट मध्ये आले आणि ते सुद्धा पहिल्या रँकिंग नुसार प्रवेश फेरीत अंतिम फी भरल्यावर कोर्टाचा निकाल येऊन चुकीचे उत्तर देणाऱ्यांना ७ गुण बहाल झाले आणि मेरिट वरचे खाली आले. त्या वेळी पालक म्हणून बराच ओरडा केल्याचे आठवते. लक्षात असे आले की मेरिट विद्यार्थी आणि त्यांचे पालक कोर्टाची पायरी चढतात पण रस्त्यावर येऊन सामूहिक कृती करण्यास त्यांची फारशी तयारी नसते.

सध्याचा नीट पेपर फोडण्याचा प्रकारा निम्मित हे लिहितोय.मराठवाडी म्हणून लातूर पॅटर्न प्रस्थापित होताना मी पाहिलंय. विशेषतः अहमदपूर च्या सिद्रामअप्पा आलूरे गुरुजी यांचे कष्ट आठवतात.आणि लातूर च्या शाहू-दयानंद संस्थां नी होतकरू गुणवंत विद्यार्थ्यांकडून सकाळ-संध्याकाळ मेहनत करून घेतली. प्रारंभी च्या काळात गुरुकुल पद्धतीने आलूरे गुरुजी, जाधव आणि जनार्दन वाघमारे यांनी मेहनत घेतल्याचे मी पाहिले आहे. मराठवाडा बोर्डात दहावी-बारावी लातूर-अहमदपूर-उमरगा येथील विदयार्थी पहिल्या २५ मध्ये डझनाने येऊ लागल्यावर सर्व प्रथम औरंगाबादच्या मंडळींनी कपाळावर आठ्या पाडल्या. पुढे हाच मेहनतीचा पॅटर्न परभणी-उस्मानाबाद-नांदेड ला पोहोंचला तो पर्यंत लातूर पॅटर्न ने स्टेट मेरिट लिस्ट मध्ये डंका वाजवला.तेव्हा पुणे-मुंबई च्या शिक्षण संस्थांनी मराठवाड्याच्या या पॅटर्नचा अश्वमेध अडवण्यासाठी खूप उद्योग केले. तेथील वृत्तपत्रांनी तर मोहीमच उघडली. वेगळ्या आडनावाची, रंग रूपाची, प्रचलित भाषेतून व्यक्त होण्याचा सराव नसलेली मुले मुली मुंबई-पुणे-नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पहिल्या जागा घेऊ लागल्याने अनेकांचा पोटशूळच उठला. बारावी बोर्ड गुणवंत पॅटर्न हा घोकंपट्टी ,मेहनत, प्रश्न सोडवून घेण्याचा कठोर सराव आणि एका विशिष्ट तंत्राने उत्तर देण्याचा असल्याने हे तंत्र प्रारंभी मराठवाड्यातील अनेक संस्थांना जमून गेले. या काळात पेपर फुटीचा कधी मुद्दा आला नाही. गुणवन्त विद्यार्थी सुद्धा आपल्या यशाचे श्रेय त्यावेळी शाळेच्या शिक्षकांना किंवा एखादा शिक्षक घरी येऊन मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकाला देत असे.

लातूर पॅटर्न चा बोलबाला होतोय आणि ही एक व्यवसायाला संधी आहे लातूर पॅटर्न एनकॅश करण्याची हे बीड चे प्रा. मॅचिंद्र चाटे यांनी १९८६ ला ओळखले. आणि त्यांनी राज्यभर एकाचवेळी क्लासेस सुरू केले.पुढे येऊ घातलेल्या क्लासेस च्या मोहजाला चा पायासुद्धा मराठवाड्यात घातला गेला आणि बघता बघता मेरिटचा बाजार सुरू झाला. जे विदयार्थी गुरुजन आणि आई-वडिलांना श्रेय देत होते तेच एकदम चाटे क्लासेस च्या जाहिराती मध्ये दिसू लागले. शालांत परीक्षा बोर्डाचे अधिकारी आणि गुणवंताच्या मुलाखती फोटो मिळवण्यासाठी धडपडणारे पत्रकार (ज्यात मीही आलोच) गुणवंतांच्या घरी पोहोचण्याचा आधीच चाटे क्लास तेथे पोहोंचू लागले,मुले -त्यांचे पालक ही म्हणू लागले आम्ही गुणवंत बनलो ते चाटे क्लासेस मुळे!या मुलांच्या फोटो सह महाराष्ट्रातील मोठया वृत्तपत्रातील पहिले पान चाटेमय झाले. जाहिरातींचे जॅकेट वर जॅकेट निघू लागले,दैनिकात रोज अभ्यासमाला सुरू झाल्या, २१ अपेक्षित प्रश्नसंच निघू लागले. याच काळात (१९८६ ते ९०) महाराष्ट्रात १५ मोठया संस्थांनी खाजगी मेडिकल सुरू केले ,मेडिकल-इंजि. च्या सीट वाढल्या,चाटे सिनेमे काढू लागले, क्लास आणि ट्युशनस,यशाचा मार्ग बनली, क्लासरूम टिचिंग अस्तंगत झाले, गुणवंतांच्या याद्या निघणे बंद झाले, २००० मध्ये बोर्डाच्याच मार्कांवर मेडिकल-इंजि प्रवेश मिळणे बंद झाले, राज्यात सीईटी आली.घोटाळे सुरू झाले. लातूर पॅटर्न महाराष्ट्रात स्थिरावला. मेडिकल चा कट ऑफ वाढला, स्पर्धा, सिटांचे भाव वाढले. प्रवेश परिक्षा 'पार करणेच' शिक्षण होऊन बसले.२०१३ ला नीट बोकांडी बसली.

या दरम्यान म्हणजे १९८५ ते ८८ या काळात मराठवाडा भागात विनाअनुदान शाळा, कोर्सेस निघू लागले अगदी बीएड, डीएड, एल. एल. एस,.इलेक्ट्रोपथी, फार्मसी वैगेरे. त्यातच त्या वेळच्या मराठवाडा विद्यापीठातील कुलसचिव ब. मा. पाटोदेकर आणि कुलगुरू राजूरकर यांनी विना अनुदान कॉलेजेस ला लगाम घालण्यासाठी काही निर्णय घेतले, प्राचार्य ना. य. डोळे यांची समिति नेमली गेली. समितीने जो अहवाल दिला त्याने शिक्षण क्षेत्राचे




वाभाडे निघाले विना अनुदान संस्कृतीची किड किती भयानक आहे ते समजले. जमिन-जुमला, विकून अशा कोर्सेसला देणगी देऊन प्रवेश घेतलेले ३५ हजार विदयार्थी रस्त्यावर उतरले. विष्णू ढोबळे-सुधीर देशमुख२, संपत वाघमोडे या विद्यार्थी-युवकांनी देणगी प्रवेशा विरुद्ध जोरदार आंदोलन उभारले, मुंबई ला धडका दिल्या.शंकर राव चव्हाण मुख्यमंत्री होते. त्यांनी कॅपिटेशन फी-देणगी विरोधी कायदा करण्याची प्रक्रिया सुरू केली. पण त्या वर्षी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे ५० ते ९० हजार रुपये परत मिळणे महत्वाचे होते .विद्यार्थी संतप्त होते, औरंगाबाद सह अनेक ठिकाणी उद्रेक होता, चीड होती शिक्षणाच्या बाजारीकरण विरोधी. मला आठवते ,शंकरराव चव्हाण यांनी विष्णू ढोबळे यांना बोलावून घेतले होते आणि 'देणगी चे पैसे परत कसे काय करणार?संस्थाचालक तयार नाही होत, आणि आम्ही तेच पैसे काढून घेऊन विद्यार्थ्यांना नाही देऊ शकणार' असे काहीसे सांगितले. तेव्हा विष्णू (सध्या मुंबई उच्च न्यायालयात वकील) म्हणाला त्यांना ३ दिवस द्या, पोलिसांना सांगा आम्हाला अडवू नका. आम्ही करतो वसुली.'

शंकरराव यांनी पोलिसांना काय आदेश दिले माहीत नाही पण ३ दिवस अनेक विनाअनुदान संस्था चालकांना विद्यार्थ्यांनी घेराव घातले आणि बऱ्याच प्रमाणात देणगीचे पैसे परत मिळवले. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही पहिलीच घटना म्हंटली पाहिजे की शिक्षणासाठी देणगी दिलेली विदयार्थ्यांनी परत मिळवली. दोन महिने चाललेल्या या 'बीएड-डीएड आंदोलनाने' विनाअनुदान धोरण, डिग्रीचा बाजार, मेरिटची किंमत आणि शिक्षण धोरणाची ऐशी की तैशी केली. या आंदोलनाने मेडिकल -इंजि कडे वळू नये म्हणून प्रयत्न झाले आणि दुर्दैवाने विना अनुदान धोरणाच्या मुळाला उखडून लावण्याची ताकद असणारे हे आंदोलन बीएड-डीएड पुरते मर्यादित होऊन संपले. नाही म्हणायला मुख्यमंत्री शंकरराव यांनी एक जुजबी कॅपिटेशन फी विरोधी कायदा केला. पण त्याची अंमलबजावणी होणार नाही असाच.

१९८५ ते २००० या काळात महाराष्ट्रात शिक्षणाचे जे बाजारीकरण झाले त्यातूनच लातूर पॅटर्न जाऊन आरसीसी मोटेगावकर पॅटर्न रुजला. क्लास ला प्रवेश मिळाला की कॉलेज ठरू लागले. शैक्षणिक अपरिहार्यता म्हणून कॉलेज ला नाव नोंदवणे ही संकल्पना आली. आणि मोटेगावकर सारख्या कोचिंग सेंटर ला नको तितकी प्रतिष्ठा मिळाली.राज्याच्या जडण घडणीत वृत्तपत्रांचा वाटा असतो हे सूत्र विसरून केवळ मार्च ते जून या काळात रोज जॅकेट जाहिराती मिळतात म्हणून वृत्तपत्रांच्या कार्यक्रमात कोचिंग मास्टर प्रमुख पाहुणे म्हणून जाऊ लागले. आदर्श शिक्षकांच्या शासकीय कार्यक्रमात सुद्धा कोचिंग सेंटर वाले मंचावर दिसू लागले. राजकारणी आणि कोचिंगवाल्यांचे सख्य जमले. मग प्रवेश परीक्षा सेंटर मॅनेज करणे, क्लासेस ला मध्यवर्ती जागा, हॉस्टेल, खोल्या, मेस, मुलांसाठी आवश्यक असणारी फास्ट फूड, गॅजेट ची दुकाने सारे सारे कोचिंगवाल्याना जमून गेले. आकाश-ॲलन -ट्टू टीचर सारख्या चेन लातूर-नांदेड-नाशिक-नगर-कोल्हापूर मध्ये दाखल झाले तेव्हा कोचिंग लॉबी मध्येच स्पर्धा सुरू झाली अन मग 'मसलमेन-स्थानिक भाई-दादा यांची उठबस क्लास मध्ये वाढली. टोळीयुद्ध सुद्धा झाले. राष्ट्रीय पातळीवर कट ऑफ वाढला, आणि आरक्षित जागांवरील गुणवत्ता वाढल्या बरोबर कोचिंगवाल्यानी परीक्षे साथीचे गैरप्रकार सुरू केले. पेपर सेटर, मॉडरेटर ,प्रिंटिंग प्रेस, अन्सर की बनवणारे कोण कोण हवेत त्यांची वर्णी त्या त्या अधिकृत एजन्सी मध्ये कशी लागेल याचे नियोजन सुरू झाले. याच वेळी मेडिकल च्या मॅनेजमेंट कोट्यातील जागांचे देणगी मूल्य ६०-७० लाखावर आणि पीजी साठी कोटीचे उड्डाणे सुरू झाली तेव्हाच पेपर मधील १५-२० मार्कंचे प्रश्न फुटणे सुरू झाले ते धकुन गेल्यावर कोचिंगवाल्याची हिम्मत वाढली आणि संपूर्ण पेपर लिक पर्यंत चा टप्पा आला. विकत घेणारे होतेच ते सुद्धा थैल्या घेऊन पोहोंचलेच लातूर-पुणे-संभाजीनगर-नाशिक-मुंबई-दिल्ली पर्यंत.

**निशिकांत भालेराव**

# बुलढाण्यातील 'जळगाव जामोद' प्रकरणाचा अहवाल दोन दिवसांत सादर करा

## पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचे आदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे पोलीस महासंचालक (डीजीपी) सदानंद दाते सोमवारी (दि.८) अमरावती दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी अमरावती परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी बुलढाण्यातील बहुचर्चित 'जळगाव जामोद' प्रकरणाचा सविस्तर आढावा घेतला आणि अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक (आयजी) डॉ. महेश पाटील यांना पुढील दोन दिवसांत या प्रकरणाचा चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या अहवालाच्या आधारेच पुढील कारवाईची दिशा निश्चित होणार आहे.

पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधताना डीजीपी दाते यांनी या प्रकरणातील तपासावर काही गंभीर निरीक्षणे नोंदवली. ते म्हणाले, 'तपासात काही गंभीर त्रुटी आढळून आल्या असून चुकीच्या (निर्दोष) व्यक्तींवर कारवाई करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर कारवाई होऊ नये यावर आमचा भर आहे, मात्र वास्तविक दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.' या प्रकरणातील मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून, ती पटविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

जळगाव जामोद पोलीस स्टेशनच्या हद्दीत काही दिवसांपूर्वी एक मृतदेह आढळला होता. पोलिसांनी कोणतीही योग्य तपासणी किंवा खात्री न करता, हा मृतदेह एका बेपत्ता तरुणीचा असल्याचा निष्कर्ष काढला. इतकेच नव्हे तर, स्थानिक गुन्हे शाखेने त्या तरुणीच्या वडील आणि भावाला खुनाच्या आरोपाखाली बेड्या ठोकल्या होत्या. मात्र कथित मृत ☞(पान २ वर)





### अमरावतीशी माझे भावनिक नाते...

आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देताना डीजीपी सदानंद दाते भावूक झाले. ते म्हणाले, 'माझ्या २५ वर्षांच्या सेवाकाळात अमरावतीत घालवलेला वेळ अविस्मरणीय आहे. माझा प्रोबेशन (परिविक्षाधीन) कालावधी वलगाव येथे पूर्ण झाला होता. त्यानंतर मी येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणूनही काम पाहिले. विशेष म्हणजे माझ्या मुलीचा जन्मही अमरावतीतच झाला आहे, त्यामुळे या शहराशी माझे भावनिक नाते आहे.' पत्र परिषदेला विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील आणि पोलीस आयुक्त राकेश ओला उपस्थित होते.

# नांदगाव खंडेश्वर पंचायत समितीच्या एकात्मिक बाल विकास विभागाला भीषण आग

## आर्थिक घोळ लपविण्यासाठी आग लावली की लागली ?

## तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणीचे अर्ज जळून खाक

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील पंचायत समिती कार्यालय परिसरात असलेल्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना अर्थात आयसीडीएस विभागाच्या कार्यालयाला आज दुपारी २ वाजता भीषण आग लागली. आगीत विभागाची सर्व कागदपत्रे, बेबी किड्स , सर्विस रजिस्टर लाकडी फर्निचर, लाकडी कपाट, विशेषता लाडकी बहिणीचे हजारो अर्ज सुद्धा जळाले व इतर साहित्य जळून राख झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दल व स्थानिकांच्या अथक प्रयत्नांनंतर सुमारे एका तासाने आग आटोक्यात आली.



८ जुन सोमवार दुपारी २ वाजेच्या सुमारास कार्यालयातून धूर येत असल्याचे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले आणि खिडक्यांमधून मोठ्या ज्वाला बाहेर पडू लागल्या. घटनेची माहिती मिळताच नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीचा अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याच्या माऱ्याने आग विझवण्यास सुरुवात केली. यावेळी पंचायत समितीतील कर्मचारी व परिसरातील नागरिकांनीही मदतीचा हात दिला.

आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र कार्यालयातील विद्युत प्रवाह दोन दिवस अगोदरच मीटर काढून बंद करण्यात आला होता, आगीत आयसीडीएस अंतर्गत येणाऱ्या अंगणवाड्यांच्या नोंदवह्या, लाभार्थ्यांची माहिती, संगणक, प्रिंटर, कपाटे, खुर्च्या-टेबले व इतर महत्वाचे साहित्य पूर्णपणे भस्मसात झाले आहे. आगीमुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

घटनेची ☞(पान २ वर)

# सरपंच संघटनेची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

## ग्रामपंचायत प्रशासकांना आर्थिक व्यवहाराचे आदेश देण्याची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामपंचायत प्रशासकांना आर्थिक व्यवहार संबंधित आदेश देण्याच्या प्रमुख मागणी साठी जिल्हा सरपंच संघटनेने आज सोमवार ८ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की जिल्ह्यातील ७० टक्के ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे परंतु प्रशासकांना आर्थिक व्यवहार करण्याचे आदेश नसल्याचे सचिव सांगत आहे. यासंदर्भात मुख्य अधिकारी यांचे म्हणने आहे की कोर्टात केस चालू आहे. ग्रामपंचायत प्रशासकांना आर्थिक व्यवहार करता येत नाही. यामुळे ग्रामपंचायत निधी अखर्चित आहे. निधी खर्च होत नाही याला जबाबदार कोण☞(पान २ वर)



# अवैध दारू विक्री करणारा गजाआड

**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीला मोर्शी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडून १० हजार ४०० रुपयाची विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. राजेंद्र नंदकिशोर वर्मा (४५, मालवीयन गार्डन जवळ मोर्शी ) असे अटक आरोपीचे नाव आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कार्यवाहीचे आदेश पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिले आहे. त्यानुसार पोलिसांनी ☞(पान २ वर)



# शेतकरी कर्जमाफी योजनेतील त्रुटी दूर करा, अन्यथा तीव्र आंदोलन



## आमदार बच्चू कडूंचा सरकारला इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** खरीप हंगामाच्या तोंडावर राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील त्रुटींवरून महायुतीमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. 'सरकारच्या या योजनेत अनेक जाचक अटी आणि त्रुटी असून, त्या दूर न केल्यास राज्यातील लाखो शेतकरी लाभापासून वंचित राहतील,' असा आरोप शिवसेना (शिंदे गट) आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. आगामी पावसाळी अधिवेशनापर्यंत यावर तोडगा न निघाल्यास सरकारमध्ये असूनही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी आज, सोमवार (८ जून) रोजी अमरावती येथील पत्रकार परिषदेत दिला.☞(पान २ वर)

# दोन हजारांची लाच स्वीकारताना ग्रामसेवक ताब्यात

## -धारणीत एसीबीचा यशस्वी सापळा

**धारणी/प्रतिनिधीः-** कडधान्य साठवणुकीसाठी गोडाऊन उभारण्याकरिता आवश्यक असलेले ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना एका ग्रामसेवकाला एसीबीने रंगेहात पकडले. या कारवाईमुळे धारणी तालुक्यात खळबळ उडाली असून ग्रामपंचायत कार्यालयातील कारभाराबाबतही चर्चा सुरू झाली आहे. एसीबीच्या माहितीनुसार, रामलाल बिसराम भिलावेकर (वय ४५), ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक), ग्रामपंचायत दिया, ता. धारणी यांनी तक्रारदाराकडे नाहरकत प्रमाणपत्र देण्याच्या बदल्यात दोन हजार रुपयांची मागणी केली होती. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्याने एसीबीने सापळा रचला. सोमवारी दुपारी सिव्हिल लाईन परिसरातील एका खासगी कार्यालयात तक्रारदाराकडून दोन हजार रुपये स्वीकारताच पथकाने कारवाई करत☞(पान २ वर)

# आयुक्त तुकाराम मुंढे यांची दर्यापुरातही 'दहशत'!

## खुल्या तेलाच्या विक्रीवर कारवाईच्या भितीने दुकानदारांचा नकार

**खल्लार/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंडे यांची नियुक्ती झाल्यानंतर राज्यभरात प्रशासनाच्या धडक कारवायांची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि कठोर अधिकारी अशी ओळख असलेल्या मुंढे यांनी मोठ्या कंपन्यांपासून विविध व्यावसायिक प्रतिष्ठानांवर कारवाई करून प्रशासनातील नियमांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

त्यांच्या कारवाईची धास्ती आता तालुकास्तरावरही पोहोचल्याचे चित्र दिसून येत आहे. दर्यापूर शहरात खुले तेल विक्रीबाबत प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याने अनेक दुकानदारांनी खुले तेल विकण्यास नकार देण्यास सुरुवात केली आहे. कारवाईच्या भितीमुळे व्यापाऱ्यांमध्ये सावधगिरीचे वातावरण निर्माण झाले असून



नियमांचे पालन करण्याकडे कल वाढताना दिसत आहे. शहरातील अनेक किरकोळ व्यापाऱ्यांनी खुले तेल विक्री बंद करून पॅकबंद तेल विक्रीला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे ग्राहकांनाही आता पॅकबंद तेल खरेदी करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. प्रशासनाच्या कारवाईच्या भितीमुळे व्यापाऱ्यांमध्ये एक प्रकारची 'दहशत' निर्माण झाल्याची चर्चा शहरात सुरू☞(पान २ वर)

# पहिल्या टप्प्यातील जनगणना कामात तिवसा नप, दर्यापूर तहसिल अव्वल

## १०० टक्के घरयादी, गटयादीचे कार्य पूर्ण, -जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सत्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात जनगणनेच्या कामकाजाला सुरवात करण्यात आली आहे. यातील पहिल्या टप्प्यात तिवसा नगरपंचायत आणि दर्यापूर तहसिलने प्रथम ग्रामीण चार्ज कार्यालयाने मुदतीआधीच पहिल्या टप्प्यातील कार्य १०० टक्के पूर्ण केले आहे. यानिमित्ताने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते तिवसा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी शिवदास मुसळे आणि दर्यापूरचे तहसिलदार रविंद्र कानडजे यांचा आज प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. जनगणना २०२७ मधील पहिला टप्प्याचे कामकाज यशस्वीरित्या पुर्ण करणारे तिवसा नगरपंचायत हे जिल्ह्यातील प्रथम शहर चार्ज कार्यालय ठरले आहे. यानिमित्ताने तिवसा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी शिवदास मुसळे, कार्यालय अधिक्षक रोहन राठोड, जनगणना लिपीक सुधीर विघ्ने, तांत्रिक सहायक निलकमल बोके यांचा सत्कार करण्यात आला. तसेच यशस्वीरित्या कामकाज करणारे दर्यापूर तहसील हे जिल्ह्यातील प्रथम ग्रामीण चार्ज कार्यालय ठरल्याने दर्यापूर तहसीलचे तहसीलदार रविंद्र कानडजे, नायब तहसीलदार प्रमोद काळे, ☞(पान २ वर)



# पॉज, पेंट अँड एक्सप्रेस थेरेपेटीक आर्ट कार्यशाळेला भरघोस प्रतिसाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** पालक व पाल्य यांच्यामधील संवाद आणि एकमेकांच्या नात्यातील बाँड अधिक दृढ करण्याच्या तसेच पाल्यांसोबत अधिक मनमोकळेपणाने एकत्र राहून त्यांच्यातील बॉण्डिंग दृढ करण्याच्या उद्देशाने अमरावती शहरात प्रथमच पॉज, पेंट अँड एक्सप्रेस ही थेरेपेटीक आर्थेरेपेटीक आर्ट कार्यशाळा किडझी कॅम्प येथे घेण्यात आली.

सुदृढपणे पालकत्व निभावताना आपल्यातील कलागुणांना व्यक्त करून पाल्यांशी सहजपणे वागता यावे व त्यातून त्यांना सहज शिक्षण देता यावे या उद्देशाने किडझी कॅम्प येथे थेरपेटीक आर्ट ची ही कार्यशाळा मानसशास्त्राच्या अभ्यासिका गौरांगी गुजर व मानसशास्त्रज्ञ हर्षदा गुजर यांनी घेतली. या कार्यशाळेमध्ये पालकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला व आपल्या मनातील भावना व्यक्त करत पालकत्व निभावतांना ज्या कला गुणांना त्यांनी बाजूला सारले होते त्यांना उत्स्फूर्तपणे वाव देत आपल्या पाल्यांसोबत या कार्यशाळेत आनंदी व उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

यातील बरेच पालकांनी सांगितले की खूप दिवसानंतर आम्ही आपल्या पाल्यांसोबत हा क्वालिटी टाईम घालवला आणि त्यामुळे आमचे पाल्यांसोबतचे नाते अधिक दृढ व संपन्न झाले, तर काहींनी आपल्या सुप्त कला गुणांना बालपणा नंतर प्रथमच व्यक्त केले.पालक व पाल्य या दोघांच्या सहभागाने निर्माण झालेली ☞(पान २ वर)



# विश्व नेत्रदान दिवसावर भव्य जनजागृती पदयात्रा उद्या

## -नेत्रदान, अवयवदान करणाऱ्यांचा सन्मान

**अमरावती/प्रतिनिधीः-** हरिना फाउंडेशन व हरिना नेत्रदान समितीच्या वतीने विश्व नेत्रदान दिवसानिमित्त बुधवार १० जून रोजी शहरात भव्य जनजागृती पदयात्रा राजकमल चौक येथील नेहरू मैदान परिसरातून काढण्यात येणार आहे. यानिमित्य 'माझ्या जीवनाची शेवटची भेट राष्ट्राच्या नावावर' मोहिमेची सुरुवात करण्यात येत आहे. तसेच नेत्रदान, अवयव दान संदर्भात विविध कार्यक्रम घेतले जाणार असल्याची माहिती आज सोमवार ८ जून रोजी पत्रकार परिषदमध्ये आयोजकांनी दिले.

त्यांनी सांगितले की १० जून सायंकाळी साडेपाच वाजता नेहरू मैदान परिसरातून पदयात्रा निघणार आहे. श्याम चौक,बापट चौक,प्रभात टॉकीज, जवाहर गेट, जयस्तंभ चौक, सिटी कोतवाली होत राजकमल चौकात शोभायात्राचे समापन होणार आहे. विविध जनजागृती फलक, हातांमध्ये सांकेतिक डोळे आणि तिरंगा घेऊन नागरिक यामध्ये सहभागी ☞(पान २ वर)



# तरुणीचा विनयभंग करणारा पोलिसांच्या ताब्यात

## सरोज चौक येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः** पंचवटी चौक येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या एका तरुणीचा विनयभंग करण्यात आला होता. या प्रकरणात पोलिसांनी तपास करून आरोपीला सोमवारी ताब्यात घेतले आहे. माहितीनुसार पीडित तरुणी ४ जून रोजी आयटीआयचे प्रशिक्षण घेतल्यानंतर दुपारी साडेतीन वाजता घरी जाण्यासाठी सरोज चौक येथे ऑटो स्टॅंडवर आली आणि गावाचा ऑटो उभा असल्याने ऑटो मध्ये एकटी बसली होती. त्यावेळी तीस वर्षीय आरोपी पांढऱ्या रंगाचे शर्ट व पॅंट घालून तिथे आला,त्याने तरुणीला विचारले की ऑटो जायला किती वेळ आहे. त्यावर तर तिने सांगितले की थोड्यावेळात निघणार आहे. असे बोलणे ☞(पान २ वर)



